# कूजन

हुताश

१५ आक्टोबर १९४०

किं. १। रुपया

प्रकाशक

ब. गो. गर्गे एम्. ए.
वीणाप्रकाशन, नागपुर

मुद्रक :— के. ना. पावणसकर व व. के. शेवडे, एम्. ए.
दी आर्यन प्रेस, जेल रोड, नागपुर.

कै० आईस :–

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | कुञ्जांत | [१] |
| २. | कालिदासगौरव | १ |
| ३. | कुमारसम्भवातील वसन्तवर्णन | ३ |
| ४. | चन्द्रहास | ६ |
| ५. | जलबिन्दु | ३० |
| ६. | आत्मयज्ञ | ५० |
| ७. | एकच आधार | ५६ |
| ८. | पुनर्मीलन | ५७ |
| ९. | ओवाळणी | ६० |
| १०. | प्राणासह सगळें वांछित तेंहि निमालें | ६१ |
| ११. | नलिनीचें विरहगीत | ६४ |
| १२. | मानिनीस | ६७ |
| १३. | बलिदान | ९२ |
| १४. | गोड हुरहुर | ९२ |
| १५. | जम्मत | ९३ |
| १६. | हंस आणि बेडूक | ९४ |
| १७. | आकाङ्क्षा | ९६ |
| १८. | जिज्ञासा | ९८ |
| १९. | प्रस्थान | १०० |
| २०. | दयाळा तुजवीण साङ्ग कोणाकडे पहावें | १०१ |
| २१. | करुणा कर दीन दासीवरती | १०३ |


—:०:—

# शुद्धिपत्र.

| पान | कडवें | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १५ | ५५ | २ | वृत | वृत्त |
| २३ | ९ | २ | ता | तो |
| ,, | १२ | २ | भ | भे |
| ,, | १३ | १ | रा | री |
| ,, | १५ | १ | द | दे |
| ,, | १९ | २ | ममर | मर्मर |
| ३७ | ७१ | १ | कोमलास्तरणा | कोमलास्तरणी |
| ३८ | ९२ | २ | तनपान | स्तनपान |
| ३९ | १०३ | १ | मरा | भ्रमरा |
| ६० | ४ | २ | ज्येतीचें | ज्योतीचें |
| ८१ | ५ | ९ | कष्ठींचा | कण्ठीचा |
| ८८ | ३५ | १२ | त्याजी | त्याची |

# परिचय

माझे तरुण स्नेही ' काव्यतीर्थ ' श्री. नी. र. वऱ्हाडपांडे यांच्या या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहितांना मला एक प्रकारचा विशेष उत्साह वाटत आहे. सहा सात महिन्यापूर्वीची गोष्ट असेल. एके दिवशीं सायंकाळीं श्री. वऱ्हाडपांडे हे आपल्या कवितांची वही घेऊन माझ्याकडे आले. त्या वेळीं त्या वहींतील तीन चार कविता चाळून मी जे उद्गार सहजगत्या काढले, त्यांचा उल्लेख त्यांनी आपल्या निवेदनांत केलाच आहे. त्यानंतर ' रसांचें मानसशास्त्र ' हा आपला सुदीर्घ प्रबंध घेऊन ते मला पुन्हा भेटले. त्या प्रबंधांत त्यांचा गाढ व्यासंग आणि त्याहीपेक्षा त्यांच्या बुद्धीची जी विश्लेषणकुशलता प्रकट झाली आहे, ती पाहून मला खरोखरीच विस्मय वाटला. त्या प्रबंधातील सारेंच विवेचन मला मान्य आहे, असें नाही. पण, त्यावर चर्चा करितांना श्री. वऱ्हाडपांडे यांच्या बुद्धीची जी सूक्ष्मता आणि कल्पकता माझ्या अनुभवाला आली, तिच्यामुळें त्यांच्या वाङ्मयीन कर्तबगारीविषयीं माझ्या मनांत फार मोठ्या आशा उत्पन्न झाल्या; व अद्याप बी. ए. च्या वर्गांत असलेल्या नागपूरच्या या उदयोन्मुख साहित्यिकाचा परिचय मराठी वाचकांना करून देण्याची कामगिरी मी आनंदाने पत्करली.

विद्यार्थिदशेत काव्यरचनेची हौस असणें हें एक विशेष बुद्धिमत्तेचें लक्षण म्हणून गोल्डस्मिथने वर्णन केलें आहे. पण, काव्यरचनेची केवळ नुसती हौस असणें हा कांहीं बुद्धिमत्तेचा विशेष प्रभाव खास म्हणतां येणार नाही. विद्यार्थिदशेत सरस कविता लिहितां येणें ही व्यासंग, कल्पकता आणि लेखनपटुत्व यांची खूण आहे; व याच अर्थाने गोल्डस्मिथने तें विशेष बुद्धिमत्तेचें लक्षण मानलें असावें, याबद्दल मला शंका नाहीं. विद्यार्थिदशेंत यौवनसुलभ काव्यात्मता ही प्रत्येक विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं थोडी बहुत असतेच; व विद्यालयांत सतत होणाऱ्या वाङ्मयाभ्यासाने ती काव्यात्मता चाळविली जाऊन कोणत्या ना कोणत्या तरी स्खलित रूपानें यथाशक्ति प्रकटहि होते. पण, पावसाळ्यांत असंख्य कीटकांना पंख फुटत असले, तरी फुलपाखरें होऊन फुलांचे मधुगन्ध लुटण्याचें भाग्य त्यांपैकीं फारच थोड्यांच्या वाट्याला येतें. तसाच प्रकार विद्यार्थिदशेंतील

या लेखनस्फूर्तीचाहि असतो. त्या स्फूर्तीवर चिरस्थायी असे उन्नत संस्कार परिश्रमपूर्वक घडविल्यामुळें तिचा रमणीय आविष्कार झाल्याची उदाहरणें हाताच्या बोटावर मोजण्याइतकींच आढळतात. श्री. कऱ्हाडपांडे यांचें उदाहरण केवळ या विरळ कोटीतीलच नव्हे, तर भावी काळांत अत्यंत गौरवास्पदही ठरेल, याबद्दल मला शंका नाहीं.

श्री. कऱ्हाडपांडे यांची प्रतिभा पूर्वसूरींच्या उत्कृष्ट कलाकृतींच्या परिशीलनानें जागृत झाली आहे, जीवितांतील रम्य किंवा भव्य दृश्यांच्या आणि घटनांच्या चिन्तनानें नव्हे, असें जें माझें मत त्यांच्या कविता चाळतांना झालें, तें अद्यापही कायम आहे. वाङ्मय हा जीविताचा एक महत्वाचा भाग आणि घटक आहे, यांत शंका नाही. पण, तो भाग बव्हंशीं प्रतिबिम्बात्मक असल्यामुळें प्रत्यक्ष जीवित हें त्यापेक्षा अधिक श्रेष्ठ, प्रभावी आणि स्फूर्तिदायक आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे; व म्हणूनच उत्कृष्ट कलाकृतीपेक्षा जीवितापासून मिळालेली स्फूर्ति ही अधिक प्रबळ, उत्कट आणि केव्हा केव्हा प्रमाथीहि असते. ड्रायडन, पोप आणि थॉमसन यांच्या कवितेपेक्षा वर्डस्वर्थ, बायरन आणि शेले यांची कविता अधिक जिवंत, अधिक सामर्थ्यशाली वाटते, याचेंहि मर्म झालें तरी हेंच होय. कवितेचे जुने विषय, जुनी शैली किंवा जुनीं वृत्तें ही केवळ जुनी म्हणून कांही कोणी त्याज्य ठरवीत नाही. एकुणिसाव्या शतकांतील इंग्रजी नवकवितेचे प्रवर्तक शेले आणि कीट्स् यांनी ग्रीक पुराणांतील कथांवर लिहिलेलीं काव्यें आपल्याला मोहित करीत नाहीत काय ? पण इतका दूरचा दाखला कशाला ? महाभारतातील रूरू आणि प्रमद्वरा यांच्या हृदयङ्गम कथेवर श्री. अरविंद घोष यांनी लिहिलेली ' लव्ह ॲंड डेथ ' ( Love and death ) ही कविता काय गोविंदाग्रजांच्या ' प्रेम आणि मरण ' या कवितेपेक्षा कमी सरस आहे ? मधुसूदन दत्त, तरुलता दत्त, रवीन्द्रनाथ टागोर, अरविंद घोष, मैथिलीशरण गुप्त प्रभृति आधुनिक भारतीय कवींनी जुने काव्यविषय हाताळूनच लोकोत्तर कीर्ति मिळविलेली नाही काय ?

अर्थात् जुने विषय, जुनी शैली आणि जुनीं वृत्तें यांना केवळ तीं जुनाट म्हणून कोणीही नाकें मुरडीत नाही. इंग्रजी सॉनेट मराठीत आणतांना केशवसुतांनी तें शार्दूलविक्रीडितासारख्या जुन्या विचारगंभीर वृत्तांत बसविलें;

व माधव ज्यूलियनांसारख्या नव कवीनें आपल्या प्रणयकथेचे 'तुटलेले दुवे' त्या वृत्तांत ग्रथित करून तरुण रसिकांच्या हृत्तारा छेडल्या. श्री. वऱ्हाडपांडे यांनीं आपल्या निवेदनांत असें एक मोठें मार्मिक वाक्य लिहिलें आहे कीं, 'कलेचा आत्मा सनातन आहे.' अगदीं खरें. कलेच्या या सनातनत्वा-मुळेंच खरोखरी मानवी संस्कृतीतील सातत्य आणि सात्म्य, इतके वैचारिक आणि राजकीय उत्पात सदैव होत असूनसुद्धा, आजपर्यंत अबाधित राहिलें आहे आणि पुढेंही राहील. पण, कलेचा आत्मा सनातन असला, तरी सनातन धर्म आणि सनातन सृष्टि ही ज्याप्रमाणें प्रत्येक बदलत्या युगानुसार किंवा ऋतुनुसार नवें रूप धारण करितात, त्याप्रमाणें तोही नित्य नवीं शरीरें धारण करीत असतो. एवढा निर्गुण, निराकार परमेश्वर ! पण त्यालाही प्रत्येक नव्या युगांत त्या युगाच्या अपेक्षांप्रमाणें नवा अवतार घेणें जिथे भाग पडलें, तिथे बिचाऱ्या कलेची काय कथा ? आत्मा सनातन असतो, म्हणूनच तो पुनर्जन्म घेऊं शकतो, जीर्ण शरीर टाकून नवें धारण करूं शकतो. हाच नियम कलेलाही लागू आहे. कलेचा आत्मा सनातन आहे, पण रूपें मात्र सदा बदलणारी आहेत; व कला ही जीविताची प्रतिबिंबरूप असल्यामुळें जीवितांत वारंवार होणाऱ्या परिवर्तनांची प्रतिक्रिया कलेवर घडून, तिच्या रूपातील हा बदल अपरिहार्यतेने होत असतो. जीवित म्हणजे कांहीं केवळ सामाजिक जीवन नव्हे. सामाजिक जीवन हें जीविताचें फक्त एक अंग आहे. जीवित म्हणजे 'अवघाचि संसार;'—त्या संसारांत मानवी व्यवहारांप्रमाणेंच सृष्टीच्या व्यापारांचाही समावेश होतो. अर्थात् अशा विराट् जीवितापासून स्फूर्ति घेऊन, त्याच्या निरीक्षणांत आणि चिंतनांत रंगून, त्याच्या क्रिया-प्रतिक्रियांशी समरस होऊन जे ललित लेखक वाङ्मय निर्माण करितात, त्यांचे विषय, शैली किंवा वृत्तें हीं कितीहि जुनीं पुराणीं असलीं, तरी त्यांच्या कलाकृतींतून नवचैतन्याच्या ऊर्मि झळाळल्याशिवाय रहात नाहीत. 'जुनी गाणी नव्या आनंदाने गाण्याची' (To sing old songs with new delight) जी घोषणा शेलेने केली होती, तिचेंहि मर्म झालें तरी हेंच नव्हे काय?

श्री. वऱ्हाडपांडे यांचा हा काव्यसंग्रह घेतला, तरी तो वाचतांना सुद्धा कलेविषयींच्या या विवेचनाची सत्यता अनुभवाला आल्याशिवाय राहत नाही.

पूर्वसूरींना वाट पुसत जरी त्यांनी आपल्या प्रारंभींच्या कविता लिहिल्या असल्या, तरी थोडासा आत्मप्रत्यय येतांच स्वतः नव्या वाटा पाडण्याच्या प्रयत्न त्यांनी केला आहे; व त्या प्रयत्नावरही जरी पूर्वसंस्कारांचें दडपण पडलेलें असलें, तरी त्यांच्या बुद्धीची स्वतंत्रता आणि कल्पकता ही त्यांतूनही प्रकट झाल्याचें प्रत्ययाला येतें. त्यांनी आपल्या काव्यप्रतिभेच्या विकासाचा जो हृदयङ्गम वृत्तांत सुरवातीला दिला आहे, तो केवळ त्यांच्या व्यासंगाचीच नव्हे, तर आत्माविष्कारासाठी धडपडत असलेल्या त्यांच्या प्रतिभेच्या प्रयोगचातुरीचीही साक्ष देतो. नाही तर कालिदासाच्या शैलीचें अनुकरण करून 'चंद्रहासा'सारखें विदग्ध खण्डकाव्य रचणाऱ्या या गीर्वाणवाणीच्या भक्तानें ' बलिदाना'सारखें शुद्ध मराठी चालीतील करुणरम्य खण्डकाव्य कां लिहिलें असतें ? कालिदासापासून सावरकरांपर्यंतचें श्री. वऱ्हाडपाण्डे यांच्या काव्याभिरुचीचें आन्दोलन त्यांच्या बुद्धीच्या प्रगमनप्रियतेचें आणि संस्कारशीलतेचें निदर्शक आहे. आणखीहि एक गोष्ट या आन्दोलनावरून दिसून येते. ती अशी कीं, प्राचीन संस्कृत कवींच्या आणि तत्त्वज्ञांच्या अभिजात भावगंभीर वाङ्मयांत मुरलेल्या त्यांच्या प्रतिभेला जीवितातील क्षुद्र वस्तूंचें किंवा घटनांचें आवाहन होणें शक्य नाही; उत्तुंग आणि उदात्त, भव्य आणि भास्वर असें जें जें कांहीं म्हणून जीवितांत आहे, त्याचाच प्रभाव त्यांच्या प्रतिभेला स्फूर्ति देऊं शकेल. ' जलबिन्दु ' आणि ' बलिदान ' हीं त्यांचीं दोन कल्पकतापूर्ण खण्डकाव्यें वाचून त्यांच्या प्रतिभेच्या या वैशिष्ट्याची चटकन् ओळख पटते. प्राचीन अभिजात कलाकृतींचा निदिध्यास आणि तत्त्वज्ञानाचा दृढ अभ्यास यामुळें त्यांच्या तरुण प्रतिभेच्या विशाल भालप्रदेशावर गांभीर्याच्या ढगाची सावली पडली आहे. पण ती अकालीं पडलेली सावलीही त्यांच्या चिन्तनपरतेमुळें एकन्दरीत मनोज्ञ वाटते.

श्री. वऱ्हाडपांडे यांनी स्वतःच आपल्या कवित्वशैलीच्या विकासाचा वृत्तान्त सटीक निवेदन केलेला असल्यामुळें माझें काम सोपें झालें आहे. त्यांच्या कवितेचा घाट आणि थाट एकंदरीत पण्डितगिरीचा आहे; व कालिदासाच्या रचनाशैलीची छाप त्यांच्या कवितेवर इतकी कांही पडली आहे कीं, ' जलबिन्दु ' या खंडकाव्यांत त्यांनी बहुतेक अनुष्टुभांचा उत्तरचरण अर्थालंकारांनी नटविला असल्याचें आढळतें.

विन्दु एक जलाचा तो शोभे तैं पद्मिनीवरी ।
जीव नश्वर कीं जैसा जगाच्या रंगभूवरी ॥

अशा तऱ्हेचे अनुष्टुभ् या काव्यांत जागोजाग आहेत. त्याचप्रमाणे श्री. वऱ्हाडपांडे यांची भाषा सामान्यतः संस्कृतप्रचुर असूनही त्यांनी गहन तत्त्वें मोठ्या सुबोधतेने या काव्यात ग्रथित केलीं आहेत.

त्यागाने येतसे जीवा चिरन्तन उदात्तता ।
भोगालयास आत्म्याच्या क्षणभंगुर चारुता ॥

या अनुष्टुभांत त्यानी 'आत्मनो भोगायतनं शरीरम्' ही कल्पना सुगमतेने गुंफिली आहे. या सुश्लिष्ट रचनेला शोभतील अशा मनोहर कल्पनांनी आणि विचारांनी हें काव्य भरलेलें आहे.

मुग्ध तू मुनिकन्येचा धृष्टा अधर चुम्बिला ।
दुष्यन्तनृपतीने जो मनीं केवल इच्छिला ॥

हा जलबिन्दूने भ्रमराला मारलेला टोमणा अत्यन्त मार्मिक वाटतो. 'बलिदान' हें काव्य आपल्या हातून निर्माण झाल्याबद्दल स्वतःला वाटलेल्या धन्यतेचें जें वर्णन श्री. वऱ्हाडपांडे यांनी मोकळ्या मनानें केलें आहे, तें वाचकांनाही पटावयाला हरकत नाही. या काव्यांतील बालमुकुन्द आणि रामरखी यांच्या संवादावर सावरकरांच्या शैलीचा ठसा उमटलेला असला, तरी त्यांतील भावाविष्कार अतिशय हृद्य आणि रम्य आहे. 'आकांक्षा' 'हंस आणि बेडूक' वगैरे कवितांत श्री. वऱ्हाडपांडे यांची सहृदयता आणि कल्पकता प्रतीत झाली आहे.

व्यासंग, कल्पकता आणि भाषापटुत्व हे श्री. वऱ्हाडपांडे यांचे तीन गुणविशेष प्रस्तुत काव्यसंग्रहांत व्यक्त झाले आहेत; व त्यांच्या भावी लेखनाविषयीं आशा उत्पन्न करावयाला ते निःसंशय पुरेसे आहेत. पण, श्री. वऱ्हाडपांडे यांच्या वाङ्मयीन भवितव्याविषयीं मला जो उत्साह वाटतो, तो मात्र केवळ कवित्वाच्या दृष्टीने नव्हे; तर कुशाग्र बुद्धीचें आणि मूलगामी विचारांचे उत्कृष्ट विवेचक म्हणून साहित्य आणि इतर आनुषङ्गिक शास्त्रें यांत ते नावीन्यपूर्ण भर घालतील या

आशेने. मराठींत शास्त्रीय दृष्टीचे अधिकारी टीकाकार आणि विवेचक यांचें आज दुर्भिक्षच आहे; व त्यामुळें प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्र आणि नवें पाश्चात्य साहित्यशास्त्र यांचें आलोडन करून त्यांचा चिकित्सापूर्वक समन्वय करण्याचें आणि आधुनिक मराठी वाङ्मयावर झालेल्या त्यांच्या परिणामांचें विश्लेषण करण्याचें काम अद्याप झालेलें नाहीं. श्री. वऱ्हाडपांडे यांनी जर आपला व्यासंग निष्ठेने चालू ठेवला, तर तें काम करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अभिजात लेखणींत लवकरच येईल, अशी मला खात्री वाटते.

शान्तानिवास नागपूर
२४।९।४० } ग. त्र्यं. माडखोलकर

# कुजांत

स्वतःच्या लिखाणावर स्वतःच टीका लिहिण्याचा प्रघात पाश्चात्य देशातून कितपत रूढ झाला आहे हें मला माहीत नाही, पण तसा तो रूढ झाला तर वाङ्मयांत एक महत्वाचें असें नवीन क्षेत्र उघडलें जाऊन त्याच्या वाढीला चालना मिळेल हें मात्र खरें. पुष्कळ लोकांची अशी समजूत असते कीं साहित्याचा निर्माता हा स्वतःच्या कृतींच्या गुणावगुणाविषयीं निःपक्षपाती राहूं शकत नाही. आत्मनिष्ठेमुळें त्याची दृष्टिच अन्ध झाली असते व म्हणून तो त्यातील गुणदोष उघड्या डोळ्यांनी पाहूं शकत नाही. पण हें म्हणणें अगदीं फोल आहे. स्वतःच्या कृतीतील दोषांविषयीं साहित्यिकाच्या इतका निष्ठुरपणा कुणीच दाखवीत नसेल. एखादी वाईट कृती लिहून झाली तर स्वतः साहित्यिकाला त्याची इतकी खन्त वाटत असते कीं प्रसङ्ग विशेषीं तो ती नष्ट करण्यासही मागेपुढे पहात नाही. अशातऱ्हेचीं उदाहरणें साहित्याच्या इतिहासांत थोडीथोडकीं सापडतील असें नाही. शिवाय स्वतःच्या मतांचा विकास कसकसा होत गेला, स्वतःचे साहित्यविषयक विचार कसकसे बदलत गेले व त्याचा आपल्या लेखनावर कसकसा परिणाम झाला हें स्वत : लेखकाखेरीज इतर टकाकार चांगलें सांगू शकणार नाहीत. या दृष्टीने माझ्या कवितेबद्दलच्या कल्पना कसकशा बदलत गेल्या व माझे माझ्या कवितांविषयीं काय मत आहे हें सांगितल्यास वाचकांना इतर कोणत्याही टीकेपेक्षा त्याचा जास्त उपयोग होईल असें वाटतें.

मी माझी अगदी पहिली कविता वयाच्या दहाव्या वर्षी लिहिली. त्यावेळीं गोड व प्रौढ शब्दरचना यापलीकडे काव्याबद्दल माझी कल्पना गेली होती असें वाटत नाही. त्यावेळीं लिहिलेली ती कविता आतां उपलब्ध नाही, पण तिची एखाद्यावेळेस आठवण झाली म्हणजे माझें

मलाच हसूं येते. शब्दांची व अर्थाची ओढाताण करून कशातरी चार ओळी मी जुळविल्या होत्या. पण ती त्यावेळीं मलाच नव्हे तर माझ्या मित्रांनाही फार आवडली होती व त्यांनी आपल्या एका हस्तलिखित मासिकांत ती "छापण्या" ची तयारीहि दाखविली होती. याच वयांत साहित्यसेवेची महत्वाकांक्षा माझ्या मनांत उदित झाली व ती अजूनही कायम आहे. एका दृष्टीनें काव्याची आवड ही माझी पैतृक नसली तरी मातृक देणगी आहे. आईला कविता वाचण्याचा व त्या गाण्याचा लहानपणापासून फार नाद असे. मधून मधून स्वतः कविता करण्याचीही तिला लहर लागे. त्यापैकीं अगदी शेवटीं शेवटीं लिहिलेल्या कांही कविता पुस्तकाच्या अन्तीं दिल्या आहेत. (पान १०१ ते १०५).

यांप्रमाणें काव्याची आवड माझ्यांत उपजत असली तरी तिची वाढ मात्र फार उशीरा झाली. वर सांगितल्याप्रमाणें साहित्यसेवेची महत्वाकाङ्क्षा मला दहाव्या वर्षीच जरी उपजली असली तरी काव्याच्या क्षेत्रांत आपण कांही करूं असें मला तेव्हां वाटलें नाही. निरनिराळ्या हस्तलिखित मासिकांतून मी फक्त चर्चात्मकच लेख लिहिले आहेत. ज्याला ललितवाङ्मय म्हणतां येईल अशापैकी कोणतेंच लिखाण अगदी लहानपणीं माझ्या हातून झालें नाही. याचें कारण हेंही असूं शकेल कीं सध्याची शिक्षणपद्धति भावनेच्या विकासापेक्षा बुद्धीच्या विकासाला जास्त वाव देते. कॉलेजमध्यें पाऊल टाकल्यानन्तर मात्र माझ्या कविमित्रांशी थोडी चढाओढ करण्याच्या इच्छेनें मी प्रथम संस्कृत कविता करण्यास प्रारम्भ केला व त्यांत मला कल्पनेबाहेर यश मिळालें. इतकें कीं कांही दिवस पुनः संस्कृत भाषेचें व वाङ्मयाचें पुनरुज्जीवन होईल तर बरें असें मला वाटूं लागलें होतें. पण नन्तर हळूहळू मी मराठी कवितालेखनाकडे वळलों व कालिदासगौरव ही कविता कॉलेजांत प्रथमवर्षीच लिहिली. कालिदासासारख्या शब्दसृष्टीच्या ईश्वराचा नुकताच परिचय झालेला असल्यामुळें या कवितेंत नादमाधुर्य आणण्याचा फार प्रयत्न केलेला आहे हें सुज्ञ वाचकाच्या तेव्हांच लक्षांत येईल. काव्याची गोडी किति अवर्णनीय असते याचा अनुभव

मला कालिदासानेच प्रथम आणून दिला व त्याच्या कवितेच्या वाचनानेच कवि होण्याची माझी इच्छा अगदीं दृढमूल झाली. पण कालिदासाच्या कवितेतील अनेक गुणांपैकी अगदीं प्रथम माझ्या मनावर कशाचा पगडा बसला असेल तर नादमाधुर्य व सौंदर्यपूर्ण वातावरण निर्मिण्याची त्याची शैली यांचा. 'सौंदर्यपूर्ण वातावरण' या शब्द-प्रयोगाची जरा फोड केली पाहिजे. कवीच्या वर्णनांत नेहमी सौंदर्यपूर्ण घटनाच येतील असें नाही, तर कधीकधी अगदी हिडिस अशा गोष्टी सुद्धा येतील. उदाहरणार्थ कालिदासाच्याच पुढील ओळी पहा,

उपान्तयोर्निष्कुषितं विहंगैराक्षिप्य तेभ्यः पिशितप्रियापि
केयूरकोटिक्षततालुदेशा शिवा भुजच्छेदमपाचकार

हे युद्धाचें वर्णन आहे. "पक्ष्यांनी फाडून टाकलेला माणसाचा तुटून पडलेला दण्ड त्याच्यापासून हिरावून घेऊन रक्त पिण्यास आसुसलेली कोल्ही त्यावर बांधलेला दागिना टाळूला जोराने लागल्यामुळें त्याला खाण्यापासून परावृत्त झाली" असा या श्लोकाचा भावार्थ आहे. यातील घटना किळसवाणी असली तरी युद्धवर्णनाचा प्रसंग असल्यामुळें व कालिदासाची उत्कृष्ट वर्णनशैली त्यात प्रतीत होत असल्यामुळें तो काव्यमय वाटतो. पण कांही वेळा वर्णिलेली घटनाच इतकी सौंदर्यपूर्ण असते कीं कवीच्या कलात्मक हातातून न दिसतां प्रत्यक्ष व्यवहारांत दिसली तरी सुद्धा आपल्याला सौंदर्यपूर्णच वाटेल. उदाहरणार्थ रघुवंशातील अजाची वरात पहाण्यास निघालेल्या स्त्रियांची धावपळ, किंवा लवाच्या अन्तःपुरातील स्त्रियांचा जलक्रीडेचा प्रसङ्ग. असे प्रसंग कल्पिण्याची कालिदासाला फार हौस. त्याचीं काव्यें वाचून मलाही तसेंच वातावरण निर्माण केल्याशिवाय काव्यांत काव्यत्व नाही असें वाटूं लागलें व म्हणून 'चन्द्रहासा' चें आख्यान लिहितांना मी देखील सौंदर्यपूर्ण घटनांचा उ. निसर्गवर्णन, उद्यानवर्णन, चन्द्रहासाचें स्वरूपवर्णन इत्यादिकांचा विस्तार करून निव्वळ कहाणीवजा भाग शक्य तितका थोडक्यांत आटपला आहे, आणि त्यावेळच्या कल्पनेप्रमाणें भाषाही प्रौढ संस्कृतशब्दप्रधान अशीच वापरली आहे. चन्द्रहास लिहितांना दुसरी गोष्ट जी ध्यानीत धरली होती ती ही कीं निसर्गवर्णन अगदी वास्तविक असावें. वि

चिपळूणकरांनी आपल्या भवभूतीवरील निबन्धांत असाच आग्रह धरलेला पाहून मलाही तसें करावेंसें वाटलें. अर्थात् आज ती कल्पना उरलेली नाही. चन्द्रहास दीर्घ संस्कृत काव्यांच्या पद्धतीवर असल्यामुळें शेवटचे श्लोक निरनिराळ्या वृत्तांत लिहिणें वगैरे बाह्य प्रकारही त्यांत आले आहेत. याप्रमाणें चन्द्रहासाची रचना करतांना काव्याचा जो आदर्श मी दृष्टीपुढें ठेवला होता तो बराच सफळ झाला असें मला वाटतें. माझ्या उत्कृष्ट काव्यांपैकीं चन्द्रहास एक ठरेल असें मला वाटत नाही. पण तें अगदीच टाकाऊही नसल्यामुळें व कवीच्या मनोविकासाचीं स्थित्यन्तरें दाखविण्यास त्याचा उपयोग होण्यासारखा असल्यामुळें प्रस्तुत संग्रहांत त्याला स्थान दिलें आहे.

चन्द्रहासाचें लेखन झाल्यावर माझ्या वाचनांत सावरकरांची 'कमला' आली. 'कमला' काव्य वाचल्यावर कालिदासाच्या शैलीचा जो एक विशेष नजरेतून सुटला होता तो प्रामुख्यानें मनांत भरला, आणि तो म्हणजे वेळोवेळीं उत्कृष्ट कल्पनांनी सजलेल्या उपमा उत्प्रेक्षांची लयलूट करणें. आजकालच्या युगांत अलङ्कारखचित काव्य म्हणजे निकृष्ट काव्य असें अनेक पण्डितंमन्य समजूं लागले आहेत. पण प्रो. बनहट्टींनी आपल्या मयूर काव्यविवेचनांत दाखवून दिल्याप्रमाणें अलङ्कार हें कवीच्या कल्पना शक्तीचें फल असल्यामुळें त्यांचें काव्यांतील स्थान फार उच्च आहे. यावर त्यांचा अतिरेक सौंदर्यविघातक ठरतो असा कुणी आक्षेप घेईल पण तो पद्यवाङ्मयाला तितकासा लागूं नाही हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कालिदासानें उपमा उत्प्रेक्षांची इतकी गर्दी केली आहे कीं कालिदासीय काव्यात अलङ्कारविहीन श्लोक शोधूं गेल्यास एका सबंध सर्गांत बोटावर मोजण्याइतकेच श्लोक निघतील. असें असतांही त्याचें काव्य वाचीत असतांना तो अतिरेक जाणवत नाही, इतकेंच नव्हे तर ते काढून टाकल्यानें कालिदासीय कलेच्या काळजालाच हात घातल्यासारखें होईल. गद्यांत मात्र उपमा उत्प्रेक्षांची अशी खैरात सौंदर्यविघातक ठरते यांत संशय नाही. असो तेव्हां अलङ्काररम्यता, विशेषतः उपमा अलङ्काराचें सौंदर्य हा जो कालिदासाचा त्याचप्रमाणें सावरकरांच्या कमलेचा विशेष

तो मी आपल्या काव्यांत आणण्याचा प्रयत्न करूं लागलों व याचें दृश्य फल म्हणजे जलबिंदु या काव्याचा सुरवातीचा भाग होय. नंतरच्या भागा॑त उपमाउत्प्रेक्षांना वावच न मिळाल्यामुळें त्यांचा प्रवाह ओसरला आहे. शिवाय हा भाग लिहितांना त्याच्यावर नकळत रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गांतील दिलीप व सिंह यांच्या संवादाची छाप पडली असावी असें वाटतें. पहिला भाग वाचतांना मात्र सावरकरांच्या कमलेची किंवा कालिदासाच्या रघुवंशाची वाचकांना आठवण झाल्याखेरीज रहाणार नाही. हा उपमाउत्प्रेक्षांचा सोस कालपरत्वें वाढतच गेला, व मी एका स्वतंत्र महाकाव्यांत घालण्यासाठी म्हणून लिहिलेल्या 'प्रभातवर्णन' 'राकारजनी' इत्यादि काव्यांत तो पराकोटीला पोंचला आहे. इतका कीं त्यांचें प्राबल्य कमी दिसावें म्हणून मधे मधे इतर श्लोक नवीन करून घालण्याचा माझा विचार आहे.

'कमला' काव्याच्या वाचनानन्तर कालिदासीय काव्याइतकेंच सावरकरांचें काव्यही माझ्या मनाची पकड घेऊं लागलें आहे हें मला कळून चुकलें. आतांपर्यंत मी सावरकरांची बहुतेक प्रसिद्ध कविता वाचली आहे. त्यांची 'माझें मृत्युपत्र' ही कविता वाचून मला ही देशासाठी आत्मयज्ञ करणाऱ्या वीराची मरतांनाची मन:स्थिति चित्रिण्याची इच्छा झाली, व तिची पूर्ति 'आत्मयज्ञ' या काव्यांत झाली. माझ्या भावनांची उत्कटता ज्यांत प्रतिबिम्बली आहे असें हें माझें पहिलेंच काव्य आहे. ही कविता सावरकरांच्या माझें मृत्युपत्र या कवितेवरून स्फुरली असली तरी या दोन कवितांत कोणतेंच साम्य नसल्यामुळें त्यांचा नातेसंबंध सांगून सुद्धा कुणाला पटणार नाही, कारण तिच्यातील भावना मी स्वतः अनुभविलेल्या आहेत. या कवितेतील शैलीवर मात्र सावरकरांपेक्षा बालकवींचीच छाप जास्त पडली आहे. कारण इन्टरच्या अभ्यासक्रमांत त्यांची कविता असल्यामुळें ती माझ्या नुकतीच वाचनांत आली होती व त्यातील सौंदर्यानें मी इतका हुरळून गेलों कीं संस्कृत भाषेला जसा कालिदास किंवा वंगभाषेला जसे टागोर तसा मराठीला बालकवि असें मला वाटूं लागलें. बालकवींची कविता वाचण्यापूर्वी त्याचें नांव मात्र मी उडत उडत ऐकलें होतें व इतर

अनेक नांवांप्रमाणें विसरूनहि गेलों होतो. पण त्यांची कविता वाचल्यावर मात्र तें अगदीं हृदयावर कोरलें गेलें व जरी त्यांच्या कवितेचें अनुकरण करण्याचा मी जाणता प्रयत्न केला नाही तरी आत्मयज्ञ कवितेला तिचेंच वळण लागलें आहे हें माझ्या रसिक मित्रांनी माझ्या ध्यानांत आणून दिलें. इतकें असलें तरी अजूनही मला कालिदास किंवा सावरकर यांच्या कवितेप्रमाणें बालकवींची कविता पुनःपुनः वाचावीशी वाटत नाही. याचें कारण काय असावें हें माझें मलाच कळत नाही. मला आवडणाऱ्या कवींपैकी र. टागोरांच्या काव्याचीहि अशीच स्थिति आहे. त्यांचीं काव्यें देखील मी पुनःपुनः वाचीत नाही ; पण त्यांच्या अप्रतिम सौन्दर्याबद्दल मात्र मला पुरेपूर प्रतीति आहे. यामुळेंच त्यांचें अनुकरण करण्याचा मी बुद्धिपुरःसर प्रयत्न केला आहे. 'जम्मत' या शिशुगीतावर Crescent Moon ची छाया आहे, 'मानिनीस' या प्रेमगीताचा थाट थोडाबहुत Gardner मधील प्रेमगीतांसारखा आहे, आणि 'गोड हुरहूर' ही कविता if my staying here sets your heart aflutter' या कवितेची एका-दृष्टीने समस्यापूर्तिच आहे हें चतुरस्र वाचकांस न सांगतांही कळून येईल. 'नलिनीचें विरहगीत' या काव्यांत मी Mother 'the young prince will pass by our door' या गीताचें अनुकरण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे.

एकीकडे टागोरांच्या गीतांचा माझ्या कवितेवर याप्रमाणें परिणाम होत असतां दुसरीकडे खाण्डेकरांच्या रूपककथांनीहि तिला एक वळण लावलें, व त्याची परिणति 'हंस आणि बेडूक' व पुनर्मीलन' या कवितांत झाली. कालिदासीय पद्धतीच्या उपमाउत्प्रेक्षा साधण्यात मला जें यश आलें त्यावरून माझ्या ठायीं कल्पनाशक्ति पुरेपूर आहे याची मला खात्री पटली. पण कल्पनेने केवल उपमा अलङ्कारांचीच रेलचेल करून सोडण्यांत माझ्या प्रतिभेला समाधान वाटेनासें झालें. तिला कांहि तरी दुसरें विशाल द्वार पाहिजे होतें व खाण्डेकरांच्या पद्धतीच्या रूपककथा पद्यांत लिहिल्याने तें मिळण्यासारखें होतें. म्हणून मी एखादी सुन्दर उपमा किंवा कल्पना सुचताच ती एखाद्याच श्लो

कांत न गोवतां खाण्डेकरांप्रमाणें तत्त्वबोधक रूपककथांत गावूं लागलों. यावरून या रूपककथा म्हणजे जुन्या उत्प्रेक्षांचेंच नवें व मोहक स्वरूप आहे अशी माझी खात्री पटली. या विधानाचें साक्षात् प्रत्यन्तर म्हणजे गडकऱ्यांची 'गुलाबी कोडें' ही कविता होय. जुन्या संस्कृत कवींनी " पश्चिमेची लाली पूर्वेवरही पसरते. जशी एका गालावरील चुम्बनाची लाली दुसऱ्याही गालावर पसरते तशी !" अशी एकच उत्प्रेक्षा करून या कल्पनेची वासलात लाविली असती. पण गडकऱ्यांनी तिचेंच एक स्वतंत्र गीत बनवून ती जास्त वैशद्याने व परिणामकारकतेते माण्डून दाखविली आहे. याप्रकारच्या कविता लिहिल्यास कल्पनाशक्तीचा प्रभाव जुन्या वळणाच्या उपमा उत्प्रेक्षा करण्यांत न दाखवितां नव्या पद्धतीचीं छोटीं गीतें रचण्यांत दाखवतां येऊन अभिजातपणा व नावीन्य दोन्ही साधत असल्यामुळें मी नेहमी आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग त्यांतच करण्याचा प्रयत्न करीत असतों.

आतांपर्यंत फक्त एक कविता (आत्मयज्ञ) सोडून माझ्या प्रतिभेची निर्मिति व विकास कल्पनाप्रधानच होतीं हें दिसून येईल. पण कल्पनेबरोबरच–प्रो. बनहट्टींचें मयूरकाव्यविवेचन वाचून भावनाही कवीची एक आवश्यक वृत्ति आहे याची मला खात्री पटली व भावना आणि कल्पना जीत अगदी एकजीव झाली आहेत तेंच परमोच्च प्रतीचें काव्य असें मला वाटूं लागलें. बालकवींची 'बाळें तीं खेळत होतीं,' गडकऱ्यांची 'राजहंस माझा निजला' सावरकरांची 'सागरा प्राण तळमळला' हीं अशातऱ्हेच्या कवितांचीं उदाहरणें होत. 'या फेनमिषें हससि निर्दया कैसा' या ओळीत निव्वळ कल्पनेचें किंवा निव्वळ भावनेचें सौंदर्य नाही, तर हीं दोन्ही प्रकारचीं सौन्दर्यें तींत एकजीव झालीं आहेत. सागराच्या पाण्यावरील फेसाला त्याचें तुच्छतापूर्वक हास्य समजणें ही कल्पना झाली. व तें तसें समजून दुःखित होणें ही भावना झाली. या दोन्ही वृत्ति वरील ओळीत प्रकट झाल्या आहेत. त्याचप्रमाणें विरहोच्छ्वासातील 'मी शब्द लिही, अर्थ त्यातला आणी, ने पुसुनि नयनिंचें पाणी' ही ओळ भावना व कल्पना यांच्या तादात्म्याचें उत्कृष्ट उदाहरण आहे. शब्दातील

अर्थ एखाद्या जड वस्तूप्रमाणें अश्रूंनी वाहून जाणें ही कल्पना झाली, पण ती 'मी विरहदु:खामुळें अर्थशून्य झालेलीं प्रेमगीतें गातों आहें' या विरही पुरुषाच्या मन:स्थितीचें उत्कृष्ट चित्रण करीत असल्यामुळें वरील ओळीत भावनाही ओतप्रोत भरलेली दिसते. अशातऱ्हेचें तादात्म्य सावरकरांच्या 'विरहोच्छ्वासा' दि काव्यांत पूर्णपणें आढळतें, व म्हणूनच तीं मला आवडतात. कल्पनाविहीन कविता पहिल्या प्रथम जरी मनाला हलवूं शकल्या तरी त्यांचा परिणाम फार वेळ टिकत नाही. शाकुंतलाच्या चवथ्या अंकातील करुणरस उत्तररामचरित्राच्या तिसऱ्या अंकातील करुणरसापेक्षा ज्यास्त चिरपरिणामी ठरतो तो याचमुळें. 'विरहोच्छ्वास' व 'विरहतरंग' या दोन काव्यातील भेदहि अशाच प्रकारचा असल्यामुळें पहिलें दुसऱ्यापेक्षा जास्त काल मनाची पकड घेतें. असो. तर अशातऱ्हेचें भावमधुर व कल्पनात्मक काव्य लिहिण्याची महत्वाकांक्षा मला वाटूं लागली व ती एका रात्रीं लवकर झोप न आल्यामुळें लवकरच सफळ झाली. प्रख्यात क्रान्तिकारक बालमुकुन्द व त्याची प्रेयसी रामरखी यांच्यावरील प्रसंगाने माझ्या मनाचा आधीच ठाव घेतला होता व त्या रात्रीं तोच प्रसंग मनापुढे उभा राहून बालमुकुंदाचें रामरखींला उद्देशून केलेलें भाषण मला स्फुरलें. तें लगेच सकाळीं पद्यबद्ध केलें. अशातऱ्हेने 'बलिदान' या काव्याला सुरवात झाली. पुढें जसजसें सुचत गेलें त्याप्रमाणें रामरखींचें त्या भाषणाला दिलेलें उत्तर लिहून हें काव्य पूर्ण केलें. माझ्यामतें माझ्या सर्व कृतींत हें काव्य उत्कृष्ट आहे. मी तें स्वत:च-मला गाणें बिलकुल येत नसलें तरी-अनेकदा चालींवर म्हटलें आहे; व अशी कृति स्वत:कडून निर्माण झाली म्हणून धन्यता मानून घेतली आहे. असो, आतां या काव्यातील कल्पनेच्या पद्धतीबद्दल थोडें लिहून माझ्या काव्यसंसाराचा हा इतिहास आटपता घेतों. संस्कृत साहित्यशास्त्रात ज्याला अलंकारध्वनि म्हणतात त्यापद्धतीचें अलंकार मला प्रथम सावरकरांच्या 'विरहोच्छ्वास' काव्यांत आढळले. स्पष्टपणें अमुक वस्तु अमुक वस्तुसारखी आहे असें सांगणें हा 'उपमा' अलंकार झाला. पण नुसतें तसें सूचित करणें हा उपमालंकाराचा ध्वनि झाला. उदाहरणार्थ विरहाग्नीने पुष्ट अरू हे

आणी, विरहाग्नि पुष्ट अश्रूंनी ' या ओळीत विरोध दाखविणारा अलंकार सूचित केला आहे. 'अश्रु' म्हणजे पाणी, तेव्हां ते अग्नीला चेतवूं शकणार नाहीत पण विरहाग्नीला अश्रूपासूनच चेतना मिळते हा तो विरोध होय. स्पष्ट अलंकार साधावयाचा झाल्यास "पाणी आणि अग्नि यांचा विरोध व्यवहारांत दिसतो. "पण काय आश्चर्य! अश्रू विरहाग्नीला मारण्याऐवजी उलट वाढवितातचच ' असें म्हणावें लागेल. पण वरील ओळीत असें न म्हणतां तसा भाव नुसता सूचित केला आहे. कल्पनेचें भावनेशीं तादात्म्य साधावयाचें असेल तर अज्ञातऱ्हेनेच अलंकार साधले पाहिजेत व माझ्या मतें 'बलिदान' काव्यांत याच तऱ्हेने कल्पनाविलास प्रकट झाला आहे. 'कीं फुलाहुनी निखाराच मज रुचतो' 'दो मरणांचा प्रेमयोग निमिषांस, निर्मितसे अमरत्वास' 'तू मजलागीं चुम्बुनि कां देवीला देशील भुक्त हव्याला!' इत्यादि ओळी याची साक्ष पटवितील.

आतांपर्यंत केलेल्या आत्मनिवेदनावरून कुणी विचारील 'काय हो! तुमचा काव्यसंसार अनुकरणावर व परपुष्टतेवरच चाललेला दिसतो. 'या कवीत खरी प्रतिभा मुळींच नसून याच्या चार ओळी चोर, त्याच्या चार ओळी चोर असें करुन आपलें काव्य याने तयार केलें आहे' असेंही कुणी म्हणतील. श्री. माडखोलकरांनी देखील your inspiration is drawn from books and not from life असें मला स्पष्टच बजावलें आहे. तरीपण वरील आक्षेप फारच थोड्या अंशीं खरे आहेत व त्यापासून निघणारी 'या कवीत मुळींच प्रतिभा नाही' ही परिणति तर माझ्या आत्मनिरीक्षणाच्या दक्षिणोत्तर विरुद्ध आहे. खरी गोष्ट अशी आहे की पुष्कळ लोक समजतात त्याप्रमाणें कवि हा स्वयम्भू ब्रह्मदेव नसून जाणता कलावन्त (conscious artist) आहे. जगातील नामांकित चित्रकार सुद्धा स्वतःच्या मतें अगदीं आदर्शभूत असलेली एखादी कृति डोळ्यासमोर ठेवून तशीच कला निर्मिण्याचा यत्न करीत. त्याप्रमाणेंच मीहि जगातील माझ्यामतें अव्वल दर्जाच्या ठरणाऱ्या कवींच्या कृति केवल शैलीचा आदर्श म्हणून डोळ्यापुढे ठेवल्या व त्यांची शैली उचलून माझ्या अन्तरींच्या भावना व मलाच

स्फुरलेल्या कल्पना तींत ओतल्या. या तऱ्हेच्या काव्यनिर्मितीला परपुष्टता म्हणतां येत असेल तर खुशाल म्हणा. मला त्यांत आनन्दच आहे. Inspiration from books व inspiration from life याचा श्री. माडखोलकर निश्चितपणें काय अर्थ करतात ते मला माहीत नाहीं. पण inspiration from life या शब्दप्रयोगाचा सामाजिक जीवनापसून मिळालेली स्फूर्ति असा अर्थ त्यांना अभिप्रेत असावा असें वाटतें. या अर्थानें सामाजिक जीवनापासून उत्स्फूर्त झालेली लेखणी आख्या भारतवर्षांत तरी एकाददुसरीच असेल. कारण समाजजीवनाच्या अथांग सागराचा ठाव घेण्याची संधि 'मनुष्याणां सह स्रेषु' एखाद्यालाच मिळते व तशी मिळाल्यावरही त्याचा ठाव घेण्याची कुवत तर त्याहूनही थोड्या लोकांत असतें. तेव्हां जीवनापासून 'स्फूर्ति' याचा अर्थ सामाजिक जीवनापासून स्फूर्ति" असा न करतां" वैय क्तिक जीवनापासून स्फूर्ति" असा केला पाहिजे. अर्थात् समाजाशिवाय व्यक्ति राहूं शकत नसल्यामुळें व्यक्तिजीवनाला आवश्यक असलेलें समाजजीवनही त्यांत आलेंच. या दृष्टीनें पाहिलें असतां माझी प्रत्येक कविता माझ्याच जीवनातून उत्स्फूर्त झालेली आहे हें मी सांगूं शकतों. त्यातील एकूणएक भावना मी स्वतः अनुभविलेल्या आहेत व एकूणएक कल्पनांचा तन्मयतेने रसास्वाद घेतल्या-वरच त्या ग्रथित केल्या आहेत. त्या कवितांत कदाचित् सामाजिक आशा आकांक्षांचें प्रतिबिम्ब दिसत नसेल, पण माझ्या वैयक्तिक आशा आकांक्षांचें माझ्या कविता हेंच मुख (mouthpiece) आहे. शिवाय एखाद्याच्या कवितांत व्यवहारविमुखता, स्वप्नाळूपणा, अवास्तवता, इत्यादि गोष्टी असल्या तर त्या कविता जीवनविमुख कशा ठरतात हेंच मला कळत नाही. अशा कविता लिहिणाऱ्या कवीचें जीवनच मुळीं स्वप्नाळू व अवास्तव असतें, तेव्हां त्याच्या कविता त्याच्या वैयक्तिक जीवनाशीं सुसंगतच असतात असें म्हटलें पाहिजे. शिवाय जीवनाभिमुखतेची आरोळी ठोकणाऱ्या साहित्यिकांचें साहित्य भारतीय समाजाला जितकें विमुख आहे तितकें वरील तथाकथित स्वप्नाळू कवींचें खास नाही. आपल्या समाजांत अजूनही संतवाङ्मयाच्या काळचीच मनोवृत्ति आहे व कोणत्याही समाजवादी

कलावंतापेक्षां अशा भक्तिसंप्रदायी कवींचीच समाजावर जास्त पकड असते हे तुकडेमहाराजादि आधुनिक भक्तकवींच्या उदाहरणावरून सहज दिसून येईल. आजचें मराठी साहित्य केवळ पाश्चात्य साहित्यावर जगूं पहात आहे. आपल्या वाङ्मयातील स्थित्यन्तरें आपल्या समाजातील स्थित्यन्तरांचें प्रदर्शक नसून पाश्चात्य वाङ्मयातील स्थि यन्तरांचेच क्षीणावलेले पडसादे असतात. ते पडसाद पाहिजेत तितके मुळाबरहुकूम उठत नाहीत म्हणूनच कित्येक सुज्ञ साहित्यिकांना दुःख होत असतें हे पाहून आश्चर्य वाटतें ! ’ स्कॉट जुना झाला तरी आपले लोक त्याच्याच कादम्बऱ्या वाचण्यात चूर आहेत. अहो आजच्या ताज्या रशियन फ्रेंच इत्यादि कादम्बऱ्या वाचा ’ अशी ओरड हरघडीं ऐकूं येते. अशी ओरड करणारासारखे असमंजस लोक कुठेहि सापडणार नाहीत. स्कॉट पाश्चात्य देशांत जुना ठरला ह्मणून आम्हीहि त्याला तसें ठरवावें काय ? आमचें साहित्य पाश्चात्य वाचकांच्या आभिरुचीप्रमाणें नाचलें पाहिजे हा कोण जुलूम ! कलेचा अभ्यास म्हणून पाश्चात्य साहित्याचा अभ्यास करणं कांहीं वाईट नाहीं. पण तिकडील प्रत्येक नवी फॅशन इकडे प्रस्थापिली पाहिजे हा कसला अट्टाहास ! विशेषतः साहित्यिकाने सामाजिक जीवन जगलें पाहिजे असें म्हणणाऱ्यांच्या तोंडीं तरी तो शोभत नाही.

कवितांच्या रचनाशैलीबद्दल निरनिराळीं मतें असूं शकतील, इतकेंच नव्हे तर कलेमध्यें निरनिराळे सम्प्रदायहि कलावंताच्या कलाविषयक ध्येयदृष्टीप्रमीणें वेगवेगळा संसार थाटूं शकतील. पण त्यातील एका सम्प्रदायाने दुसऱ्या सम्प्रदायाला ‘ याची कला ही खरी कलाच नव्हे, ‘ कलेचा सारा मक्ता ईश्वराने आम्हालाच दिला आहे ’ अशातऱ्हेने हिणविणें खऱ्या कलावंताच्या ब्रीदाला अगदी सोडून आहे. ‘अमुक सम्प्रदाय जुना झाला’ अशीं विधानें कलेच्या स्वरूपाबद्दल गाढ अज्ञान दर्शवितात. कारण कुणी कांही म्हटलें तरी कलेचा आत्मा सनातन आहे. हजारो वर्षापूर्वी झालेला कालिदास आजच्या कोणत्याहि कवीपेक्षा आपल्याला जास्त आनन्द देतो या साक्षात् सत्याची उपपत्ति दुसऱ्या कोणत्याहीं सिद्धान्ताने लागूं शकत नाही. सम्प्रयावादाला दुसरी अडचण अशी

कीं एखादा विरुद्ध सम्प्रदायाचा अगदी अव्वल दर्जाचा कलावन्त असला तरी त्याला स्वतःचा सम्प्रदाय आधुनिकतम नसल्यामुळें स्वतःच्या प्रतिभेची गळचेपी करावी लागते. समजा आजच्या युगातील एखादा कवि हुबेहुब कालिदासाच्या पद्धतीचीं काव्यें लिहिण्यांत पारङ्गत आहे, व त्याची प्रतिभाही कालिदासाच्या तोलाची आहे, तर अशा कवीने केवल कालिदासीय रचनापद्धति आजच्या फॅशनला धरून नाही म्हणून आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीला दडपून टाकून स्वतःला न जमणारी समाजवादी गीतें बेसूरपणे गायला सुरवात करावी काय? समजा मेघदूत कालिदासकाळी निर्माण न होतां आज लिहिलें गेलें असतें तर रसिकांनी त्याचा अनादर करणें योग्य झालें असतें काय? या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी देणाऱ्याला कलेच्या स्वरूपाची मुळींच ओळख नाही असें म्हटलें पाहिजे. माझ्या कविता जुन्या थाटाच्या असतील तर वाचकांचें वरील समर्थनाने समाधान होईल असें वाटतें. पण वस्तुतः माझ्या सर्व कवितांवर जुन्या शैलीचा शिक्का मारतां येणार नाही. या संग्रहातील बहुंश कविता नव्या पद्धतीच्याच ठरतील अशी माझी श्रद्धा आहे. शिवाय जुनी शैली व नवी शैली या शब्दांना तरी कांही अर्थ आहे काय? कांही कांही वेळा तर अगदी आधुनिकतम कवीची शैली शेकडो वर्षांनी प्राचीन ठरलेल्या कवीच्या शैलीची प्रतिकृति वाटण्या· इतकें त्या दोन शैलीत साम्य असतें. गीतांजलीतील कांही गीतें 'नासदीयसूक्ताची' किंवा इतर वैदिक ऋचांची आठवण करून देतात. टागोरांच्या कवितेवर कबीराचीहि छाप दिसून येते हें स्वतः त्यांनीच कबूल केलें आहे, व त्यांच्या Sheaves या गीतसंग्रहातील Coming of Krishna हें गीत तर बुद्धिपुरःसर मिथिलच्या 'विद्यापति' या कवीच्या शैलीचें अनुकरण करण्यास लिहिलें आहे असें त्याच पुस्तकांत पायटीपेत नमूद केलें आहे. ही उदाहरणे समोर असतांना 'जुनी शैली' हा शब्द कवितेचा वैगुण्यदर्शक म्हणून वापरण्याचें कुणाला धैर्य होईल असे वाटत नाही. आधुनिकतम ठरण्याच्या नादीं लागून काणेकरांनी आपल्या कवितेची कशी दुर्दशा केली हे मराठी वाचकांना माहीतच आहे. मनांत सहज स्फुरणाऱ्या यौवनातील

प्रणयभावनेचें जोपर्यंत त्यांनी आपल्या काव्यांत प्रामाणिकपणें चित्रण केलें, तोपर्यन्त तें जिवन्त व सुन्दर वाटत होतें, पण फॅशनच्या नादीं लागून संप आणि समाजवाद कवितेत ओतण्याचा त्यांनी स्वतःच्या प्रकृतीला न मानवणारा कृत्रिम प्रयत्न केल्याबरोबर त्यांच्या कवितेच्या चिंधड्या उडाल्या. तेव्हा टीकाकारांनी एका विशिष्ट शैलीची केवळ ती आधुनिक आहे म्हणून कवीवर जबरदस्ती करूं नये हेंच उत्तम. कलेतील एखादा सम्प्रदाय मूलतःच वाईट असल्याशिवाय त्यावर शस्त्र धरणें योग्य नाही. बाणभट्टाच्या काळचा लांब समासाचा व अगडबम्ब रचनेचा सम्प्रदाय कलेच्या प्रकृतीलाच विघातक असल्या-मुळें टाकाऊ ठरतो; केवळ जुना म्हणून नव्हे. कोणताही कलासम्प्रदाय जर जुना म्हणून टाकाऊ ठरला असता तर त्याचें पुनरुजीवन कधीं झालेंच नसतें.

काव्याच्या अंतरंगाविषयीं ज्याप्रमाणें माझ्या कल्पना व ध्येयें बदलत गेलीं त्याचप्रमाणें त्याच्या बाह्य स्वरुपाविषयीं सुद्धा त्यांच्यांत फरक होत गेला. पूर्वी मी संस्कृत वृत्तांचा भोक्ता होतो. अर्थात् ज्या कारणाने संस्कृत वृत्तयोजनेला मी उचलून धरी तें कारण अजूनही पटण्यासारखेंच असलें तरी माझें संस्कृतवृत्ताबद्दलचे प्रेम मात्र पूर्वीसारखें उरलें नाहीं. गेयता हा काव्याचा महत्वाचा विशेष असल्यामुळें कविता गाण्याच्या चालीत लिहाव्या हें योग्य आहे, पण पुष्कळसे काव्यवाचक उत्कृष्ट रसिक असले तरी गाण्याचा त्यांना गन्धही नसल्यामुळें अशा संगीतबद्ध कविला ते तन्मयतेने आस्वादू शकत नाहीत, तेव्हां संगीताचे ट, फ, ही येत नसलेल्या वाचकाला सुद्धा चालीवर वाचतां येतील इतपत तरी कवितेच्या छन्दांना बन्धन असावें. मुक्तच्छन्दाचा प्रचार मला अनिष्ट वाटतो तो यामुळेंच व पूर्वी संस्कृत वृत्तांचा उपयोग मला आवश्यक वाटे तोही याचमुळें. पण मराठी काव्याचें वाचन जसजसें वाढत गेलें तसतसें मराठी जाति संस्कृत वृत्तांपेक्षा जास्त मधुर असून सुद्धा संगीतानभिज्ञ माणसालाही चालीवर वाचतां येतात हें मला कळून चुकलें व मी मराठी जातीचा पक्षपाती बनलों. चन्द्रकान्त, अक्रूर, उद्धव इत्यादि जाति कोणत्याही संस्कृत वृत्ताइतक्याच म्हणण्यास

सुलभ व अधिक कर्णमधुर आहेत. शिवाय त्या रचण्यास संस्कृत वृत्तांच्या मानाने फारच कमी प्रयास पडतात. तेव्हां याप्रमाणें सर्व दृष्टींनीच मराठी वृत्तें आदर्श असल्यामुळें तींच सर्रास वापरण्यात यावीत. भावनांच्या अस्खलित प्रकटीकरणास देखील या वृत्तांसारखी योग्य वृत्तें संस्कृतांत नाहीत. पुराणोत्तर संस्कृत वाङ्मयाचा स्थायिभाव भावना हा नसून कल्पना हा आहे तेव्हां त्या काव्यांना संस्कृत वृत्तें योग्य ठरलीं पण संस्कृताचा प्रचार लोपून भारतीय काव्य लोकाभिमुख झाल्यावर संस्कृत भाषेप्रमाणेंच संस्कृत वृत्तेंही अयोग्य ठरून उत्कट भावनाविष्कारास योग्य अशीं नवीं भाषावृत्तें (meters of the spoken language) निघालीं. आज देखील काव्यांत कल्पनांचें स्थान बरेंच कमी झाल्यामुळें अभिजात कवीदेखील मराठी वृत्तच पसंत करतात. माझ्या काव्याचा वृत्ताबद्दलचा विकास तरी याप्रमाणें आधुनिक दृष्टीकडे झुकला हें माझे टीकाकार कबूल करतील असें वाटतें. वृत्ताबद्दल याप्रमाणें माझे विचार निश्चित होत गेले तरी मराठीभाषा प्रगमनाच्या स्थितीत असल्यामुळें, एका बाबतीत मात्र फार घरसोड झाली आहे व ती म्हणजे जोडाक्षराच्या पूर्वीच्या अक्षराच्या दोन मात्रा समजणें ही होय. 'समरव्रत' या शब्दांत 'व्र' हें जोडाक्षर असल्यामुळें त्याच्या मागच्या 'व' या अक्षरावर जोर देऊन त्याच्या दोन मात्रा मोजण्याची पद्धत संस्कृतात आहे व जोडाक्षराच्या उच्चारसौकर्याच्या दृष्टीने ती रास्तच आहे. पण मराठीत निदान आधुनिक काळीं तरी हें बंधन कुणी काटेकोरपणाने पाळल्याचें दिसत नाही. याप्रमाणें रूढीचा नियम मराठीत नसल्यामुळें मीहि तो पाळण्याकडे विशेष लक्ष दिलें नाही. शिवाय 'ऋ' हें व्यंजन न समजतां स्वर समजला गेल्यामुळें ऋसंयुक्त अक्षरांना जोडाक्षर न समजतां त्याच्या मागच्या अक्षराची मात्रा द्विगुणित करण्याची संस्कृतांत पद्धत नाही. 'अमृत' या शब्दांतील 'अ' वर जोर न देतांच त्याचा उच्चार करण्याची पद्धत आहे. संकृत भाषेत हे दोन्ही प्रकार सर्वमान्य झाल्यामुळें संकृत वृत्तरचनेत ही शिस्त राहिली आहे. पण मराठीत मात्र ऋला कधी व्यन्जन समजून संयुक्त अक्षराच्या मागच्या अक्षरावर जोर देतात तर कधी त्याला

स्वर समजून साधाच उच्चार करतात. मराठी वृत्तरचनेतच याप्रमाणें बेशिस्त माजल्यामुळें माझ्या कवितांतही रूढिबन्धनाच्या अभावीं ती कायम राहिली आहे. खरें म्हटलें तर माझ्या मताप्रमाणें ऋचा उच्चार रुपेक्षा निराळा नसल्यामुळें 'अमृत' असें न लिहितां 'अम्रुत' असेंच लिहावें व 'अ' वर जोर द्यावा हेंच सयुक्तिक आहे. शिवाय सर्वच जोडाक्षरांच्या मागच्या अक्षरांवर संस्कृतांप्रमाणें जोर देऊं नये. जसे 'नव्या' यातील न चा उच्चार द्विमात्रक करूं नये. साधारण असें म्हणतां येईल कीं 'य' व 'ह' यांच्याशी युक्त होऊन तयार झालेलीं जोडाक्षरें 'संयुक्ताद्यं गुरु' (जोडाक्षराच्या मागील अक्षर गुरु) या नियमाखाली विकल्पाने आणावीं. माझ्या या कल्पनां-प्रमाणें प्रस्तुत संग्रहातील कवितांची रचना झाली नाही याचें कारण वर सांगितलेंच आहे. यमकांबद्दल मी फक्त स्वराला स्वर जुळविण्याची काळजी घेतली आहे. व्यंजनें जुळविण्याची विशेष खबरदारी घेतली नाही हें दिसून येईल. बालकवींनी देखील असेंच केलें आहे. स्वर जुळले म्हणजे व्यंजनें न जुळलीं तरी तें लक्षांत येत नाही व निर्यमकता जाणवत नाही. तेव्हा निर्यमक कवितेच्या पुरस्कर्त्यांनी याचप्रकारें निर्यमकता साधल्यास रसभंग होणार नाही. स्वराचीहि भिन्नता असल्यास मराठींत तें एकदम कर्णकटु वाटतें व कविता वाचावशीच वाटत नाही.

माझ्या काव्यांची स्थूल कल्पना वरील विवेचन वाचून होईल असें वाटतें. त्यावरून माझी साहित्यविषयक मतें आधुनिकांना कदाचित् मान्य होणार नाहीत, तथापि त्या मतांची विस्तृत मानस-शास्त्रीय व पारमार्थिक (metaphysical) चर्चा केल्यास कुणाही शुद्ध बुद्धीच्या माणसाला ती अमान्य होणार नाहीत अशी माझी श्रद्धा आहे. पण तशी चर्चा येथे करण्यांत कांही औचित्य व स्थलही नसल्यामुळें, मी त्या प्रयत्नात आहे व लवकरच कला व साहित्य यांच्यावरील मूलगामी विवेचन वाचकांस सादर करीन एवढेंच सध्या आश्वासन देऊन वाचकांना फार वेळ कुंजांतच अडकवून न ठेवतां 'कूजन' ऐकण्यास नेतों.

रसिकांचा नम्र,

हुताश

## कालिदासगौरव

(द्रुतविलंबित)

कविकुलोत्तम भारतवैभवा
हृदयतोष अनुक्षणें[१] तो नवा
तव कावित्व करी रससुंदर
त्वरित घालवि सर्व मनोज्वर १

भृकुटिभंग विलोकुनि काम तो
निजशरासनगर्वहि सोडितो
तव कला कलहंसगतो[२] अशी
नयनमोहक कामिनि कीं जशी २

जशि लतांत दिसे नव मल्लिका
रुचिर ती सुमनांत मृणालिका
कविवरा कवितांत सुता तव
विलसते सुभगाकृति पेलवें[३] ३

शशिसुधेस चकोर सुखें पिती
भ्रमर सेवितसे मधु मालती
रसिकवृंद तसा कवितारस
तव पितात नितांत निरागसें[४] ४

रतिविलाप कलाकुशला तव
करुण तो करितो मन विक्लव
जरि करी मन विक्लव सांद्र तो
रसविशुद्ध सुखा तरि अर्पितो ५

---

(१) प्रतिक्षणीं (२) गत = गति (३) पेलव = नाजुक (४) निरागस = निर्दोष

दयित इंदुमती सुमसंगमें
विगत हो नलिनी हिमसंगमें
अज विलाप करी मग दारुण
करित जो सलिलाविल लोचन ६

विरहित प्रमदातुर यक्ष तो
निज उदन्तें[१] घनाप्रति सांगतो
तव कवित्व तदा पदसुंदर
हृदय मोहवितें मम निर्भर ७

पतिगृहीं परिणीत शकुंतला
प्रियजना त्यजुनी अलिकुंतला
जइं निघे, करुणारसपूर तो
बहुविधा मम मानस वेधितो ८

जानेवारी १९३८

(१) उदन्त = बातमी

# कुमारसंभवातील वसंतवर्णन

[शंकराच्या मनांत पार्वतीविषयीं अभिलाषा उत्पन्न करण्यासाठी मदन आपली पत्नी रति व सखा वसंत याला घेऊन स्थाणुवनांत इन्द्राच्या आज्ञेप्रमाणें अवतीर्ण झाला. त्यावेळी योग्य क्रमाला सोडून वनश्रीने वसंत ऋतूतील सौंदर्य कसें धारण केलें त्याचें कालिदासाने कुमारसंभवांत सुंदर वर्णन केलें आहे. त्याचा अनुवाद खालीं दिला आहे.]

[ वसंततिलका ]

येतां वसंत रवि संतत दीप्तरश्मी
लंघी धनाधिपदिशा¹पथ शीघ्रगामी
दिग्दक्षिणा समये² टाकुनि नाथ सोडी
निःश्वास मन्द मधुगन्धित तोंचि काढी १

शाखावरी मृदुल पल्लव पुष्पपंक्ती
ऐसा अशोकतरु शोभतसे वनांतीं
पादाहतीविण मनोहर सुंदरींच्या
क्रीडावनांत मदनांतक शंकराच्या २

चूतांकुरें नयनमोहक गंधशाली
त्यामाजि भृंगतति गुंजति गायनाली
बाणावरी जणु मनोरम मंजरींच्या
नामाक्षरा मधु रची रतिवल्लभाच्या ३

वर्णप्रकर्ष अति तोषवि लोचनांतें
निर्गंधता परि मनासि विषाद देतें
ऐसें विलोकुनि वनीं सुम कर्णिकार
वाटे प्रजापति न सर्वगुणीं उदार ४

---

(१) धनाधिपदिशा = उत्तर दिशा (२) समय = (१) वेळ (२) संगम

बालेंदुवक्र अतिरक्त पलाशपंक्ति
किंचित् विकासित सुरम्य विराजताती
झाली वसंतरत रम्य वनस्थली ही
शोभे स्तनावरि, नखक्षति कीं तिच्या ही ५

भृंगालिने तिलकें[1] संकुल जो विलासे
भालीं वसे तिलक साञ्जन तोचि भासे
चूतांकुरोष्ठ वितरी तरुणारुणश्री
सौंदर्यशालिनि अशी विलसे मधुश्री ६

मंदानिलें कुसुमरेणु सुगंधि नेती
वन्य स्थलीं हरिणलोचन पीडिताती
जेथे समीरण करी तरुपर्णपात
कर्णासि मर्मररवें सुखवी नितांत ७

हे सेविती पिक नवोदित मंजरीला
त्याकारणें विकिरती स्वरमाधुरीला
ऐशा सुखें परिसुनी स्मरभारतीला
त्या मान[2]दक्ष युवती त्यजिती मदाला ८

येतां वसंत हिम सर्व निघोनि जाई
तेणें सुचारु अधरोष्ठ विशुद्ध होई
आरक्त पत्ररचनां[3]वरि घाम साचे
तैसें, दिसे वदन पाण्डुर, किंनरींचें ९

ऐशी अकाल निरखूनि मधुप्रवृत्ति
होती तपोधन वनस्थ विलोलवृत्ति
यत्नें परी परम दुर्दम वासनांना
नानापरी करिति रुद्ध समुद्धतांना १०

---

(१) तिलक नावाचें फूल असतें (२) मान = रुसवा (३) पूर्वी स्त्रिया आपल्या छातीवर रंगाच्या नक्षी काढीत असत त्यांना पत्ररचना म्हणतात.

येतां, असा रतिसवें स्मर पुष्पधन्वा
जो तोषदायक गमे विपदार्त देवा,
स्नेहानुरक्त मिथुनें विपिनीं शिवाच्या
श्रृंगारकेलि करिती रतिभाववाचा ११

येतां अनंग मकरंद मिलिंद पीती
पुष्पावरी सखिसमेत विलोलरीती
श्रृंगें मृगीस मृग खाजवि चंचलाक्षी
ती होय तत्सुखदकण्डुनिमीलिताक्षी १२

गण्डूषतोय सरसीरुहरेणुगंधी
देई गजास करिणी रत कामगंधीं
अर्धोपभुक्त बिसतंतु रथांगनामा
प्रेमें समर्पुनि करी परितुष्ट रामा १३

गानश्रमें पसरले लव घर्मजाल
वक्षःस्थलीं विखुरले मग पत्रजाल
पुष्पासवें नयन चंचल रम्य होती
ऐसें प्रियावदन किन्नर चुंबिताती १४

पर्याप्त पुष्प न च हें स्तन बालिकेचे
रक्तप्रवाल न च सुंदर ओष्ठ साचे
शाखा विनम्र न च या भुजबंधनांत
झाडें लतारमणिच्या पडलीं सुखांत १५

एप्रिल १९३८

---

(१) जोडपीं

६

# चन्द्रहास

दैवें ज्याला प्रथितविभवें राक्षिलें सर्वकालीं
पीडा त्याला करि जन असा कोण सामर्थ्यशाली ?

(चन्द्रहासाची कथा महाभारतांत प्रसिद्धच आहे. या कथेंत दैवाचें माहात्म्य प्रतिपादलें आहे. प्रस्तुत काव्यांत मूळ कथेंतील दुष्टबुद्धि प्रधानाला राजा बनविलें आहे व विषयेच्या विवाहाच्या पुढचा भाग आजिबाद गाळला आहे. हा फरक लक्षांत ठेवून हें काव्य वाचावें.)

# चन्द्रहास

## (१)

## पूर्वचरित

(वसंततिलका)

वागर्थवन्निकट संगत जे रहाती
मातापिता प्रणययुक्त, जगास होती
वागर्थयुक्त करण्या निज भारतीला
मी वंदितों प्रथम त्या शिवपार्वतीला १

होता प्रसोम नृपती पति केरलाचा
जैसा पुरंदर[1] धुरंधर[2] नंदनाचा
लोकांचिया करितसे परिपूर्ण कामा
तेजें जिताङ्कधर[3] होय यथार्थनामा २

मेधावती युवति त्या नृपसत्तमाची
होती सती जणु रती कुसुमायुधाची
त्याचा नवेंदुसम नंदन[4] चंद्रहासें[5]
होता गुणैकनिधि नंदन[6] चंद्रहास[7] ३

काळें बलाढ्य परचक्र नृपावरी ये
युद्धीं प्रसोम हत होय सुरालया ये
शत्रू पुरांत शिरुनी करिती विनाश
त्या ऋद्ध केरलपुरीस यथाभिलाष ४

मेधावती पतिविनाश असह्य भारी
दासीमुखें परिसुनी उर तें विदारी

---

(१) इन्द्र (२) धुरा धारण करणारा (३) अंकधर=चंद्र (४) आनंददायी (५) चंद्रासारखें हास्य आहे ज्याचें असा (६) मुलगा (७) नायकाचें नांव

चित्तीं विचार करि त्यासह जावयाचा
देहा समर्पुनि चितेवरि राजयाच्या ५

तों तत्क्षणीं स्वर नतोन्नत रोदनाचा
सौधांतरीं परिसुनी वनिता सुताचा
दोलायमान मन होउनि आंत जातां
दृष्टीं दिसे तनय होय विषण्ण माता ६

निद्रिस्त तो तनय सुंदर भूपतीचा
शुभ्रांशुकावृत शुभानन सौम्य साचा
श्वेतांबुदावृत कलांश जसा शशीचा
किंवा हिमाम्भवृत अंकुर माधवीचा ७

आंदोलनें अनिल लोल करी सुकेश
भालावरी भुरुभुरू उडती अशेष
होती विलोहित[1] कपोल कचाहतीने
स्निग्धोष्ठही कमलवर्ण मुखानिलाने ८

सारी मुखावरिल कुंतल ती कराने
जो कोमला कदलिला परिखिन्नते ने,
सारी परी बदनलुब्ध पुनः पुनः ते
येती तयावरि न मानुनि सारणाते ९

पुत्रा विलोकुनि सती करुणार्द्र चित्तीं
होई, म्हणे "जरि सुतास रिपू पहाती
त्या मानुनी तनय केरलभूपतीचा
ते मारितील; जगतीं रिपुवृत्ति नीचा" १०

ठेवीन मी जरि चितेवरि देह माझा
कोणी शरण्य न वरेण्य सुतास माझ्या
माझा न यास्तव सुयोग्य चिताप्रवेश
चिंती असें युवति खिन्नमना निराश ११

(१) लाल

ऐशा विषादतिमिरीं परि तंतु एक
तीतें मिळे हृदयदाहजलाभिषेक
बोले मनास, 'परमेश्वर निर्मिता या
आहे समर्थ मग रक्षणही कराया' १२

ऐसें वदोनि सति जाय सती पुरांतीं
त्या बालका सदनिं सोडुनि निश्चयांतीं
दासी परी परम वत्सल त्या सुताची
घेवोनि जाय विषयांतरिं, त्या न वंची १३

ती पातली फिरत कुंतलपत्तनांत
जीतें प्रशासि वसुधाधिप शक्तिमन्त
त्यातें प्रजा म्हणतसे नृप दुष्टबुद्धि
नामें तसाच कृतिने खल तो कुबुद्धि १४

संपन्न त्या नृपपुरीं मग नित्य दासी
भिक्षेसि मागुनि करी सुतपालनासी
कालें परी हरियलें तिजलाहि जी हो
मानेसमानचि तयास सुवत्सला हो १५

प्रेमें परी जन पुरांत दयाविशेष
तत्पालनास करिती सुतनिर्विशेष
तो यापरी दिवस घालवि चंद्रहास
दैवेंचि रक्षित न अन्य शरण्य त्यास १६

तो एकदा निजवयस्यसमागमांत
धूळींत केलि करितां सुत रत्नकांत
मार्गांत गालव पुरोहित चालला जो
त्याच्या पडे दृगयनीं, शुभ दर्शनीं जो १७

अंगावरी वसन जीर्ण वसें तयाच्या
रंध्रांतुनी सुतनु गौर दिसे जयाच्या

(१) देशांतरीं

कादम्बिनी विरल वायुपथीं विलासे
ज्योत्स्ना विकीर्ण जणु तीतुनि रम्य भासे १८

नेत्राम्बुजीं विलसती कचभृंग साचे
किंवा सरोजवदनीं मधुप द्वयांचे
नालापरी विशद कण्ठ विलोकुनी तो
होई पुरोहित विमोहित मानसीं तो १९

त्याचा विशाल विलसे निटिलप्रदेश
जेथे विलोल सरती सुकुमार केश
बालातपारुण कपोल विराजताती
शोभा तयास रुचिरोष्ठ सुचारु देती २०

सर्वांगसुंदर अशा बघुनी सुताला
तो गालवद्विज झणीं बहु तुष्ट झाला
बोले मनीं तनय हा अति सुंदरांग
शोभे जसा शिशुवयीं दिसला अनंग २१

त्या आणिलें मग नरेंद्रपुरोहिताने
प्रेमें नरेशसदनीं शिशुवत्सलाने
त्या एकदा द्विज विलोकुनि अंकदेशीं–
भूपाचिया, वदति तू युवराज होशी २२

शब्दा अशा परिसुनी नृप होय क्रुद्ध
चित्तीं म्हणे 'वचन होतिल काय सिद्ध?
होती; तरी मम सुता न मिळेल राज्य
मी यास मारविन यत्न करूनि प्राज्य' २३

बोलाविले मग नृशंस नृपें सुशीघ्र
मारेकरी, सुतमृगा जणु घोर व्याघ्र
त्यांना नृपाल वदला वचना अशा या
'मारा किशोरभुजगास वनांतरीं या' २४

(१) आकाशांत.

त्या अज्ञ घेउनि सत्रें मग बालकासी
ते दुष्ट जाति कुमती गहना वनासी
मध्याह्निचा समय तो प्रखरा करांहीं
तापे नभांत सविता, लव मन्द नाही २५

चाऱ्हीकडून घनदाट दिसे वनाळी
तीतून सर्पसरणध्वनि कानिं येई
पक्षीं निदाघदहनें बसती तरूंच्या
छायेंत, या समयिं हो बहु शीतता ज्या २६

चाहूल ऐकुनि परी वनिं मानवांची
तेथून ते उडति कर्कशशब्दवाची
पानांवरी, फडफडा करितांचि पंख
होती तरूंत रव मर्मर ते सुरेख २७

तापामुळें तरणिच्या गळती तृणाली
वेली मलूलवदना लवतात खाली
वायूहि शीघ्रगतिने करि, पीतवर्णा
वृक्षावरील, गगनोत्थित, शुष्कपर्णा २८

डोळ्यापुढे हरितसुंदर शैलराजी
रम्या दिसे गगन उन्नत चुम्बिते जी
निर्वृक्ष त्यावरि कुटें दिसते वनांतीं
वर्णात पाण्डुर अशी ललितस्थली ती २९

तीच्या शिरीं घन विशाल वरी विराजे
सूर्यातपें धवलता रजतापरी घे
छत्रापरी गगन अब्धिविशाल भासें
पक्षी जिथे उडत एक सुखें विलासे ३०

बाजूस शैलशिखरावरुनी प्रपात
होई विशीर्ण पडतांचि शिलातलांत

तेथून पंक्ति उडतीं मग शीकरांच्या[1]
ज्यांच्यावरी विलसती द्युति भास्कराच्या ३१

स्रोतोवहा पुढति मंदरवें निघे ती
वेगांत अश्मल पथावरुनी वनांतीं
तीरावरूनि तरु नम्र करून शाखा
त्या स्पर्शिती गतिसुरम्य तरंगलेखा ३२

तेथें शिशूसह नृघातक शीघ्र आले
दृश्या विलोकुनि सुरम्य, मनांत धाले
चाऱ्हीकडूनि मग घेउनि त्या शिशूस
त्यांनी विक्रोश असि त्या धरिल्या करांस ३३

पाहूनि ते घनवनीं यमदूत घोर
भ्याला मनीं अतिशयें मग तो किशोर
आर्तस्वरें विनवि त्यांस 'नका नका हो !
मारू अनाथ दुबळ्यास दया करा हो' ३४

त्याचीं भयार्त वचनें परि व्यर्थ गेलीं
दुष्टांस त्या किमपिही करुणा न आली
देखूनि तत्समयसृष्टिविभा, विशंक
वाटे निसर्ग करुणामय, दुष्ट लोक ३५

धावा करी मग जगत्पतिचा, शिशू तो,
जो भक्तशत्रुदलनार्थ सुशीघ्र येतो
जो दुष्टशासन करी प्रखरप्रताप
जो विश्वचालक पवित्र अगम्यरूप ३६

'देवा करी मदवनास अनाथ मी बा
ब्रीदास जागुनि करी करुणा दयाब्दा
त्वत्कीर्ति म्या परिशिली हरि दीनबन्धो !
पादाम्बुजस्मरण यास्तव धर्मसिन्धो ! ३७

---

(१) तुषारांच्या

त्वां राखिलें कुरुसभेमाधि द्रौपदीला
तैसें व्रजांत करि तू व्रजरक्षणाला
कां आजची हरपली करुणा दयाला?
मातें कसें विसरला मग लोकपाळा? ३८

आर्तावनार्थ हरि दीक्षित सर्वगामी
ऐसें तुझें चरितकीर्तन ऐकिलें मी
संग्रामधर्मचतुरा जगदादिहेतो!
तूतें स्वसंगर हरे स्मरतो न का तो? ३९

हे दुष्ट राक्षस मला वधितात आतां
देवा जरी विमुख होशिल शक्तिवंता
कीं तू मला समजुनी अति दुष्ट पापी
होशी असा विमुख, धाव विलम्ब तापी ४०

लंकाधिपोन्मथन! कंसविमर्दिदेवा
सत्पालका पिशुनशासक देवदेवा
कृष्णा उपेक्षण नको अजि रक्ष आर्ता
धाव प्रभो शरणरक्षण धाव आतां" ४१

ऐकूनि तेवि करुणामय आर्त शब्द
आला जणूं हरि जगत्पति तो दयाब्द
त्या काननीं गहन, सत्वर सिंहरूपें
गर्जे तईं प्रकट ती धरणीहि कापे ४२

ती गर्जना स्तनितवत्(१) परिसोनि उग्र
झाले भयाकुल बहू खल ते समग्र
चित्तीं विचार करितात पलायनाचा
कीं दुष्ट दुर्बलविघातक होय साचा ४३

पुच्छासि हालवि बहूर्जितसत्व तो कीं
पृथ्वीस कापवि पदास अशाच टाकी

(१) मेघगर्जनेप्रमाणें

दंष्ट्राप्रदर्शन करी फिरवी मिशा त्या
ज्या कालशंकुसम भासति प्रेक्षका त्या ४४

षष्ठांगुली मग विछेदुनि त्या शिशूची
ते दुष्ट शीघ्र पळती भयशब्दवाची
झाल्या असह्य मरणान्तिक वेदना त्या
पुत्रास जो बहुत कोमल होय जात्या ४५

तेथेच मूर्च्छित पडे सुत चंद्रहास
तीरावरी, जशि लता पडते धरेस
भानू दयार्द्र जणुं होउनि त्यावरी हो
चण्डातपा मृदु करी घनछन्न तो हो ४६

दैवें तिथे फिरत भूपति पातला तो
जो शासि चंदनपुरा अपथा न जातो
येतां वनांत करण्या मृगयारतीस
जो श्वापदानुसरणें चुकला पथास ४७

त्याला दिसे तनय मूर्च्छित तो सुगात्र
ज्याचें श्रमाम्बुपरिचार्चित होय वक्त्र
ज्याची तनू तइं दिसे बहु खिन्नकांति
नीहारवेष्टित जसा विधु क्लिष्टकान्ति ४८

त्याला दिसे कृशहि तो अति सुंदरांग
जैसा कलाक्षयवशें दिसतो शशांक
किंवा अतिप्रखरसूर्यकरें सरोज
निस्तेज जेंवि दिसते सुमराजिराज ४९

संकीर्ण कुंतल रजोवृत तेवि होती
भृंगावलीवरि सुगंधि पराग येती!
धूलींत तत्तनुहि धूसर भासताहे
जैसा विलासत धुक्यांत सुधांशु पाहे ५०

छिन्नांगुली गलितरक्त दिसे तयाची
वृन्ताच्छिदी गलितराग जशी सुमाची
तच्छोणितप्रवह भूमिवरी अशेष
तप्तार्कशुष्क दिसतो लववर्णशेष ५१

ऐशा विलोकुनि सुतास नृपाल धाला
जो वत्सवत्सल अपत्यविहीन झाला
त्याच्या मनांत अति वत्सलभाव आले
त्या वाटलें मज अपत्य दिलें दयाळें ५२

आणून तालतरुपल्लव तो नृपाल
संचालनास करि त्यावरि अल्पकाल
हातीं नदीजल सुशीतल आणुनीया
प्रक्षालिता करि तदीय विषण्ण काया ५३

त्याच्या सुखप्रद अशा उपचारकार्यें
मूर्छापरीत सुत सत्वर शुद्धिला ये
आल्या तिथें मग नृपानुचरप्रणाली
त्यांनीं व्यथा मग तदंगज दूर केली ५४

संभ्रान्त तो सुत उठे मग व्यस्तदेही
त्याला स्मरे विगतवृत्त हृदन्तदाही
बोले तयास " मज कां वधिता वदाना
सोडा मला विनवितो करुणा कराना " ५५

त्याचें भयाकुल, नृपें, मन शांत केलें
प्रेमार्द्र सान्त्वनवचें " शिशु दुष्ट गेले
आम्ही न घातक तुझे भय कां किशोरा
तू पुत्रवत् मजसि भाससि चित्तचोरा" ५६

नेई तयास मग चंदनपत्तनास
तो पुत्रहीन नृपती निज मंडलास

(१) तुटलेलें देठ (२) गळलेला आहे रस जिचा अशी (३) तापलेल्या सूर्याच्या उष्णतेमुळे वाळलेला. (४) राष्ट्रास.

तत्पालनास करि तेथ अपत्यप्रेमें
तो पुत्रही नयनसुंदर होय धामें ५७

[पृथ्वी]

सलील अनिलें जसा जलदछन्न संध्येन्दु तो
विमुक्त आणि होउनी विकसितौज कीं शोभतो
तसा तनयही नृपें हृतविपत्ति लोकां दिसे
दिनंदिन विकासतां नयनरम्य सद्वर्चसें ५८

(२)

## कुमारोदय

( वसंततिलका )

अष्टाब्द[२] त्यास मग कालगतिक्रमाने
लागे, सदध्ययनदीक्षित त्या नृपाने
केलें तयास, गुरुशिक्षित तो किशोर
शोभे, कलाधर जसा रविदीप्तसार ५९

जैशी निशा शशिकला करि कान्तिमन्त
किंवा उषा करितसे नलिनीस कान्त
तैसें गमे मजसि त्या शिशुच्याहि धीला
योग्या वयःस्थिति करी स्मरणीं विशाला ६०

जैसा सहस्रकर लंघितसे नभाला
वायू क्षणांतचि विलंघि दिशान्तराला
अल्पावधींतचि समर्थ युवाहि झाला
तैसा विशाल तरण्या निगमार्णवाला ६१

हातांत खड्ग चमके मग दीप्तकान्ती
विद्युल्लता जणु नभःस्थ अखण्डिता ती

---

(१) तेजाने (२) आठवें वर्ष

संचाल्नास करितां सुत शौर्यवन्त
शोभे नभासमचि तो वसुधातलांत ६२

अङ्गावरी वसन रौरव जेवि साजे
आकर्ण ओढुनि शरासन तो विराजे
जैसा नभीं रविकरें घन चित्रकांती
विद्युद्गुण त्रिदशचाप करी दिशान्तीं ६३

तो यापरी सकल शास्त्रकला शिकोनी
शोभे शिशू अधिकची सकला गुणांनी
शाणप्रसाधित जसा मणि शोभतो वो
किंवा फलोद्गमविनम्र वनीं तरू तो ६४

तो दीर्घवक्ष वृषकन्धर चण्डबाहू
शालोन्नत प्रखरविक्रम शत्रुराहू
कीं चालतां झरझरा धरणीहि कापे
होई सहस्रकर निष्प्रभ तत्प्रतापें ६५

पाहोनि त्यास नवयौवनचारुरूप
हर्षे मनांत बहु तो प्रणयार्द्र भूप
द्याया तयास युवराजपदा सदाश
चित्तीं विचार करितो मग चन्दनेश ६६

त्या स्थापुनी जनपती विधिवत् पदाला
विप्रप्रयुक्त जणु सार्थ करी वचाला
दैन्यांतही अतिशयें सुत शोभला जो
ऐश्वर्य पार्थिव तयास न केवि साजो ६७

बाजूस भूपतिसवें बसला किशोर
सामतमण्डलिं दिसे कमनीय फार
जैसा प्रभातसमयीं शशिच्या समेत
तारागणांत नव भानु दिसे प्रशांत ६८

शोभे म्हणों शिशुसमान विभातभानू
तो भासला परि गुणें अति सान मानूं

येतां रवी गगनमण्डलिं पूर्ण लाल
नक्षत्रराजि, शशिबिम्ब, दिसे मलूल ६९

होता परी उदय त्या शिशुचा सभेत
त्याला विलोकुनि पराक्रम मूर्तिमंत
सामंत ते सकल राजसभेय होती
संतुष्ट शौर्यविभवें, पळती अराती ७०

जैशी मयूरतति देखुनि तोयदाला
स्रोतोवहा जलदवर्ष, निशा शशीला
तैसी प्रजा नृपतिची सकला प्रकर्षें
त्या नूतनोदित सुतास बघून हर्षें ७१

तो चालतां नृपपथामधुनी कुमार
मार्गी किशोर करिती जयशब्द धीर
वातायनातुनि पडे मग लाजवर्षा
जैशा हिमाद्रिवर मेघज फेनवर्षा ७२

राष्ट्रप्रतीक दिसतां ध्वज तो कुठेही
राष्ट्रीय जेवि नमनास करी कराही
जातां कुठेहि युवराज जनांस मान्य
त्या सर्व लोक नमिती म्हणतात धन्य ७३

घेतां नृपासन युवा अति वीर्यशाली
तें राज्य होय अरिहीन समृद्धिशाली
कोणी न वक्र करुनी नयना विलोकी
त्याच्याकडे, सबल निर्भय होय लोकीं ७४

विद्या कला सकल धावत तेथ आल्या
ज्या अन्य आश्रयविहीन विषण्ण झाल्या
आल्या, जशा सफलता गुणभाग्यवंता
किंवा गुणावलिहि येतिल यत्नवंता ७५

तो होय दुःसह अरींस पराक्रमाने
जैसा निदाघरवि होय तमा तपाने

झाला परी निजजना अति तोषदायी
जैसा सुधाकर मृदुणत्वगुणें न होई ७६

एकीं समग्र गुण विश्वपती न ठेवी
ऐसें प्रसिद्ध भुवनीं जरि सर्वभावीं
होता तरी तनय तो अपवाद वाटे
या सर्वसिद्ध नियमास गुणप्रकर्षें ७७

सौंदर्यपूर्ण जरि तो दिसतो मयूर
वाणी तदीय गमते श्रवणा कठोर
जो अन्यपुष्ट वितरी स्वरमाधुरीला
त्याची दिसे न तनु सुंदर लोचनांला ७८

तो गात्रसुंदर मयूरसमान झाला
त्याच्या पिकासम मनोरम वर्णमाला
नीरें विहीन पय हंसमुखास येतें
तैसें गुणत्व गतदोष तयास येतें ७९

वज्रासमान रिपुशीं घन मानसीं तो
पुष्पासमान मृदु बंधुजनांत होतो
ऐसा जणों सुगुण देखुनि कुंतलेश
आला तदीय करण्या समरीं जयास ८०

ऐकोनि वृत्त मग चारमुखें कुमार
सैन्यास सज्ज करितो समरास धीर
बाहू तदीय स्फुरती करण्यास केली
युद्धांत, वीर सजला मग धैर्यशाली ८१

झाले तटावर धनुर्धर सज्ज त्याचे
खाली सुसज्ज सजले दळ सैनिकांचें
हस्ती, तुरंग, रथ, पादचरादिकांचें
तें सैन्य गर्जित असे स्वर भेरियांचे ८२

ती गर्जना परिसतां गजवृंद सारा
युद्धोत्सुक प्रकट वर्षत दानधारा

गण्डस्थला हलवितो वरि गर्वभारें
घण्टानिनाद करितां चरणास सारे ८३

खिंकाळती फुरफुरोनि वनायुवाजी
होऊन सच्चरणसोत्सुक बद्धराजी
तो स्यन्दनस्थ पवनाहत केतु डोले
ज्याने रणार्थ रणसैनिक सिद्ध केले ८४

तो ऐकितां निनद सैनिक बद्धपंक्ती
वीरत्व संचरुनि वक्षविशाल होती
बाहु स्फुरोनि कर जात यदा कटीला
ती ओढितां असिलता चमके विशाला ८५

युद्धार्थ सिद्ध करुनी निजवेष जेव्हां
तो जावयास सजला युवराज तेव्हां
द्वारावरी पटु रणोत्सुक गर्जती त्या-
भेरी, करीत समरोत्सुक बालका त्या ८६

त्याच्या शिरीं कवच तें विलसें विशाल
त्यातून केस सरती सुकुमार लोल
शोभे मुखावरि तया समरोन्मुखाच्या
सङ्ग्रामविभ्रमविचक्षण हास्यवाचा ८७

अंगांत शुभ्र रणवेष विलासला तो
स्कन्धावरून मणिभूषित पट्ट जातो
सिंहासमान कृश त्या कमरेवरी तें
म्यानांत लाल, समरोन्मुख खड्ग होतें ८८

जों चालला नृपतिच्या, शिशु मंदिरांत
तद्वन्दनास करण्या, सुतपूज्य तात,
द्वारावरी अनुचरालि करोनि पंक्ती
दोन्हीकडे, असिवितान शिरीं धरीती ८९

जावोनि तो विनयनम्र करी प्रणाम
त्या पूज्य आत्मगुरुला, स्वपित्यास राम

जैसा करी, नरपती मग त्या सुताला
आशीर्वचा करितसे सुवचोविशाला ९०

"तू वीर भाससि कुमारसमान माते
जो निर्दळून, सुखवी सुर, तारकाते
येशील तू विजय पावुनि शूरवीरा
चित्तीं असें मज विशंक गमे किशोरा ९१

हा कुंतलेश परि बंधु सखाच माझा
संग्राम यासह सुयोग्य न, जाण तूझा
बंधू वधोनि मग काय नृपासनाला
या भोगणें स्वजनशोणितरंजिताला।" ९२

देतां तयास उपदेश असा नृपाळें
तो पुत्र विक्रममया वचनांस बोले
"राजन् ! जरी स्वजन तो न च तो दयाई
जो दुष्ट तो स्वजनही जगिं दण्डनाई ९३

गोदुग्धपान न च युक्त भुजंगमाते
काळें कृतघ्न डसतो उपकारकाते
तो दुष्ट दण्ड करितां न च ताप देई
अंगीं मृदुत्व धरितांचि असह्य होई ९४

यज्ञीं अजा वधिति लोक न केसरीला
मृत्पिण्ड ते तुडवितो न हुताशनाला
नीहार पीडि कमलास न शालवृक्षा
जाणोनि हें म्हणति सज्जन शक्ति रक्षा ९५

अंगीं वसे परम विक्रम तो जयाच्या
साहे असा जन न वृत्तिस सेवकाच्या
जो विक्रमाप्त वनराजपदास बाहे
त्या केवि केसरिस पंजरवास साहे ९६

तुम्ही न यास्तव करा उपदेश माते
ऐसा पराक्रमविरोधि रणोद्यताते

अंतीं सुखावहचि मानुनि आतपाला
धिःकारिती न च कदापिहि वृक्ष त्याला" ९७

ऐसें स्वपुत्रवच ऐकुनि लोकपाला
पुत्रीं पराक्रम विलोकुनि हर्ष झाला
बोले परी नृप तयास विचारपूर्णा
उक्तीस, होय हित जी बहु शौर्यपूर्णा ९८

"राज्यादि भोग गमती मज नित्यनाशी
त्याकारणें अमित तू न च जीव नाशी
कर्तव्य हें नृपतिचें जनजीवरक्षा
युद्धीं न आत्मविभवार्थ तदीय रक्षा ९९

वीरत्व दाखवि तया परशत्रु जो कीं
वीरत्व सज्जन न दाविति आप्तलोकीं
पाहे रवी जरिहि कर्दम वाळवीतो
यत्नें प्रभातकमलास विकासवीतो १००

केलें जरी नमन तू नृपतीस पुत्रा
शौर्यें न हीन तुज मानिल लोक सारा
विश्वंभरा जरि पदाहतिलाहि साहे
ती काय दुर्बल असे जन बोलताहे १०१

संधी म्हणोनि तुज योग्य असे तयासी
जो आपुला स्वजन होय जयाभिलाषी
दूतास पाठवुनि शीघ्र तयाकडे तू
युद्धास टाळ, नच हो जननाशहेतु" १०२

हे आप्तवाक्य परिसोनि युवा विनीत
बोले "मला वचन मान्य समस्त तात !"
धाडूनि दूत मग कुन्तलभूपतीला
बोलाविलें आणि तयीं निजमंदिराला १०३

आला जई मग पुरामधि कुंतलेश
तत्स्वागतास करि भूपति तो अलेश

आणोनि राजसदनीं मग बैसवीला
सिंहासनीं, नृप स्वयें पदलीन झाला १०४

बोलाविलें निजसुतास सभेंत त्याने
तद्वन्दनास करण्या सुतवत्सलाने
आला तिथें तनय शत्रुजयी विनम्र
आज्ञेनुसार करितो स्वशिरास नम्र
जैसा रवी प्रखरशा निज मण्डलास
सन्ध्येनुसार करि नम्र दिशाचलास १०५

षष्ठांगुली मग विलोकुनि त्या शिशूची
हो वृत्ति संशयमयी नृपमानसाची
चिंती किशोरहनना मग दुष्टनीति
वामा सदा पिशुन आचरितात रीति १०६

बोले पित्यास 'तनयास विलोकुनीया
आनंद होय, अति सुंदर गौरकाया
वाटे गुणैकनिधि बालक पाठवावें
माझ्या सुतास प्रणयास्तव भेटवावें १०७

ऐसें तदीय वच ऐकुनि भूमिपाल
बोले 'तथास्तु' वचना झणि सत्यपाल
त्या पाठवी मग धरापति कुन्तलाचा
पत्रास देउनि सुतास पुरीं स्वतःच्या १०८

(३)

## विषयापरिणय

तो पातला युवतिकाम्य, पुरीं नृपाच्या
उद्यान जेंथ विलसे स्तबकीं फुलांच्या
अश्वावरून उतरे मग भूमिलागीं
सौंदर्यशालि बघण्या वनभूमिलागीं १०९

जातां प्रवेशपथ गैरिकयुक्त शोभे
दृष्टी विलोकुनि मरूच्चल ताल लोभे
जे लाविले उभय बाजुस त्या पथाच्या
स्कन्धावरी धवलही वलयें जयांच्या १९०

कोठे दिसे हरितसुन्दर शष्पभूमि
जीची लतावलयविद्ध उपान्तभूमि
शोभे लतांवरि सुमावलि शुभ्रवर्ण
जी तारकांसम नभीं—दिसते विकीर्ण १११

बागेमधून पथ रम्य विलासताती
ज्यांच्यावरी रुचिर गैरिक शोभताती
शाखा, वरी हरितपल्लवसंविधान
प्रान्तःस्थ तालतरुच्या, करिती वितान ११२

मध्ये विशाल जलपुष्कर शोभतें तें
ज्याचें विलोल अनिलें, जल तोषवीतें
हंसालि केलि कमलावलिच्या मधोनी
हर्षे करीत बिसतन्तु मुखीं धरोनी ११३

वापी कुठ जलमयी सुभगा विलासे
जीमाजि नील जल वारिदवर्ण भासे
मासे तयांत, करितात रती; विकीर्ण
त्यांच्या जलीं चमकती तनु रौप्यवर्ण ११४

मध्ये तुषारनालिका धवला विलासे
जें निर्मिलें दलविशाल सरोज भासें
खाली तिच्य विशद नाल सुनील ऐसें
कीं तोयबिंदु पडतात पराग जैसे ११५

कोठे विशाल दिसते तृणभूमि रम्य
बाजूस अल्पसरिता जलपूर्ण जाय
चोहीकडे चलितपल्लव निंबशोभा
तेथे कुरंगशिशु चाविति शुष्कदर्भा ११६

घेवोनि कौसुमसुगंधि पराग संगे
स्पर्शी करोनि दवबिंदुस मंदवेगें
जो हालवीत तरुवालि समीर येतो
त्या सेवुनी सुत मनीं अति हृष्ट होतो ११७

तेथे लता धवलगंधित पुष्पभार
होती विनम्र, गुणवंत गुणौघभारें
आत्मा विभक्त करुनी निज कौमुदीचा
तत्कांति कांत रचितो जणु तारकांचा ११८

शोभा विलोकुनि अशी युवराज रम्या
संतुष्ट होऊनि मनीं, पसरे स्वशय्या
तेथें कदम्बतरुच्या तलिं, झोपला तो
जेथे प्रसूनमधुगंधित वायु येतो ११९

आली सुता नृपतिची मग दैवयोगें
तेथे सखीसह खुडीत सुमास मार्गे
त्या बालिका मधुर तें वच बोलिताती
जैसे प्रभातसमयीं खग कूजिताती १२०

गंगेसी मंदरव जेवि तरंगलेखा
कीं कोकिलास्वरतती वनभूस देखा
नृत्यांत शिंजाती जशा कटिमेखलेसी
उद्यानभूमिस तशा युवती विलासी १२१

वर्णाकृती विविध त्या सुरकार्मुकासी
देतात जेवि गगनीं रमणीयतेसी
शोभा तशाच सुमनोपवनस्थलासी
देतात चित्रवसना युवती विलासी १२२

यामा जरी सुखद सर्वहि शुक्लपक्षीं
राका तयांत अधिका जन जेवि लक्षी

---

(१) गुण = सद्गुण (२) लतेच्या डहाळ्या

भासे तशी सकल सुंदर बालिकांत
ती कुंतलाधिपसुता सुभगा नितांत १२३

तीचा सुदीर्घ मृदु कुंतलभार कृष्ण
गालावरी पसरला करि लुप्त कर्ण
त्याच्या दशा विरल वायु करी विलोल
गालावरी म्हणुनि ते दिसतात लाल १२४

ज्याचें विशालपण लुप्त दिसे कचांत
भालीं अशा तिलक चारु वसे सुरक्त
सुस्निग्ध चापकुटिला भ्रुकुटी विराजे
त्या कारणें नयनयुग्म सुकांत साजे १२५

तें ओष्ठयुग्म नवपल्लवरक्त साजे
कांतीहि कुंदधवला दशनीं विराजे
गालीं खळींवर पडे मृदु हास्यकांति
जैसी तरंगलहरीवरि चन्द्रकांति १२६

अंगावरी वसन नील सुरम्य होतें
ज्याते निरभ्रगगनासह साम्य येतें
वक्षःस्थलीं रुचिर उन्नतता तयासी
जी पाहतां सुचविते स्तनगौरवासी १२७

ती मंद मंद पद ठेवित चालताहे
उद्यान रम्य अवलोकुनि हर्षताहे
आलाप जैं करि सखीसह तोषदायी
दृष्टीं तियेस दिसला सुत सौख्यदायी १२८

सौंदर्य देखुनि मनोहर तें तयाचें
झालें विमोहितचि मानस त्या सुतेचें
येतां युवा युवति यौवनसुंदरा ती
उत्पन्न होय सहसा उभयांत प्रीति १२९

जावें तयाजवळ तीस गमे मनांत
बोले सखींस मग हर्षभरें नितांत

पुष्पीं तरू लवति शेज करूं शिवासी
तोडूं फुलें मधुरगंधित रम्य ऐशी १३०

बाला सुगंधि सुम तोडिति त्या करांहीं
हातामधील परड्या भरती फुलांहीं
त्या देखुनी सुमनव्यग्र सुता सखींस
जाई सुमोच्चयमिषें त्वरिता तरूस १३१

निद्रिस्त तीस दिसला सुत चारुगात्र
ज्याचें दिसें सुभग कांतिविशेष वक्त्र
किञ्चित् गेमे नयनरोम तियेस हाले
निःश्वास मंद निघतां चल ओष्ठ झाले १३२

फेनावली पवन हालवि जेवि लोल
सिन्धू दिसे सुभग तेवि जसा विशाल
शोभे तसा सुत तदीय सितांशुकाला
जेव्हां करी अनिल चंचल मंद आला १३३

येतां मुखावरि समीरण गंधशाली
किंचित् दिसें स्मित तयावरि सौख्यशाली
ओष्ठासि देखुनि वदे युवती सुशील
मी धन्य होइन जई मज चुंबितील १३४

ऐसी तया निरखितां मग कामिनी ते
थैली दिसे तिजसि पत्र जयांत होतें
पाही तया उघडुनी झणि आतुरीने
तों लेख तीस दिसला लिहिला नृपाने १३५

होते तयांत लिहिलें 'मदना पुरास
मी धाडिलें शिशुस या तुज भेटण्यास
पुत्रा ! विलंब नच योग्य, करावयासी
याला गतासु भवनीं, विष देइ यासी १३६

तें वाचतां नृपसुता बहु होय कष्टी
पाहे तयास व्यथिता मग खिन्नदृष्टी

चिन्ती मनीं निरपराध शिशूस ऐशा
द्याया विषा मम पिता खल होइ कैसा ? १३७

तीते विचार सुचला मग सौख्यदायी
ज्याकारणें युवति ती अति तुष्ट होई
काढून अंजन तईं निज लोचनींचें
दर्भांकुरें आणि करी विषया विषाचें १३८

तें पत्र त्या युवतिने मग ठेवियेलें
स्थानीं, निघे त्वरित ती मग त्याच काळें
जेथे सखी विहरतात यथाभिलाष
त्यांचा सुरम्य करि पुष्पवना विलास १३९

आला कुमार मग राजसभेंत काळें
तें पत्र भूपतिसुताप्रति दाखवीलें
पत्रानुसार विषया मग चंद्रहासा
त्यानें दिली युवति सुंदर ती सुहासा १४०

पत्नीसवें मग गजावरती बसोनी
तो चालला सुत पुरांत पथावरोनी
देहावरी चमकती मणिमेखला त्या
निस्यन्द पर्वतशिरावरि भासती ज्या १४१

त्याच्या, चतुष्क, वरि कांचनकांत होतें
ज्यामाजि सुंदर वधूवर शोभती ते
आली दिनासह निशा जणु पौर्णिमेची
ऐशीच संशयमयी मति हो जनांची १४२

त्यांच्या पुढे दिसति किंकर ते सदण्ड
जे मोडिती जनसमूह पथीं प्रचण्ड
मागे सशस्त्र विचरे दल सैनिकांचें
अश्वावरी दिसति नायकही तयांचे १४३

सौधातुनी युवति वर्षति लाजवर्षा
कीं वायुकम्पित लतावलि पुष्पवर्षा !

लोकव्रजातुनि उठे जयशब्द उच्च
जो भेदितो नभ दिगन्त भरूनि साच १४४

(मंदाक्रांता)

दैवें ज्याला प्रथितविभवें राक्षिलें सर्वकालीं
पीडा त्याला करि जन असा कोण सामर्थ्यशाली ?
मोठ्या यत्नें तनयहनना कल्पिले व्यूह जे जे
त्यांच्या योगें शिशु अधिकची भाग्यसम्पन्न कीजे १४५

विद्युल्लेखा स्फुरण करिते कृष्ण मेघावरी जी
ताचा तेजोगुण हरविण्या यामिनी शक्त ना ता
किंवा सिन्धूजल जलद जे चोरुनी पुष्ट होती
त्यालागीं कां अधन करण्या ते कधी शक्त होती १४६

(शिखरिणी)

दिशादेवीसंगे विहरत मुदें तो रवि जसा
दिसे प्रातःकालीं नयनकमनीयप्रभ असा
तसा पत्नीसंगे युवक विलसे नूतनपदीं
करीत स्वर्लोकप्रथितकरणी विष्टपपदीं १४७

मे १९३८

– समाप्त –

३०

# जलबिंदु

शिकवी संयमा ऐशा भोगलोलुप भृंगही
उपदेश परा द्याया होती पंडित सर्वही

“जरी दु:ख जिवालागीं नसावें कधि वाटतें
संवेदनाच कीं त्याची लोपावी तरि सर्व ते !”

भासतीं तर्कशून्यांचीं मज हीं मूर्ख भाषणें
टाळावया कुदृश्याला जेवि अंधत्व मागणें

(आशावादी दृष्टीनें पाहिलें असतां वस्तुत: आनन्दमय असणाऱ्या या जगांत खरें वैराग्य व स्थितप्रज्ञता अंगी नसतांना तत्वज्ञाचा खोटा आव घालून अर्धवट माणसें कसें दु:ख उत्पन्न करितात हें या काव्यांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यांत तत्वज्ञाची भूमिका भ्रमराकडे आहे. शेवटीं त्याच्याच मोहवशतेमुळें जगत्स्वरूप जलबिंदूवर वाईट प्रसंग ओढवतो.)

# जलबिन्दु

( अनुष्टुभ् )

मेघमाला करोनीया वृष्टिला धरणीवरी
नभीं हर्षभरें डोले वायुच्या लहरीवरी १

डोकावतो कुठे भानू मेघांच्या विवरांतुनी
हासतां मृदुकांतीने दिशादेवीस पाहुनी २

द्याया आलिंगनालागीं पसरी कर[1] भास्कर
लाजेने होतसे तेव्हा दिशा अरुणसुंदर ३

शोभे ढगावरी तेथे इंद्रचाप सुरम्यसा
अनेकविध वर्णांनी, गुणांनीच गुणी[2] जसा ४

जलामधुनि तेजाचीं फुलें विविध वेचुनी
दिशावेणींत त्यांची कीं भास्करें माळ गुंफिली[3] ? ५

रवी हास्यमुखें येतां प्रिय कीं गगनावरी
राहिली स्थिर त्यालागी देखुनी चपलाच[4] ही ! ६

किंवा स्वर्गातुनी संध्या उतरेल धरेवरी
म्हणुनी स्वागता तीच्या भानु तोरण हें करी ! ७

चमके वीजे नेत्रांना करुनी क्षण विस्मयी
सुवर्णमेखला शोभे नर्तकीची सुरालयीं[5] ८

---

(१) कर = (१) किरण (२) पक्षीं हात. (२) गुणी = गुणवान् मनुष्य जसा गुणांनी शोभतो तसा इंद्रचाप रंगांनी शोभत होता. पक्षीं गुणांनीच तो 'गुणी' म्हणजे 'दोरी सहित' ( गुण=धनुष्याची दोरी ) झाला होता. त्याला दुसरी दोरी नव्हती. (३) पाण्याच्या तुषारांत सूर्याचीं किरणें पडलीं म्हणजे त्यांचें पृथक्करण होऊन इंद्रधनुष्य दिसतें. सूर्याचें किरण म्हणजे त्याचे हात. या हातांनीच जणु तो त्या पाण्यांत भिजत घातलेलीं फुलें वेचतो व तीं दिशेचे केश जे ढग त्यावर गुंफितो. (४) चपला = वीज, इंद्रधनुष्यांत जरी अनेक रंग असले तरी मुख्यत: त्याचा विजेप्रमाणें लाल रंगच लक्षांत येतो. (५) स्वर्गांत.

कृष्ण मेघावरी तीचा क्षण विभ्रम भासला
सद्भावोदय तो जैसा खलांच्या हृदयांतला

ढगांच्या वरि सूर्याने कांतिरेषा विलेखिल्या
गमे कृष्णमहीध्रांच्या[1] वरी निर्झरपंक्ति या १०

मेघपंक्तींतुनी कोठे किंचित् गगन तें दिसे
तमोगुण जगामाजी सत्यवर्तन कीं जसें ११

आक्रमी मग मार्गाला पश्चिमेच्या विभाकर
आत्मानुरक्त[2] संध्येला भेटाया होय आतुर १२

कुठे मृदुल तेजाचीं किरणें पडुनी वरा
रक्तिमा कमलांचा ही मेघांची मालिका धरी १३

चण्डतेस रवीच्या ती मृदुता देत चारुशी
कठोरतेस थोरांच्या प्रेमसंवेदना जशी १४

नभोदश तशी भूमी वृष्टिने रम्य होतसे
सुखदु:ख पतीला जें तेंच पत्नीसही असें ! १५

धारांनी नीलमेघाच्या चिम्ब होती लताद्रुम
कृष्णाच्या पिचकाऱ्यांनी गोपीगोपव्रजासम १६

सर्वत्र धरणी शोभे हिरवीचार सुंदर
नटली जलबिंदूंनी हासे आनंदनिर्भर १७

मंद मंद समीराच्या लहरी पल्लवांवरी
येतां हर्षाश्रु त्यांचे कीं गळती धरणीवरी १८

हालवी जेधवा वेगें वायु या वटपल्लवा
त्यांचा मर्मर कर्णांना सुचवी वृष्टिच्या रवा १९

उद्यान एक विलसें पुष्पांचें समयास या
शोभेस खुलवी जें कीं धारासिक्त धरेचिया २०

---

(१) महीध्र = पर्वत (२) स्वत:मुळें लाल होणारी असा दुसरा अर्थ.

न्हाउनी जलधारांनी गमतें भूमिसुंदरी
वेषभूषा कराया हें स्वभाण्डार खुलें करी २१
हिरव्याचार[1] [illegible] भूमीवर विहंगम
साचलेल्या जळामाजी खेळतात मनोरम २२
जळाने चिंब झालेले पंख हालवुनी त्वरें
फेकती जलबिंदूना कूजती मधुरस्वरें २३
ओलेती पल्लवांतीं[2] ही पारिजातकसुन्दरी
रक्तवृत्त[3]प्रसूनांचा सडा अंकि धरेवरी २४
वाटे संतुष्ट होवोनी सुधाधौत[4] विभावरी
करिते तारकांची ही वृष्टि रम्य धरेवरी २५
गालांचा रक्तिमा वाटे लाजलेल्या स्त्रियांचिया
चोरुनी फुलती येथे गुलाब धरणींत या २६
युवती खेळती येथे सन्ध्याकाळीं म्हणोनिया
स्वर्गही उतरे खाली क्रीडा त्यांची बघावया २७
नृत्यास करितां हर्षे कामिनी त्या मनोहर
वस्त्रास हिरव्या त्यांच्या उडवी वायु मन्थर[5] २८
स्वर्गही देखुनी ऐशा शोभेला जाय मोहुनी
धारावें वस्त्रवर्णाला असें त्यास गमे मनीं २९
म्हणुनी राहिला येथें मग वृक्षलतामिषें
प्रवृत्ति जगताची या वेषानुकरणीं असे ३०
भानुच्या चंडतेजाने जरी निष्प्रभ तारका
येउनी आश्रया याच्या पुनः होती प्रकाशिका ३१
राहिल्या सुमरूपांनी येथ निभ्रांत त्या गमे
पावित्र्य न कधी होतें उपेक्षित पराक्रमें ३२

---

(१) गवताच्या (२) पल्लव = पान, पक्षीं पदर, सडा घालतांना पदराचें टोक ओलें झाल्याप्रमाणें पारिजातिका दिसत होती (३) वृत्त = देठ (४) चंद्रिकामय (५) मंद.

वृक्षावृक्षातुनी तेथे पथ सुंदर शोभती
चोरुनी वर्ण पुष्पांचा लाल ते दिसती किती ! ३३

आली आकाशगंगा कीं उद्यानास ^घावया
आपुल्या उपसिंधूनों घेवोनी विहरावया ३४

सख्या त्या सर्व पाहोनी वनदेवास सुंदर
लाजती[2] विम्बुनी त्यांचा अनुराग तयावर ३५

होउनी स्तिमिता येथें त्याचि या दिसती गमे
वंचना करिती साची मनाची पथसंभ्रमें ३६

कारंजाची दिसे शोभा तुषारसरणी वरी
उडती जेधवा आणी पडती सलिलावरी ३७

पराग सुमनांचे हे वेचुनी गमतें वरी
भृकुटी उडवोनीया उधळी जलसुंदरी ३८

म्हणोनी उठती रम्या लहरी सलिलावरी
प्रियेच्या प्रथमस्पर्शें उठत्या लहरीपरी ३९

पदाघात करी येथे सर्वदा वृष्टिसुंदरी
म्हणोनि फुलतो वाटे अशोक सुमनांतरीं ४०

होतें एक तयामाजी तडाग जलसुंदर
कमलावलिने झालें सार्थ जें कमलाकर ४१

इंदीवरारविंदांनी पुण्डरीकदलें तसें
नक्षत्रोत्फुल्ल भासें कीं नभ तज्जल नीलसें ४२

रात्रींत शारदी ज्योत्स्ना पडे शांत जलावरी
तेव्हा प्रशांतकांतीने पद्में शोभति पुष्करीं ४३

नक्षत्रांची जलामाजी प्रतिबिम्बें विलासतीं
स्वर्गभूमिप्रदेशांची होते न क्षण निश्चिती ४४

---

(१) उपनद्यांना (२) लाजेचा रंग लाल असतो.

उद्यानसुंदरी पाहे नभोदेश मनोहर
हृदयीं शिरला वाटे चिंतितां तोचि निर्भरें[1] ४५

मुदें कमलपत्रें या तरंगति जलावरी
पत्रावलिच[2] शोभे कीं सरसीच्या उरावरी ४६

वाढती बिसतन्तूंच्या वरी जे हंस सुंदर
करिती केलि ते येथे यथेच्छ मधुरस्वर ४७

तरंगावरि बैसोनी जाति ते कमलांतरा
वायुच्या वरुनी जैसे पुष्पगंध दिगंतरा ४८

पसरी दलहस्तांना अरविंद सुनील तें
वायुच्या लहरीलागी आलिंगायास इच्छितें ४९

सोपान तटभागाचा शैवलास्तृत होतसे
सृष्टि त्या पाचपंक्तीने गमे तैं भूषवीतसे ५०

असें सुंदर शोभे तें कमलाकर पुष्कर
सद्भावमय जैसें हें सज्जनांचेंच अंतर ५१

बिंदु एक जलाचा तो शोभे तैं पद्मिनीवरी
जीव नश्वर कीं जैसा जगाच्या रंगभूवरी ५२

भानुच्या मन्द तेजाने हर्षतां बहु अंतरीं
मुक्ताविशद कान्तीने चमके नलिनीवरी ५३

कुलें हीन महात्मे ते कुलोत्पन्न खलाप्रती
अधोगतिहुनी लोकीं प्रेमभावें निवारिती ५४

तसें पंकज हें वारी मेघजा जलबिंदुला
पतनोन्मुख जो होता कर्दमाविलें[3] भूतला ५५

---

(१) उद्यानसुंदरीचें हृदय म्हणजे तो तलाव. ती नभोदेशाला पाहून त्यावर मोहित झाली, म्हणूनच तो तिच्या हृदयांत शिरला आहे, त्या तलावांत प्रतिबिंबला आहे असा अर्थ. (२) जुन्या स्त्रिया वक्ष:स्थलावर रंगाच्या नक्षी काढीत असत त्यास पत्रावलि म्हणतात. (३) चिखलाने भरलेल्या

पाहि तो बिंदु हर्षाने लतांच्या पल्लवांवरी
राहिल्या अन्य बिंदूंना पडतां धरणीवरी ५६

जग पाहतसें जैसें इतरांच्या विपत्तिला
गमतें होय तैसा त्या स्वभाव जलबिंदुला ५७

सुगंध पद्मीनोंचा त्या वाहतो गंधवाह तो
सेंवुनी त्यास हर्षाने तीकडे भृंग धावतो ५८

मत्त होउनि आनंदें गुंजतो कलगुंजना
स्वरवाहनही प्रेमें करितो गंधवाहना ५९

पराग लागले त्याच्या पायांना सेवितां सुमा
उडवी वायु त्यालागीं आकाशांत मनोरमा ६०

गमे भृंग मनोहारी कामिनीचा कटाक्ष कीं
परागामिष घेवोनी झरती प्रेमभाव कीं ६१

आला हर्षित होवोनी अली कमलिनीवरी
जलबिंदूस पाहोनी विमुख क्षण हो परी ६२

क्षणभंगुर जीवाला पाहुनी जगतीवरी
विरक्त लवलाही हो जनाचा भाव ज्यापरी ६३

पाहुनी आपणालागीं वळला भृंग मागुती
म्हणुनी जलबिंदूला विषादकुश बोचती ६४

वदे त्यास विषादाने " भृंगा परत लौकरी
उपेक्षा पद्मिनीची या मजसाठी न तू करी ६५

माझ्यामुळें हिला आले सुन्दरत्व सुखप्रद
मुक्ताभूषित कां होते योषिता दूषणास्पद ? ६६

सविता भगवान् साक्षात् भूषवीतो मला करें
असतां मान्य त्याला मी महत्व इतरा नुरें ६७

जगतों प्रेमभावें मी सौंदर्यमय जीवन
सुखाविण जगीं कांही पाहतें न च मन्मन ६८

खेळतों हर्षभाराने नलिनीच्या दलावरी
मृदुलस्पर्श सेवोनी हर्षतों नित्य अन्तरीं ६९

माझ्या स्वच्छ शरीराच्या मधुनी दिसते पहा
तनु कोमल मुग्धा ही नलिनीची सुखावहा ७०

'कोमलास्तरणा ऐशा सुखेनैव पडोनिया
पाहणें हंसकेलींना' उद्योग शरिरास या ७१

तरंग सलिलाचे हे करितां मन्द सिंजिता
किंचित् मिटुनि नेत्रांना ऐकतां त्यास गुंगता ७२

गमे सुखतरंगांच्या वरी मानस् पोहतें
वायूवरि वसन्ताच्या गुलाबदल जेवि तें ७३

मन्द प्रकाश भानूचा नेत्रां सुखवि जेधवा
पाहतों मेघसौंदर्या सुखें पडुनि तेधवा ७४

अनेकविध पुष्पांना चुम्बुनी ये समीरण
करी नर्तनकेलींना सर्वे माझ्या सुमोहन ७५

उत्पत्ति मग हो स्वर्गी स्थिती कमलिनीवरी
चिरकाल टिकोनीया लय होइल सुन्दरीं" ७६

असें सलिलबिंदूचें वच ऐकुनि गर्वित
वदे भृंग तयालागीं मधुरस्वर कूजित ७७

मंडळें तीन घेवोनी नभीं गुंजन गुंजतो
वायुच्या लहरींची तो हेति हर्षित साहतो ७८

उडुनी मधुगंधी तैं पराग पदलग्न ते
पडले वरि बिंदूच्या तया कम्पन आणते ७९

"अरे सलिलबिंदो ! तू प्रतिष्ठा निज सांगसी
अज्ञ आत्मस्वरूपींही हेलनास्पद भाससी ८०

(१) कोमल अंथरुणावर (२) मार

तुझ्या सुन्दरतेने ही पाद्मिनी न च सुन्दर
पाद्मिनीच्याच योगाने दिससी तू मनोहर ८१

नभातुनि धरेमाजी पडुनी कर्दमीं अशा
तुझ्या भंगुर जीवाची झाली अमति दुर्दशा ८२

परन्तु झालिलें तूतें पाद्मिनीने तनूवरी
म्हणुनी शोभसी येथे डौलाने तू तिच्यावरी ८३

सौंदर्य बाह्य नोहे रे सर्वस्व जगतावर
उत्कर्ष शिवसत्याचा जीवास करि सुन्दर ८४

त्यागाने येतसे जीवा चिरन्तन उदात्तता
भोगालयास आत्म्याच्या[1] क्षणभंगुर चारुता ८५

जलाला शोषितो जेव्हा ग्रीष्मर्तूत विभाकर
तापदायी गमे तेव्हां लोकांना वसुधेवर ८६

वर्षतां परि पर्जन्या पर्जन्यसमयीं जना
तोषदायी गमे सर्वां चरितां त्यागजीवना ८७

मानिसी सुख तू बिंदो अशा निष्क्रिय जीवनीं
करुनी निजशय्या ही कोमला नव पाद्मिनी ८८

परंतु मज हा भासे क्षणाचा सुखसंगम
सुखा विसरणें हाची सुखाचा मार्ग उत्तम ८९

पडता जलबिंदो तू तृष्णार्तवदनीं जरी
सार्थक्य गमतें माते जीवाचें तुझिया तरी ९०

स्वतां शशांक साहोनी भानुच्या तप्त आतपा
वर्षतो शीतलज्योत्स्ना करितो तुष्ट विष्टपा ९१

वेदना करि जो होतां प्रसूत सुत त्यासही
माता प्रेमल भावाने करवीः तनपान ही ९२

---

(१) आत्मनो भोगायतनं शरीरम् । शरीर म्हणजे आत्म्याच्या भोगाचें स्थान, असें न्यायशास्त्र म्हणते.

करिती मेघ वृष्टीला ग्रीष्मशुष्क धरेवर
कृश होउनि अंगाने परसाह्यार्थ तत्पर ९३

थोरत्व न जगीं येतें त्यागाविण कुणासही
टाकीचे घाव ते देती देवत्व दगडासही ९४

आपणा बहु गर्वाने साक्षात् जीवन काल्पिसी
अज्ञान परि जन्माचें स्वतःच्या मज दाविसी ९५

बा बिंदो ! [illegible] च्या बिंदु एकच तू असे
जाशील मिळुनी [illegible]शीं व्यर्थ गर्व तुझा दिसे ९६

"कोऽहं वा कुत आयातः" याचें ज्ञान तुला नसें
स्वर्गीं न जलदामाजी तुझी उत्पत्ति होतसे ९७

तुझ्या तरल जीवाची शाश्वती क्षण ना दिसे
पडशील जलामाजी केधवा नेम हा नसे ९८

म्हणुनी परसेवेला यावजीवन तू करी
अल्पकालिक आयुष्या देहसौख्यार्थ ना हरी ९९

भानुच्या किरणांनी रे होशी भूषित तू जरी
हा अनुग्रह कीं त्याचा न च होय तुझ्यावरी १००

"उच्चनीच न तो ऐसें चिंती देतां प्रकाशना
महात्मे समभावाने लेखिती सकला जना" १०१

अधिक्षेपे[१] असा ऐके बिंदु तो भ्रमराहृत
अहंकारवशें त्याला पुनः बोलत गर्वित १०२

"हेलना करुनी माझी बोलसी भ्रमरा जरी
योग्यता तव वाक्यांनी मम हीन न हो तरी १०३

अग्निच्या शुद्धतेलागी दूषाया खल टाकि ते
जरी घाण तयामाजी, त्याची शुद्धि न लोपते १०४

---

(१) भ्रमराने केलेला.

भूषणें चारु तीं जेव्हां कान्ता करिति धारण
भू[१]भूषणभावांना सम मानिती सज्जन १०५

तशी न निश्चिती होतां, पद्मिनी मम भूषण
पद्मिनीचेंच मी किंवा, मूढ त्वत्सम जे जन १०६

ते पहा अज्ञभावाने भूषणा भूष्य कल्पिती
भूष्यास कुमती किंवा भूषणत्वें निवेदिती १०७

बाह्यांग भ्रमरा माझें नसें केवळ सुंदर
सबाह्यान्तर, लोकांना दिसतो मनोहर १०८

वदसी उपहासाने क्षणभंगुर मी असे
भृंगा परि जगामाजी चिरन्तन कुणी नसे १०९

यावच्चन्द्ररवी ऐसे अनन्तत्वास वाचक
शब्द उच्चारिती लोकीं जरी सर्व विवेचक ११०

असे लय तयांनाही वदती, जगतीवर
दिसे नियमची ऐसा मर्त्य जें तेंच सुन्दर १११

सुकतीं दिवसामाजी सुगन्धि सुमनें जरी
चिरकाल रहाती ते पाषाण धरणीवरी ११२

तरी श्रेष्ठ सुमालागी गणिती दगडाहुनी
अल्पायुष्या उपेक्षोनी गुणसम्भार पाहुनी ११३

असलों आद्यतत्त्वाचा बिंदु एकच मी जरी
मूलद्रव्यसमत्त्वानें होय तत्सम मी तरी ११४

जगीं मी कुठुनी आलों याचें ज्ञान निरर्थक
सहतों आज मी कोठे जिज्ञासा हीच सार्थक ११५

मलसिक्त धरेमाजी रुजली सस्यसम्पदा
मानिती न तरी तीतें सुज्ञ ते दूषणास्पद। ११६

(१) जन्मावर.

जाण निश्चित हें भृंगा योग्यता न जनीवेरी
शेवाळ शुद्ध नोहे जें रुजे शुद्ध जलावरी ११७

आयुष्यभाग वेचावा उपकारार्थ सांगसी
दाम्भिका परि कामार्थी स्वतां तू स्वैर वागसी ११८

पुष्पापुष्पावरी भृंगा उडसी मधु चाखण्या
नच तू गायनाकृष्टा तयांची हौस फेडण्या ११९

गुंजारवा करोनीया नलिनीसह बोलसी
परागशयनीं तीच्या बाहुपाशांत झोपसी १२०

सुकते नलिनी जेव्हा अल्पकाळं जगोनिया
सेविसी भ्रमरा अन्या प्रथमा विसरूनिया १२१

मुग्ध तू मुनिकन्येचा धृष्टा अधर चुम्बिला
दुष्यन्तनृपतीने जो मनीं केवल इच्छिला १२२

कर्मयोगचि हा तूझा असें निष्काम कायरे !
उपदेशिसि जो मातें चराया आळ्यताभरें १२३

उडणें हर्षभाराने वायुच्या लहरीवरी
तुझी परहितासाठी देहाची दण्डना खरी ! १२४

कर्मयोगीहि दुःखांना सुखासाठीच सोसतो
सुखची प्राणिमात्राचें ध्येय अन्तिम काल्पितो १२५

अशाच जीवनीं मातें होतसें सुख तें जरी
निषेध करिसी माझा व्यर्थ कां मग तू तरी १२६

सदैव मनुजाच्या या नश्वरत्वास चिन्तुनी
करितो दुःख जो वाटे कुणी मूर्ख न त्याहुनी १२७

क्षणांत जरि मी भृंगा मंद येतां समीरण
पडुनी सलिलामाजी म्हणसी नष्ट होइन १२८

तत्वज्ञाचा मिलिंदा तू आव घालुनि बोलसी
मरणाचें मला मूर्खा भय कां मग दाविसी १३९

---

(१) जनीवरी = जन्मावर

मिळुनी सलिलाशीं या तत्त्वरूपास जाइन
फिरुनी परि भूंगा मी पुनर्जन्मास घेइन १३०

"जातस्य हि ध्रुवो मृत्युर्मृतस्य जनन" जयें
भगवान् सांगतो ऐसें मग कां मरणीं भय ? १३१

चक्र हें जन्ममृत्यूचें मानवा सुख देतसें !
मुक्त याहुनि जो झाला कळे ना सुख त्या कसें ? १३२

जरी मुक्तस्थितीमाजी सुखदुःख मुळीं नसें
लखलाभ असो त्यांना तिची ज्या वांछना असे १३३

चेतनाशून्य जो झाला मुक्त तो जरि मानिला
म्हणावा तरि मुक्तात्मा जगीं दगड हा भला १३४

'जरी दुःख जिवलागीं नसावें कधि' वाटतें
संवेदनाच कीं त्याची लोपावी तरि सर्व ते १३५

भासतीं तर्कशून्यांचीं मज हीं मूर्ख भाषणें
टाळावया कुदृश्याला जेवि अंधत्व मागणें १३६

सुख या जगताचें कीं थोडें फार असो कसें
क्षण एक तयाचाही श्रेष्ठ मुक्तीहुनी असे १३७

* * * *

'ज्योत्स्नावर्ण सुमांनी जो फुल्ल वृक्षलतागण
येईल जइं त्यालागीं हलवीत समीरण १३८

सारसादिक पक्ष्यांचे वाहुनी मधुरस्वर
आपुल्या लहरींच्या जो वरी गमनमंथर १३९

उडवीत तरंगांच्या लहरी सलिलावरी
सीकरें आर्द्र होवोनी लागतो शरिरावरी १४०

चुम्बी विविध पुष्पांना कामी कांताधरा जसा
रस सेवुनि आनंदें पसरी गंध छानसा १४१

---

१) जय=अर्जुना.

येतां वायु असा भृंगा पद्मिनीवर सुंदर
डोलेल हसतां हर्षें मग ती सुखनिर्भर १४२

हिचें सौंदर्य पाहोनी लावण्यें गर्व ज्यांस कीं
वीचींच्या सरणी ऐशा चरणीं पडतील कीं १४३

सकला कमलांचे हे डुलती वृंद हार्षित
रासक्रीडा गमे तेव्हा होतसे व्रजभूमिंत १४४

दृश्यास पाहतां ऐशा नेत्रसुंदर षट्पदा
पडुनी सलिलामाजी लुप्त होइन मी तदा १४५

जीवात्मा परमात्म्याशीं जगत् ब्रम्हीं विलीन हो
प्रकृतीशीं जशी किंवा विकृती एकरूप हो १४६

* * * *

ग्रीष्मर्तूत रवी जेव्हा तपेल गगनान्तरीं
किरणीं शोषुनी तोया मेघा अर्पिल कीं वरी १४७

मीहि बाष्पस्वरूपाला धारुनी किरणावरी
बसुनी उडतां खालीं बघेन धरणीवरी १४८

उद्यानवृक्षवेलींच्या फुललीं कुसुमें वर
फुललें कमलांनी तें हंससुन्दर पुष्कर १४९

दूर होतां क्रमाने हीं दिसतील मनोहर
हळूहळुहि नेत्रांना अस्पष्ट दिसतां बर १५०

जातां उंच निसर्गाचें आनन्त्य मज रम्यसें
दिसेल, ज्ञानवृद्धीनें अपार ज्ञेय तें जसें १५१

* * * *

गगनीं घन आनन्दें खेळवील समीरण
करुनी मन्द भानूच्या आतपा गन्धवाहन १५२

वनस्पति लता तैशा फुलती जेधवा नव्या
हिरव्याचार होवोनी भूषवीत धरेस या १५३

मानसोत्सुक हंसांचे गगनीं वृंद चालती
वर्षागमनवार्तेला सांगाया उत्तरेप्रती १५४

दक्षिणेहुनि आनन्दें सुखस्पर्श समीरण
धावतो आपुल्या संगे मेघमालेस घेउन १५५

दक्षिणेस रवी येतां विरहा उत्तरा दिशा
पावते म्हणुनी होती वेदना तिज फारशा १५६

कराया सान्त्वना तीच्या रवी हा दूत धाडितो
मेघरूपें तया हातीं प्रेषितो प्रेमलेख तो ! १५७

येतां वर्षाऋतू ऐसा पडेन धरणीवरी
पुनः कमलिनीमाजी किंवा शुक्तींत सागरीं १५८

मुक्तारूप धरोनीया कामिनींच्या स्तनांवरी
शोभेन मज त्या जेव्हां धारिती भूषणापरी १६९

तपोनिधि जयालागीं तपभ्रष्टहि अर्थिती
कामिनीसंगती ऐसी मिळेल मज आयती १६०

अश्रुबिंदुहि होवोनी कन्यानेत्रांत छानसा
आनंदसमयीं येतां कमलीं दवबिंदुसा १६१

दिसेन बहु मी लोकां मनोमोहन सुंदर
लुब्धलोचनभृंगाली पडतील तिच्यावर १६२

नाना वृक्षलता किंवा घेतील मज झेलुनी
आपुल्या मृदु पर्णी वा सुमनीं अति हर्षुनी १६३

* * * *

बिंदुचें वच ऐकोनी वदे भ्रमर त्याप्रती
" अज्ञ रे मोहपाशाने बिंदु तू जाहला किती ! १६४

विषयप्रेम माझेंही जरी लुप्त न जाहलें
विषयासक्ति ती कैशी इष्ट हें मज ना कळे ! १६५

भंगुरत्वास देखोनी शरिराच्या निरामय
सत्कर्म करणें नोहे धरणें मरणीं भय १६६

बोलमी जगतीं कांही चिरंतन नसे असें
तत्त्व वाटतसे माते अज्ञतामूल हें असें १६७

विनाश जगतीं होतो विकृतीला क्षणोक्षणीं
चिरंतन परी लोकीं प्रकृती नित्यरूपिणी १६८

त्याच आद्यस्वरूपाला तरंग सलिला जसे
पावणें प्राणिमात्राचें अंतिम ध्येय हें असें १६९

'यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्'
भगवान् वर्णितो ऐसे सुख सात्त्विक निर्मम १७०

संयमी शोभतो जैसा वर्धमान सुधाकर
विषयी तेवि कामीश क्षयिमाण निशाकर १७१

भोगाचें सौख्य या लोकीं असतें क्षणभंगुर
दुःख त्यापासुनी होतें परी परम तें चिर १७२

संयमाचरणीं होतो जरी कष्ट जनाप्रती
परिणामीं मिळे स्थायी त्याहुनी सौख्य त्याप्रती १७३

वर्णिसी जरि आनंदें भावी सौख्यास आपुल्या
काय नेम भविष्याचा सांगावा जगतांत या १७४

मनोरथ तुझे ऐसे शुक्तीवरि पडेन मी
पडशील परी वाटे कदाचित् घन कर्दमीं १७५

चिंतिसी मनिं तू बिंदो आनंदसमयीं किती
कन्यानेत्रांत येवोनी सुखवीन जनाप्रती ! १७६

दुःखाचे अश्रु या लोकीं काय ते नसती कधी !
कदाचित् त्यांचि रूपाने येणें तुज जगामधी १७७

ऐहिकीं सुख जें आहे त्यास केवळ पाहुनी
दुःख दुर्लक्षिणें नोहे मार्ग हा सुखसाधनीं १७८

(१) चंद्र (२) व्यसनी

खावयास जरी आला केसरी अपुल्यापुढे
नष्ट होइल कां तो रे डोळ्यांना मिटल्यामुळें ! १७९

म्हणती जन आनंदें 'सृष्टि सुन्दर ही असे
पहा रोज विमाताला कशी ती सुषमा दिसे ! १८०

सृष्टि उल्हसिता होई देखुनी ग्रहराज तो
लज्जावनत कीं जेव्हां पूर्वावदन चुम्बितो १८१

अस्तही चारु हो त्याचा उदयापरि सर्वथा
सर्वदा सर्व या लोकीं मनोमोहन नान्यथा १८२

दिग्भाग पश्चिमेचा तैं प्राचीचाहि विलासतो
नवोदित सरोजाच्या कलिकेपरि लाल तो १८३

गगनीं सृष्टिदेवीचे ओठ हे दोन शोभती
हासतां कुंददन्ती ती विलसे तारकाततो १८४

भेटाया रजनीलागीं अनुरागी सुधाकर
चोरुनी घाइने येतो पूर्वाचलाशिखेवर १८५

गमे ईश जगाचा तो बसुनी उदयाचलीं
रंगास अनुरागाच्या कांतशांत सुशीतलीं— १८६

—चंद्रिकेच्या रसामाजी मिसळून मनोहर
तयाचा किरणाने हा फुगा उडवितो वर[१] १८७

गगनीं हास्यमुद्रेने जसा तो वर येतसे
वाटे यौवनवृद्धी हें निशावदन घेतसे' १८८

वदती जे असें त्यांना म्हणावें चित्र हें दिसें
चारुची परि डोळ्यांनी तेंहि चित्र पहा कसें ! १८९

धरणी कम्पिता होते तेधवा न च साहवे
सर्वही वस्तुजाताचा विनाश झाणि ओढवे १९०

---

(१) लहान मुलें साबणाचे फुगे उडवितात. परमेश्वर पूर्वाचलावर बसून अनुरागाच्या लाल रंगाला चंद्रिकेच्या रसामध्ये मिसळतो, नि त्याचा फुगा किरणरूपी नळीने वर उडावितो. तोच हा उगवता चंद्र अशी कल्पना.

गाता गीतास नीतीच्या येथ नीट पद्य परी
वाघ खात मृगीलागी दुष्ट ती मुळिं ना जरी! १९१

स्वार्थ हा भरला लोकीं मातृप्रेमहि लोपवी
प्रतिष्ठा निज राखाया भ्रूणहत्यादि माजवी १९२

सुखयोग जगींचे या सुवर्णाच्या सुरीपरी
वानिती यांस जे त्यांची कथावी मूर्खता किती १९३

मधावरि बसोनीया मधुलोलुप मक्षिका
बद्ध होउनि त्यामाजी पावते नाश तो निका १९४

सर्वदा विषयीं लोकां परिपाक असा वरी
भ्रमाने सुखसिद्धीच्या दुःख ते धरिती उरीं १९५

त्यागही प्राणिमात्राचा स्वार्थसाधनतत्पर
प्रेमही द्वेषभावाला पोषवी या जगावर १९६

अनंतत्वांत सृष्टीच्या जीव हा परमाणुसा
स्वतःला परि तो मानीं तयाचा परमेशसा १९७

अनिश्चितसुखा ऐशा त्यजोनी जीविताप्रती
संयमी जीव तो पावे चिरंतन सुखाप्रती" १९८

शिकवी संयमा ऐशा भोगलोलुप भृंगही
उपदेश परा द्याया होतीं पण्डित सर्वही १९९

(द्रुतविलंबित)

'भ्रमर बोलतसे जलबिंदुला
वचन हें तंव भास्कर चालला
हळुहळू सलिलेश[१]-दिशेप्रती
अरुणसुंदर कीं मग होत ती २००

दिनभरी तपवून धरातला
रवि अतां मृदुकान्तिक जाहला

(१) वरुणाची दिशा = पश्चिम

किरणजाल वरी पसरीतसे
ललित लोहित कुंकुमरेणुसे २०१

विशद बिंब विशाल विलासतें
दिसत अस्तगिरीवरि चारु तें
रुचिर हेमकिरीट विलासतो
जणुं दिशाधिपमौलिवरील तो २०२

तम हळुहळु येत जगावरी
दिसत तेज मलूल विभाकरीं
तरुलतागण निश्चल भासती
दिनपरिश्रमविश्रम इच्छिती २०३

( मंदाक्रांता )

आनंदाने मधुर करुनी शब्द जातां गृहास
देती चित्ता अनुपम अशा जे दिनांतीं सुखास
पक्षी ऐसे विरल करुनी वृंद आकाशमार्गे
स्वच्छंदाने उडत असतां शोभती मंदवेगें २०४

धों धों ऐसा करुनि रव जी वाहतां शैलमार्गी
येवोनीया विमल सरिता या पडे भूमिमार्गी
तीचा धाराप्रवह विलसे रक्तसूर्यातपानें
अग्नीमाजी सतत जळत्या कांचनौघाप्रमाणें २०५

( द्रुतविलंबित )

जरि मलूल दिसे समयास या
कमलिनी तरि सुंदरता तया
विरहखिन्न जशी नव योषिता
असुनिही धरिते अति चारुता २०६

अलि विलोकुनि तीप्रति मोहिला
मधुपिपासु सुसत्वर धावला
रवि निमीलित कीं करितो तिला
म्हणुनि बंधन तेथचि पावला २०७

(वसन्ततिलका)

होतां निबद्ध आलि त्या नलिनीदलांत
बिन्दूहि तो झणि पडे मग पुष्करांत
किंचित् तरंगलहरी उठुनी जलांत
निःशब्दता मग तिथे पसरे नितान्त २०८

आगस्ट १९३८

–समाप्त–

# आत्मयज्ञ

(चन्द्रकांत)

मातृभूमि मम तुला असो हा प्रणाम शेवटला
हर्षनिर्भरा होउनि आतां निरोप दे मजला १

तुझी चारुता आठवुनी मनिं पावनता देवी
प्रेमभराने मानस माझें गहिवरुनी येई २

नदी नर्मदा तुझी मेखला शोभे कटिवरची
काश्मीरज हा तिलक लाविला भालीं कान्तरुची ३

लंकाभूमी कमल पदींचें त्यावर तू देवी
उभी राहुनी लक्ष्मीचाही गर्व हरुनि दावी ४

'मानस' मानस तव शोभे हें गंगा हृदय असें
पावनता हा आत्मा तूझा शांतिस दावितसे ५

वनमालांचे शालू नेसे अनेक रंगांचे
खडीपरी दिसती ज्यावरती गुच्छहि पुष्पांचे ६

सरस्वती-लक्ष्मीचा संगम वसे तुझ्या ठायीं
त्रिंशत् कोटी कण्ठांनी तू बोलतेस देवी ७

द्वित्रिंशत्कोटी हस्तांनी कवळी करवाला
परित्राण सद्भावांचें या मिरवी ब्रीदाला ८

सज्जन ते ते या हो येथे पळा दुर्जनांनो
असें वदतसे मुद्रा तीची जगतीं बन्धूनो ९

आनन्दें मी जाइन आतां अशा स्थलामाजी
वसती जेथ पुण्यात्मे ते भारतीय गाजी १०

वसती जेथें प्रभातकालीं गीत गावयाला
कालिदास, भवभूती, ऐशा अनन्य कविमाला ११

जगच्छान्तिचा पाठ द्यावया बुद्ध वसे जेथे
जीवैक्याचें तत्त्व शिकविते मुनिवरही जेथें १२

अंधतमामधि निराशेचिया किरण साशतेचा
दाखविणारा ऋषिगण जेथ दशोपनिषदांचा १३

परित्राण साधूंचें करण्या दुष्टा नाशाया
वसती जेथे वीरवरहि ते स्थलीं अशा जाया १४

अधीर झालें मानस माझें निरोप द्या मजला
हर्षभराने वनमालांनो दुःखित कां झालां ? १५

शेवटची ही भेट तुझी मी म्हणुनी आतुरिने
जातां जातां बघतां मागे मन नाचें स्मरणें १६

दुग्धधौत ही हिमालयाची शैलराजि रम्य
सुचवी मजला वैदिक ऋषिगण पावन नमनीय १७

ऋग्मत्रांच्या गभीर घोषें ज्यांनी भूवरती
ज्ञानाग्नीची प्रथम लाविली ज्योती धगधगती १८

पुरी अयोध्या करी आठवण रामाची मजला
प्रेमभराने जया तियेने अंकीं वाढविला १९

सत्यमूर्ति ती अवतरली जगिं सत्या रक्षाया
ठेवी देहा वधुनि रावणा व्रीदा राखाया २०

दण्डक कानन लंका तैशी त्याच्या लीलांचीं
पराक्रमाचीं गातीं गाणीं जगदानन्दाचीं २१

व्रजभूमीला पाहुनि चित्तीं हर्षा ठाव नुरे
इथेंच घुमली वनमालीची मुरली गोड सुरें २२

यमुने ! जल तव पावन पाहुनि आठविते मजला
रासरंग तव तीरीं रमला रमतां व्रजबाला २३

सुधेस वर्षी सुधानिधी जो पूर्ण पौर्णिमेचा
तच्छीतत्त्वें जलराशी हो पुलकिते[1] यमुनेचा २४

त्यांत मंद करि मंजुल शिंजित करितां नृत्याला[2]
घेउनि हातीं सुधाकराचा कर तारामाला २५

गगनश्री जै अवनीवरती वर्षी शान्तीला
किंचित् लहरी समीर देउनि हलवी पानांला २६

वृक्षलतागण शान्त झोपले प्रशान्त चित्तांनी
झोंपेमध्ये चाळविती तनु किंचित् हलवोनी २७

समयीं ऐशा व्रजबालांना घेउनि हर्षाने
रासक्रीडा करितो मुरली धरुनी अधराने २८

वनमाली तो प्रेम हृदयींचें भरितां तीमाजी
स्वरमाला त्या ऐकुनि निश्चल वनमाला होती २९

कुरुक्षेत्र न च गीतेची ही कर्मभूमि वाटे
पानपताच्या रणयज्ञाची चित्तीं स्मृति दाटे ३०

चितोरगड हा कथेसि कथितो कसा रजपुतांनी
हिंदुध्वज हा रंजित केला शोणितबिंदूंनी ३१

सह्याद्रीच्या सरिता कथिती गीत गाउनीया
धर्माकरितां महाराष्ट्राने आहुति ज्या केल्या ३२

शैलराजि तव सरिता तैशा सुंदर झरझरती
त्यागाच्या गीतांनी माते स्फूर्ती मज देती ३३

हे माते मी मनीं इच्छितों जन्मा घेऊन
तुझ्याच अंकीं इथे पुनः मी हर्षें खेळेन ३४

---

(१) अंगावर उभ्या राहणाऱ्या रोमांचांना 'पुलक' म्हणतात. थंडीमुळें अंगावर रोमांच उभे राहतात, चंद्राच्या थंड प्रकाशामुळें यमुनेच्या अंगावर उभे राहणारे रोमांच म्हणजे तिच्यावरील लाटा ! (२) यमुनेच्या ओघांत पडलेलें तारकांचें प्रतिबिंब लाटांबरोबर नृत्य करिते !

तुझे पक्षिगण गातिल मजला अंगाई गीतें
शीतल वायू प्रेमभराने कुरवाळिल हातें ३५
सरिता कलरव गीतें गाउनि तुझ्या वैभवाचीं
माझ्या हृदयीं भरतिल गाणीं तुझिया प्रेमाचीं ३६
सौभाग्या तव करण्यासाठीं तेजस्वी माते !
रक्तबिंदुचा सडा घातला वीरांनीं ज्यातें ३७
अशा भूमि तव पुनः मनासी स्फूर्ती देतील
नसनसातुनि बलिदानाची ज्वाला उसळेल ३८
रक्तसिंचनें करिन पुनः मी अशीच तव पूजा
येइल कधि तो क्षण भाग्याचा ध्यास हाच माझा ३९
वनदेवींनो विंध्यगिरीच्या दुःखित होवोनी
वेड्यापरि कां अश्रु गाळितां या मंगल कालीं ४०
जीवसुमानें पूजन करितां भारतभूचें मी
खुलवा त्याला मंगलगीतें मर्मर देवोनी ४१
नको नर्मदे ऐशा कालीं दुःखित होवोनी
कातरतेचे स्वर हे घुमवू या कुहरांमधुनी ४२
जात असे मी तुम्हा टाकुनी म्हणुनी तुम्हाला
प्रेमभराने उसळुनि कण्ठीं गद्गद कां आला ? ४३
बांधुनि पूजा या देवीची सुगंध अर्पोनी
झालों मी निर्माल्य म्हणुनि कां जीवनें[1] ये नयनीं ४४
कितेक सुमनें फुलतिल ऐशीं या भूमीमाजी
वीरवरांच्या सिक्त होतसे पावन रुधिरें जी ४५
अधिक सुगंधें बांधितील या देवीची पूजा
अम्हाविना कां तिर्ची प्रतिष्ठा जगतीं विलया जा ४६
सह्यगिरीच्या वनदेवींनो निरोप द्या मजला
तुम्ही वीरसू वीरमरण तें ठावें तुम्हाला ४७

(१) जीवन = १ पाणी २ प्राण

कां प्रेमाने आले अश्रू तुमच्याही डोळां
वीरस्त्रीला साजे कां ही अश्रूंची माला ४८

बाजीप्रभु तो पन्हाळगडिंचा सिंहगडीं तान्हा
दुष्ट रिपूचे कण्ठ छेदितां पडला लढतांना ४९

मुरारबाजी धारातीर्थी पुरंदरीं पडला
खुल्या करावर वार झेलुनी अमर जगीं झाला ५०

चापेकर ते, कान्हेरे ते फासावर गेले
आनन्दें या भूमीसाठीं, वंद्य जगीं झाले ५१

प्रसंग ऐसे कितेक पाहुनि पाणी डोळ्याला
येत असे कां असेंच संतत सांगा तुम्हाला ५२

वीरांच्या या यज्ञा पाहुनि तुम्ही न कां शिकलां
अचलित हृदयें जगीं साहण्या आत्मयज्ञलीला ५३

नगाधिराजा हिमालया तू निरोप दे मजला
स्थितप्रज्ञ तू, मुनिसहवासें पावन झालेला ५४

स्फूर्तिप्रद जो कुहरामाजी मन्त्रघोष त्यांचा
घुमला तव तो पुनः एकदा ऐकूं दे मजला ५५

विरहीं तुमच्या क्लांत जाहलें मानस त्यालागीं
घोषें त्या चैतन्य देउनी सुखवा मजलागीं ५६

वेड्या तूही तुहिनाश्रूंनी भरून आलासी
धैर्या उपमा तुझी न साजे मुळिं याच्या पुढती ५७

हिमालया या भरतभूमिचा रक्षक तूच खरा
गगन भेदुनी तिच्या ध्वजाला फडकविसी ऐसा ५८

तुला न शोभे धीरोदारा ऐशी कातरता
भरतभूमिचा यशोराशि तू वीरें वाढविला ५९

पानपताचें भीषण रण तें पेटतसे जेव्हां
रणकुण्डामधि लक्ष वीरगण आहुति दे जेव्हां ६०

वीरसिंह तो भाऊ पडला समरांगणिं जेव्हां
प्रसंग तो दुर्धर ऐसा तू पाहियला तेव्हां ६१

वीरांचें हौतात्म्य पाहिलें त्वां वारंवार
गाळिसि कां मग याच समयिं तू अश्रू अनिवार ६२

असो, पहा मी जातो आतां लोभ असूं द्यावा
येइन पुढती पुनः कधितरी तुम्हांस भेटाया ६३

दक्षिणच्या उदधे ! लाटांनी अशाच पाण्याच्या
सदैव पायांना प्रक्षाळी माझ्या आईच्या ६४

सदैव ऐसा गिरिराजा तू शिरावरी तीच्या
हरित तुऱ्याचा मुकुट धरावा प्रेमळ राणीच्या ६५

सतत घनांनो अभिषेकाला करा तिच्यावरती
सतत भास्करा छत्र धरी तू किरणांचें वरती ६६

वनदेवींनो जललव घेउनि येतां हा वारा
मंद मंद नव पल्लव चामर तिच्यावरी वारा ६७

मधुर गाउनी खगवैतालिक साथ करिल तुम्हा
गगनश्री वर्षुनी तारका गौरवील तिजला ६८

मार्च १९३९

# एकच आधार

( आनंदकंद )

माझ्या सभोवतालीं जग हें अनंत पसरे
सुविशाल सागरीं या मी एक बिंदु बारे १
आलों कुठून येथे आलों कशास येथे
जाणार आणि कोठे कांहीच ना कळे तें २
ही भ्रांति सर्व ऐसें म्हणती कुणी शहाणे
कीं शून्यरूप मीही कुणि सांगती असें हे ३
घन अंधकार वाटे पसरे चहूकडे हा
मी अंध त्यांत चुकलों नच जाणतों कुठेसा ४
या सर्व अन्धकारीं वाटे कुठें हृदय हें
स त्प्रे म ब न्ध ना ने बांधून ठेविलेंसें ५
आधार ज्यास नाही जीवास या कुठेंही
त्या एकमेव वाटे आधार बंधना ही ६
दुष्पार सागरीं या हा एकटा इथे मी
मजला निराश्रिताला आधार हीच काडी ७

आगस्ट १९३९

# पुनर्मीलन

(शार्दूलविक्रीडित)

झाला बालरवी प्रभातसमयीं भूमीतुनी निर्गत
प्रेमें त्यासह खेळतां अतिशयें ती होय आनन्दित
टाकोनी वनराजिरूप पदरा सस्नेह त्याच्यावरी
माता घे कवटाळुनी कधि तया साल्हाद ती हो उरीं १

ठेवोनी कधि त्यास शैलशिखरीं, छे हो निजांकावरी
गाई गोंडस त्या मुला खगमुखें गीतावली सुस्वरीं
मेघांच्या कधि पाळण्यांत मृदुशा त्यालागि ठेवोनिया
झोके मन्दहि देउनी निजक्ति 'अंगाइ रे सोनुल्या' २

म्हाणोनी कधि त्यास, लावि अरुणा चूर्णास अंगावरी
प्रेमाने निजवी सुनिर्मल अशा आकाशशेजेवरी
प्राचीच्या पदरांत देउनि कधीं त्या राजसा आत्मजा
त्याचें कौतुकही मुदें करविते, न्यारीच त्याची मजा ३

प्राची पक्षिमुखें वदे 'कितितरी हें बाळसे बालक
लाली कोमलशी दिसे तनुवरी सौवर्ण मेघालक'
तेजाच्या पदरांत झाकुनि तया लाडावते ती किती!
लोकीं या तुलना नसे किमपिही वात्सल्यभावाप्रती ४

मातेच्या असल्या अखंड ममताछायेमधे प्रेमल
घेतां यौवन चण्डरूप, सविता व्यापी नभोमंडल
तेजानें तळपे समुन्नतपदीं, ऐश्वर्य त्या लाधलें
तें सिंहासन इंद्रनीलमयसें त्याचें नभीं शोभलें ५

चाऱ्ही बाजुस त्या दिशा सकलही त्याच्या उभ्या राहती
हंसांच्या अति चारु पक्षवलनें हीं चामरें ढाळिती
वायू पायघड्या घनावलिमिषें टाकी तयाच्या पथीं
साक्षात् वेगचि जाहला कुशलसा त्याचा तदा सारथी ६

तेजाने राचिलें मनोरम असें त्याचें महामंदिर
ज्याचें प्रांगण भव्य हें पसरलें आकाश चेतोहर
निःसीमत्वचि अंतिमा मज गमे सीमा तयाची असे
अन्यूनत्वाचि एकमेव गमतें न्यूनत्व तेथे वसें ७

येतां दैववशात् तया अतिशयें ऐश्वर्य ऐसें क्षणीं
बाल्यीं वाढाविलें जिने, त्यजितसे तीला कृतघ्न क्षणीं
देई ताप अतीव चंडकिरणीं तीतें अतां दुःसह
दुष्टप्रेम जगीं सदैव ठरतें अत्यन्त दुःखावह ८

लाही होत तिच्या सुचारु तनुची त्याच्या प्रभावैभवें
ढाळी ती मृगतोय[1]रूप बहुधा चोहीकडे आसवें
जों त्याने तिजलागि निर्दयपणें केलें पदें[2] ताडन
तेव्हां निश्वसितें अनेक निघती आर्द्रान्त तोयांतुन[3] ९

ऐशी संतत तापभारगलिता जों होय सर्वंसहा
येई हास्य रवीस तों विकटसें तुच्छत्वभावें पहा
ज्याने तारियलें तयासचि अहा हो दुष्ट हा मारक
ज्या काष्ठातुनि जन्म वह्निस मिळे त्याचाच तो दाहक १०

"जो माझ्यापरि उच्च त्याकडुनिया झाली जरी हेलना
तीते मानिति सर्व सुज्ञ जन ते सुप्राप्त सम्भावना
कां ऐसी मग तू विषाद धरिसी" बोले तिला स्वर्मणी
दुष्टाची समजावणी गमतसे दुःखावरी डागणी ११

"प्रत्यासन्नविपत्तिमूढमनसां प्राया मतिः क्षीयते"[4]
ऐसें जें वदती कवीन्द्र मजला तें सत्यची वाटतें
जाई मत्त रवी अतां हळुहळू तो पाश्चिमेच्या प्रती
त्याची सर्वहि ती प्रभा अमितशी झाली फिकी सम्प्रती १२

---

(१) मृगतोय म्हणजे मृगजळ हेंच जणु भूमीचे अश्रु
(२) पदें-(१) पायांनीं (२) किरणांनी
(३) दुपारीं पाण्यातून वाफा निघतात तींच त्याचीं निश्वासितें
(४) विपत्ति जवळ आली म्हणजे आधी मति जाते.

पाहोनी मग घोर नाश पुढती निस्तेज झाला अती
आपत्तीस निवारितां अतिशयें रक्ताळलाही किती !
सारीही किरणावली त्यजुनि घे वृक्षांचिया आश्रया
चाऱ्ही बाजुस अन्धकार कवळूं पाहे दिशान्तीं तया १३

तेजाने रचिलें मनोरमहि जें त्याचें महामान्दिर
आली प्रेतकळा तयास अगदी तें भंगलें सत्वर
निःसीमत्व अतां तयास गमतें आपात्तिचेंची अहो !
अन्यूनत्व अतां तयांत गमतें न्यूनत्वभावींच हो ! १४

ज्यांनी वारुनि चामरें दिनभरी सेवा दिली त्याप्रती
आतां त्याच दिशा विपन्न म्हणुनी त्याला कशा हासती !
त्याच्या पायघड्याच तोयधर हे जे तेधवा जाहले
आतां तेच बसून त्यावरि पहा गर्वांत आनन्दले १५

"आतां कोण मला सहाय" म्हणुनी तो दीनसा बाहतो
तों "बाळा! नच तू भिऊं" म्हणुनिया आश्वासना ऐकतो
पाही, तों, धरणीच त्यास धरिते सस्नेह अंकावरी !
प्रेमाने तिमिरस्वरूप पदरें झाकोनि घेते उरीं ! १६

जानेवारी १९४०

# ओवाळणी

(शार्दूलविक्रीडित)

भाऊबीज असे म्हणून भगिनी ओवाळण्याते मला
प्रेमें हात धरोनिया बसविते पाटावरी, प्रेमला
ज्योती मंगल, कौतुकें फिरवुनी माझ्या मुखाभोंवती
प्रीतीच्या शिव कुंकुमें तिलकही लावी ललाटाप्रती १

"दैवें मी अगदी अकिंचन, सवें कांही नसे माझिया
काढूं काय अतां तिला उचितशी ओवाळणी द्यावया?"
ऐसें काहुर मानसीं उठुनिया अस्वस्थता घेरिते—
माते, ती शकलेंच कीं हृदयिंचीं तोडोनिया मारिते। २

"प्रीतीची जगिं फेड चोख करण्या लक्ष्मी भिकारी अती
भावालाच सदैव ती वरितसे" ऐशी करोनी मती
दु:खाच्या जलधींत खोल बुडुनी जीं मौक्तिकें लाभलीं—
अश्रूंचीच तया, तियेस मग मी ओवाळणी घातली! ३

पाहोनी भगिनी अती गहिवरे, पाणावले लोचन
ज्योतीचें तंव, एक अश्रु पडुनी, हा मालवे जीवन! ४

फेब्रुवारी १९४०

# प्राणासह सगळें वांछित तेंहि निमालें

( भूपति )

रवि जातां पावे चक्रवाकि ती विरहा
मग फिरते प्रियास हाका मारित 'हा, हा' ! १

अनुसरुनि तयाला हाय जाय ती थकुनी
कासारकर्दमीं बैसे खोल रुतोनी २

तों शब्द कुठे तरि परिचित ऐकूं येई
हृदयज्वालेला अधिक चेतना देई ३

ऐकून हाकही जाया नाही शक्ति
त्या पंकबंधनापासुनि नाही मुक्ति ४

हा! शब्द येइ, परि कोठे शब्दोद्गारी?
अज्ञात प्रदेशीं वसति वांछितें सारीं ५

तत्कल्पनाहि चित्तास देतसे स्फूर्ति
परि कोठे वसते स्वयं तयांची मूर्ति ? ६

ऐकूनि शब्द ते हृदय अनावर बाहे
तनुबंध तोडुनी पुढती धावूं पाहे ७

चैतन्य हाय तें दुःख भोगण्यालाची
ती स्मरणशक्तिही चित्त जाळण्या साची ८

स्मृति दुःखांलागी करी सुखांचें स्थान
आणि करी सुखांना दुखांचें भयगान ९

परि आशा जगवी कातर जीवितजात
दुःखाच्या तिमिरा आशा हाच विभात १०

"अति सुखद अहा तो येइल संगमकाल
नव पल्लवसा तो दिनकर अरुण निघेल ११

ये भूमीचे तो चुम्बाया मधु गाल
प्राचीही ठेविल उरीं तयाच्या भाल १२

तों प्रेमें वर्षिन शिरीं प्रियाच्या, शांत
जळ शीतल, धरुनी अपुल्या मृदु चंचूत १३

त्याच्या पंखें शिर खाजवुनी अनुवेल
मी घेइन चुंबुनि त्यांचें रज बिनमोल १४

मी कमळाखालीं बसतां माझ्यावरती
तो कमळा हलवुनि ढाळिल दहिंवरमोती १५

घेईल झाकुनी पंखाने मम तनुला
होईल बंध तो किती सुखप्रद मजला ! १६

येतां त्या पखीं लाली रविकांतीने
मी वदेन "तूते भाळविलें **कमळेने** १७

आलिंगन देतां तिजला तू निजपंखें
हे पराग तीचे बसले चिकटुनि येथे" १८

मी तेव्हा कितितरि फुगेन रुसुनी बाई
त्या वदेन टोचुनि 'लबाड किति तू होई' १९

लटका आणोनी राग राहतां रुसुनी
मज समजविण्याला बसेल तो बिलगोनी २०

किति पाया पडुनी करिल विनवण्या माझ्या
परि मानिनिच्या कां कधी मना त्या आल्या ? २१

कुंजीं जइं कूजे कोयळ मंजुरवांनी
तइं मच्चित्ताचा जाइल मान गळोनी २२

झणि हसुनि खुद्कनी होइन दंग रतींत
रसभरित प्रियाचा अधर मधुर चुंबीत" २३

करि मनोराज्य जों ऐसें चक्रवधू ती
तों दिनकर आला हलुच पूर्वदिक्प्रांतीं २४

उधळी वाटे तो तिजवरि कुंकुमराशी
कीं होइल आतां संग तिचा रमणाशीं २५

द्विज सुखद सुरांनी मंजु रागिणी गाती
तों प्रियकर दिसला तिज निज निकटप्रांतीं २६

दिसला परि पळभर संग हाय तो होता
आणि विपत्ति याया अनेक दारें जगता २७

तों कराल भयकर दूतचि यमराजाचा
आला खरतर हा ! शर सणसण मृगयूंचा[1] २८

त्या पंकीं उपडे हाय हृदय तें पडलें
प्राणासह सगळें वांछित तेंहि निमालें ! ३०

परि एक खोल चीत्कार निघुनिया अन्तीं
तो गाउनि गेला अमर प्रीतिच्या गीती !! ३१

मार्च १९४०

---

(१) मृगयु = शिकारी

# नालिनीचें विरहगीत

( भूपति )

अव्यक्तामाजी व्यक्त विलीन जसें हो
अंधारामाजी विश्व विलीन तसें हो १

हो जीवजात तो विलीन निद्रेमाजी
संगीत स्वरांचें लीन अभावामाजी २

परि नालिनीहृदयीं प्रेमगीत हें चाले
ज्या साथ द्यावया सूर शान्तिचें आले ३

"शतकोटि योजनें भानु दूर तो जरिही
तरि त्याच्यामागे धावे मानस विरही ४

विश्वाक्षा कोठे समय मला देखाया !
मत्प्रीतीही कां शकेल त्याप्रति जाया ? ५

परि हृदय तळमळे स्वागत त्याचें करण्या
चित्ताला हुरहुर सदा तयाते बघण्या ६

प्राचीच्या सुन्दर अरुण मान्दिरीं साचे
जों प्रकटे तें ऐश्वर्य गुलाबी त्याचें ७

त्याच्या त्या मंगल आगमनाच्या कालीं
चिद्वृत्ति जाहली अतीव बावरलेली ८

तो मंगल पल हो उत्सव चित्तालागी
सजवाया त्याला फुललें तें अनुरागीं ९

फुललें कसलें, 'निज हस्तदलांनी त्याला
मी उघडुनि दावी या अपुल्या हृदयाला १०

तो पराग ना, अनुराग त्यामधे भरला
तत्स्वागत करण्या त्यासच मी उधळीला ११

अणि गन्धें[१] फेंकिला वायूवरि हृदयींचा
कीं करून देइल तो त्या संग प्रियाचा १२
विश्वाक्षा कोठें समय मला देखाया !
मत्प्रीतीही कां शकेल त्याप्रति जाया ? १३
परि हृदय तळमळे स्वागत त्याचें करण्या
चित्ताला हुरहुर सदा तयातें बघण्या १४
दिवसा अति तपतां कराल बिंब तयाचें
संताप गमे तो माप मम प्रेमाचें १५
मी समजुनि कीं 'तो लावी नयना नयन'
लाजेनें खालीं पाहे विसरुनि भान १६
चित्ताला हुरहुर सदा तयातें बघण्या
परि डोळ्यांना हो मोह खालती बघण्या ! १७
विश्वाक्षा कोठें समय मला देखाया
प्राती परि शकते नसला भाव पहाया १८
अस्तोन्मुख झाली जईं तयाची स्वारी
तों पुनरपि आली लाली त्याला भारी १९
तन्मूर्ति सदा ती बसे ढगाच्या शयनीं
त्या कांचनराशी लोळति त्याच्या चरणीं २०
किति वाटे त्याच्या वक्रकटाक्षें एक
व्हावीं हृदयाचीं शकलें फुटुनि अनेक २१
हो दृष्टि आड जों त्याची वांछित मूर्ति
तों मिटुनि घेतलीं दलें सर्व मी स्वांतीं २२
जे जाति भाव बाहेर निघुनि सैराट
त्या प्रखर निश्चयें ओढुनि धरिलें आंत २३
मम दललक्ष्मी ही कोणासाठी आतां ?
हा विचार बहुपरि जाळि माझिया चित्ता २४

(१) वास, श्लेषार्थानें गर्व.

विश्वाक्षा कोठे समय मला देखाया
मम लक्ष्मीही कां शक्त तया भुलवाया ? २५

परि हृदय तळमळे प्रीती त्याला द्याया
लागे ही हुरहुर दर्शन त्याचें घ्याया २६

हा विरहशोकची कृषिभूमी प्रीतीची
मीलनसंभव कां अवश्यता प्रीतीची ! २७

अश्रूंचें दहिवर प्रीतिपुष्प हें फुलवी
निःश्वासपवन त्या निज आंदोलें डलवी २८

" रविचें कर पडुनी हें वपु कोमेजावें
त्यांनीच तयाचे मधुरस शोषुनि घ्यावे २९

त्याच्याच पदीं हें अन्तीं गळुनि पडावें"
या इच्छेने हें मानस परि आसावे ३०

मार्च १९४०

(१) पद=१पाय २ किरण.

# मानिनीस

(चन्द्रकान्त)

रवी शिराया जात असे हा पश्चिमदिग्हृदयीं
मजहि सुन्दरी देइ आसरा तुझ्याच गे हृदयीं १

अति पिकलेल्या यवांकुरापरि पिवळें ऊनहि गे
आलिंगन दे, दिनीं तापल्या भूमीला सुभगे ! २

तसेंच त्याच्यापरी तुझें हें गौरवर्ण अंग
कां देईना तप्त जाहल्या मम तनुला सांग ? ३

रविकांतीचें भूमितलाशीं मीलन बघ झालें
अपुलें मीलन तसें कां न तू घडवीसी कुटिले ! ४

वारा वाहुनि शुष्क वनाला गुजगोष्टी सांगे
निःश्वासहि हा मम हृदयाला तुझा कां न लागे ? ५

वाऱ्यासंगे नृत्य खेळती लतिका उद्यानीं
तू मग कां गे शान्त साजणी मला अव्हेरूनी ! ६

पारिजात हा खाली टाकी सडा प्रसूनांचा
तूहि मजवरी टाकी ना गे स्मितसौंदर्याचा ७

मैना पाही प्रियास अपुल्या हाका ही देते
कोपवाक्यही तुझें राजसे कां न मला मिळतें ! ८

होतें सर्वहि सृष्टीमाजी मीलन प्रेमाचें
गभीर सिन्धुहि चन्द्रा देखुनि उंच नभीं नाचे ९

सदा पश्चिमा रुसुनी बसते रवि जातां निघुनी
नाथ सोडुनी गगनीं जातां, दिनिं तापे धरणी १०

गळ्यांत पडते मेघांच्या ती इन्द्रचापमाला
गळ्यांत घाली तूहि माझिया गोंडस भुजमाला ११

मार्च १९४०

# बलिदान

ये दोघेही । परस्परांच्या पाशीं
एकाच घेउं मृत्यूसी

दो मरणांचा । प्रेमयोग निमिषास
निर्मितसे अमरत्वास

त्या अमरत्वाला घ्याया
अन्योन्यासह भोगाया
तळमळ ना कां तव ठाया ?

अमरत्वहि तें । क्षणिकत्वाहुनि खासें
एकट्यास दु:सह भासे

( हें काव्य प्रख्यात क्रान्तिकारक बाळमुकुन्द याच्या आयुष्यातील शेवटच्या प्रसंगावर आधारलें आहे. बाळमुकुन्दाला ज्यावेळीं फाशी झाली त्यावेळीं त्याची प्रेयसी रामरखी चितेवर देह ठेवून सती गेली हा तो प्रसंग होय. काव्यांतील पूर्वार्ध हें बाळमुकुन्दाचें रामरखीला उद्देशून शेवटचें वक्तव्य आहे. व उत्तरार्ध हें तिचें त्यावर उत्तर आहे. शेवटीं तिने चितेवर देह ठेवल्याचा प्रसंग वर्णिला आहे.)

# बलिदान

(अक्रूर)

[१]

"हा हाय कशी । पूजा बहु-दिवसांची
चुकली या भूमातेची
ते पूर्वीचे । रणीं धुरंधर गाजी
ते प्रताप भाऊ बाजी
जडदेहाने । वाहुनि पूजा तीची
तनु घेती अमरत्वाची
परि तेव्हाचें । तिच्या पदांवर कांही
सुम एकहि पडलें नाही
धन्य धन्य माझी नियती
त्यागुनी यौवनीं भुक्ती
जाळुनी शरीरज्योती
ओवाळाया । तिजला सिद्ध जहालों
मरणांत अमर मी झालों

[२]

घेउनी करीं । तूच तया ज्योतीला
ओवाळी भूमातेला
कदलीपरि हे । बाहु तुझे दलहस्तें
फिरवोत भोंवती तीतें
कलकण्ठि तुझा । कण्ठ मधुरतर आतां
गावो शुभ-पूजन-गीता

त्या गीताला । खण्ड मुळीं न पडूं दे
जों ज्योति ना विझे शुभदे
करुं नको उशीर गे आतां
ज्योतीची क्षणभंगुरता
आणुनिया अपुल्या चित्ता
लगबगा कशी । मातृभूस ओवाळी
ज्योती बघ विझण्या आली

[ ३ ]

जनविश्रुत हें । तुला कसें नच ठावें
"पूजा-ज्योतीस जपावें"
तव अश्रूंचा । बिन्दु पडुनिया तार्ते
ती मालवेल निमिषांत
मालविता ही । पूजेची शुभ ज्योती
अपशकुन भयप्रद होती
थांबवी कशा । माला या अश्रूंच्या
त्या अती अशुभभावाच्या
घे उचलुनि या ज्योतीला
ओवाळी भूमातेला
करुनी हर्षित चित्ताला
करु नको सखे । निरर्थ पळही काल
ही ज्योति विझुनि जाईल

[ ४ ]

मम तनुसुमना । खुडुनि लतेच्या वरुनी
वाही मग भूच्या चरणीं
जरि असेल तें । सुकायचें क्षणभावें
तरि त्या चरणींच सुकावें

परि सुको न तें । निर्जनशा कान्तारीं
ही आस असे त्या भारी
कमलाक्षि, नसे । आयु फार पुष्पांचें
क्षणीं कोमेजुनि जायाचें
कर नको उशिर तू म्हणुनी
वाही ते भूच्या चरणीं
जोंवरी न गेलें सुकुनी
या कोमलशा करेंच त्याला वाही
नच वाट अतां तू पाही

[ ५ ]

हरिणाक्षि तुझ्या । भावपूर्ण नयनांचे
जे सूर मूकगीताचें
तव अलंकांच्या । मंजु मधुर तारांनी
काढिले वरी हालोनी
जरि असले ते । प्रिय बहुपरि गे मजला
ते योग्य न या देवीला
कां मग ऐसी । तीच्या पूजनकाळीं
छेडिसी त्याच गीताली
हा गाहिवर तव कण्ठींचा
थांबवुनी क्षणभर आतां
सुस्पष्ट मंगळा गीता
गा मंजुळ तू । किन्नरकंठि, सुराने
केवल न नेत्रगीताने

[ ६ ]

तव गालांचे गुलाब कां हे भिजती
अश्रूंच्या दवबिंदूनी

त्या बिंदूंना । तेथेंची चुंबाया
मी योग्यच टिपुनी घ्याया

परि समय असे । मातृपूजनाचा हा
हे गुलाब उचित न त्याला

जी फुलें दिलीं । मजला सेवायाला
कां तीच देशि देवीला ?

मम देहरूप सुमनाच्या
निर्माल्य म्हणुनिया सुकण्या
चिद्वृत्ति भुकेल्या झाल्या

उचलुनी झणीं । मातृभूमिच्या चरणीं
वाही गे त्याला रमणी

[ ७ ]

नव पल्लवशा । मृदु ओठीं तव लाल
भरलें अमृत स्नेहाळ

हा तप्त अती । ग्रीष्मवायुसा श्वास
सोसवेल कैसा त्यास !

तो कसा पहा । सुकुनि चालला सखये
म्लानता तया दुःसह ये

नव प्रीतीचें । विरहें करपुनि जाणे
आणि कलिका सुकुनी गळणें

हा ! असह दोन शल्यें हीं
त्याहुनी न दुःखद कांहीं
या लोकीं सत्यच पाही

गे नको नको । सोडुं असा निःश्वास
ये ग्लानि अधरबिम्बास

[ ८ ]

त्या निःश्वासें मम तनुसुम करपेल
पूजेस अयोग्य ठरेल
तव अश्रूंचा । तापद हा अभिषेक
साहवे न त्या निमिषैक
त्या योगें तें । क्षणीं गळुनि जाईल
अति कोमल जगतीं फूल
तू पूजेच्या । तबकीं मम तनुसुमना
सद्भाग्यें दिधलें स्थाना
मिळवुनिही त्या स्थानाला
जरि घेइल तें नाशाला
करितां न मातृपूजेला
तरि हाय मुखीं । अमृतबिंदु येवोनी
तो गेला खालि गळोनी

[ ९ ]

अति कातर ही । जीवनज्योती ललिते !
तव निःश्वासें बघ विझते
या प्रिय भूचें । पूजन करण्या आधी
निर्वाण असे तिज आधी
कां आणिसि गे । तींच आधि तू तिजला
सोडुनिया निःश्वासाला
जोंवरी न ही । तत्पूजा आटपते
तोंवरी दाबुनी घे ते
साठवुनी हृदयीं त्यास
सोडि त्या विनासायास
येतां विधि हा अंतास

मग स्वैर जरी । करितिल सुद्धनी प्रलय
 गमतील मला सुखनिलय

[ १० ]

हा यज्ञ असे । स्वतंत्रतादेवीचा
 मी हव्य जाहलों साचा
हे ओठ तुझे । काय म्हणुनि थरथरती ?
 कां ऋचांस गाया बघती ?
हवनाच्याही । समयिं मूकभावाच्या
 गे ऋचा आत्मयज्ञाच्या
वदल्यावीण त्या । कथिति सर्व भावांला
 करुं नकोस आयासाला
  परि चुंबाया जरि मजला
  ये स्फुरण तुझ्या ओठांला
  तरि योग्य न तें या काला
तू मजलागी । चुंबुनि कां देवीला
 देशील भुक्त हव्याला ?

[ ११ ]

मम गळ्यास तो । फास अतां लागेल
 म्हणुनि कां क्लेश हा बोल !
छे वेडे ! तें । काय धन क्लेशाचें ?
 तें असें भाग्य सौख्याचें
मज परिचित हा । बाहुपाश तव होता
 आनंद निरामय देता
त्यापरीच हा । फासहि सुख दे मातें
 कां दुःख देइ तो तूतें ?

कां मत्सर तुज फाशीचा
कीं पडेल बाहु तियेचा
मम गळ्याभोंवती साचा ?
हा काय तरी । सवतीमत्सर स्त्रीचा
त्याशीं न कुणि तुलायाचा

[ १२ ]

परि क्षमा करी । मज तव या सवतीचा
अजि नाद लागला साचा
तो पूर्वीं तुझा । बाहुपाश दे मजला
तव देहिं विलीनत्वाला
हा नवा परी । पाश झणीं गे सुखदे
मज विलीनता विश्वीं दे
निरुपाधिक तो । विश्वैक्यीं आनन्द
मी तेथे लुब्ध मिलिन्द
आनंद भोगण्याला तो
मम आत्मा हा तळमळतो
देहाला तोडू बघतो
निःश्रेयस तें । अंतिम आनंदांत
कथितात मुनींचे व्रात

[ १३ ]

हें काय असें । रडें कोसळे तुजला
कीं पाश तुझा अवगणिला ?
छे वदलों मी । केवळ तें थट्टेत
करुं नको असा आकांत
मज आस नसे । विश्वविलीनत्वाची
तुजमधे प्राप्ति विश्वाची

मज मुळीं नको । निःश्रेयस तें रमणी
मम निःश्रेयस तव चरणीं

कर्तव्य परी बोलावी
मज तव सगाला त्यजवी
कशि हाक न ती ऐकावी ?

कर्तव्य न तें । भाग मागण्या येते
सर्वस्व तुझें तरि होते

[ १४ ]

कां दुःख तुला । होइ आज कीं मजला
हा मृत्यु अकालीं आला ?

अमरत्व कसें । कालाने मोजावें
तें कालातीत स्वभावें

जी अनंतता । कालामाजी वसते
गे मृती तीमधे असते

मम मृत्यूचा । पळ मज गमे अनंत
ज्याप्रती प्रार्थिती संत

आनंत्य तयाच पळाचें
मिळवाया सत्त्व मनाचें
उच्छृंखलतेने नाचे

तू करावया । स्वागत त्याच पळाचें
करि सिद्ध भाव हृदयाचे

[ १५ ]

तें पुनेवचें । स्वच्छ चांदणें पडतां
आनंद जगीं अवतरतां

आकाशाच्या–परीच हृदयातील
शांतीची फुलतां वेल

मधु मंद अशा । सरितां-सरितांतून
नाचतां लहरि रंगून
आपण पूर्वी । होतो गेलों फिरण्या
ज्योत्स्नासुख तें अनुभविण्या
तों सांगितलें मी तुजला
कर्तव्य निकट जें मजला
तू दिलेस निज सम्मतिला
कीं " फुलाहुनी । निखाराच मज रुचतो "
स्वीकार सखे आतां तो

[ १६ ]

हा ! कशी तुझ्या । कमलापरि मृदु हाता
सोसवेल ती दाहकता !
मृदु फूलच हो । फूलपाखरा भोग्य
नच अग्नि तयाला योग्य
कीं रूपच तू । देखिलें निखाऱ्याचें
आणि दाहकत्व ना त्याचें
छे ! मलाच ही । भूल कशी परि पडली
तव योग्यता न मुळिं कळली
तो कमलापरि मृदुकांत
त्या दुर्गेचाची हात
धरुनिया खड्ग दुर्दान्त
खल दैत्यांचा । करी रणीं संहार
समयीं स्त्री वज्रकठोर

[ १६ ]

पूर्वीच प्रिये ! शपथ तुझी घेवोनी
मी घोर प्रतिज्ञा केली

कीं मातेच्या । नाशिन परवशतेला
　ना तरी वरिन मृत्यूला

हा ! आज परी । भारतभूपुत्रांना
　फसुनिया प्रतिज्ञा नाना

तद्विकल्पची । खरा करुनि दावाया
　त्यागणें पडे निज काया

　　मजलाहि तोच ये भोग
　　टाकुनी तुझा अनुराग
　　मृत्यूला वरणें भाग

शुभ शपथ तुझी । घेउनि पण जो केला
　तो कसा मोडवे मजला ?

[१८]

तुज पाहुनिया । सखे पुढति आलेली
　चिद्वृत्ति उसासुनि आली

तुज द्यायाला । पाणिग्रह, बाहूला
　पसरुनी पुढे पाहियला

परि बेड्यांनी । टोचुनिया तइं मजला
　कळविलें पारतंत्र्याला

त्वत्प्राप्तीच्या । कुठे अपेक्षा मृदु त्या
　आणि कुठे शृंखला अदया

　　तोडिल्यावाचुनी त्यांना
　　त्वत्प्राप्तीचा सम्भव ना
　　म्हणुनिया करुनि युक्तींना

त्या तोडाया । यत्न यदा मी केला
　हा प्रसंग संपादियला !

[ १९ ]

ती उषा पहा । हासतसे पूर्वेत
अति दारुणशा अग्नींत

ती संध्याही । पश्चिम दिग्भागांत
हासते विकट वर्णांत

त्या मेघांच्या । काळ्या कुद्ध समूहीं
हासतसे चपला पाही

हा कसोटिचा । प्रसंग आला तुजला
तू तशीच हास तयाला

राजपूति त्या स्वर्गांत
दुर्गावति धीर रणांत
झाशीच्या लक्ष्मीसहित

तुज वदोत गे । "धन्य धन्य ही विद्युला"
टाकोत पुष्पवृष्टीला

[ २० ]

मज निरोप दे । आतां जात असे मी
ईप्सित मरणाच्या धामीं

परि कशास तो? नकोच देऊ मजला
हा निरोप मागितलेला

मज काय कुठे । जाणें तुज सोडून
कां निरोप मी मागेन !

मरणाच्या या । समयि स्मरावें ज्यासी
सायुज्य होतसे त्यासी

मी स्मरण तुझेंची करितो
सायुज्य तुझ्याशीं घेतो
मग निरोप कां मागूं तो ?

जरि तुजशी हो । एकभाव गे माझा
 घे निरोप कोण कुणाचा ? ”

* * *

[ २१ ]

“ तव माझ्याशीं । एकभाव केव्हांचा
 प्रियकरा जाहला साचा

छायेत वसे । तरू व्यापुनी जैसा
 मद्देहीं तूही तैसा

छायेला कां । स्वतन्त्रता तत्त्वाची
 ती वृक्षाश्रित सत्त्वाची

मज स्मरण्या कां । तुजला आवश्यकता
 सायुज्य घ्यावया आतां

 वपु दोन एक हृदयाला
 झालें तैसें अपुल्याला
 घेतांच एक नाशाला

दुसरें आतां । तसेंच कां राहील ?
 विलयास तेंहि जाईल !

[ २२ ]

पूजायाला । स्वतंत्रतादेवीला
 मज मान कुणी न च दिधला

कीं ‘ तव सुमना । खुडुनि लतेच्या वरुनी
 वाहीन तियेच्या चरणीं ’

मी तुझ्यापरी । एक सुमन तबकींचें
 पूजेला वाहायाचें

‘ निर्माल्य अम्हीं । एकच कालीं व्हावें ’
 आपण पूर्वी प्रार्थावें

परि आतां माझ्या आधी
तू घेसी साधुनि संधी
ही गमे जिवाला आधी
दे पद्धं मला । तुजसंगे भूचरणीं
ध्रुवपद हें मम चिद्गानीं

[ २३ ]

दुःखाश्रु न हे । येती मम डोळ्यांला
कीं साहु कशी विरहाला
परि मजलागी । त्यजुनि एकटीलाची
संधि घेसि आत्माहुतिची
हें शल्य मला । बोचे सतत मनांत
म्हणुनिया दाह हो त्यांत
प्रियजनाविना । सुधा लाभली तरिही
गमेंत ती विषसम, विरहीं
मम सोडुनिया कां मजला
घेसी तू या मानाला
कीं विसर तुला मम पडला
'रमणीसहची । धर्मकृत्य उरकावें'
हें शास्त्र काय नच ठावें !

[ २४ ]

अनलांत उषा । हासतसे परि केव्हां ?
प्रियभानुसंग हो तेव्हां
ती संध्याही । भानुच्याच समवेत
हासते विकट वणव्यांत
प्रियसंगाने । दारुणही अग्नी तो
फुलसेजेपरि मृदु गमतो

प्रियतमाचिया । भुजपाशीं सकलांचें
होतसे मरण मरणांचें
परि हतभागी मी मजला
प्रियतमाविना या काला
केवळ हा अग्नि मिळाला
मग कसें अतां । त्यास सुखें सोसावें ?
त्या उषेपरी हासावें ?

[२५]

'त्या मेघांच्या । काळया कुद्ध वनांत
हासतसे चपला कांत'
हें वदतोसी । परि न मुळींच खरेंसें
तव वचन जिवाला भासें
सीतेपरि तो । श्याम घन प्रिय तीचा
तिज शेज अंक हो त्याचा
मग कां न तिने । आनन्दें हासावें ?
जरि आयू पळही व्हावें
'क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव घडो मरणांचा'
परि घाला ये नशिबाचा
वर्षाव घडे । केवळ मज मरणांचा
क्षण मिळे न त्या प्रेमाचा

[२६]

तू पूजेचें । फूल तुझी सुषमा मी
तू ज्योती वात तुझी मी
तू सागर मी । त्वद्हृदयांत लहरिका
तू वसंत मी उपवनिका

तू कमल अणी। तव अंकीं मधु मृदुला
मी दवबिंदूंची माला

तू वीणेचा। स्वर मोहद चित्तास
मी हारिणी लुब्ध तयास

अन्योन्यावाचुनि उरतां
कां जीवनामधे आतां
राहील सख्या जीवनता !

एकत्रच हो। जनन मरण त्यालागीं
बान्धिलें जया अनुरागीं

[ २७ ]

'कर्तव्य न हें। भाग मागण्या येते
सर्वस्व तुझें तरि होतें'

या वचनानें। दाह होतसे स्वान्तीं
पूर्वस्मृति येउनि चित्तीं

कीं त्वां कथिलें। 'श्रेय-प्रेय सकलही
मम वसे तुझ्याची ठायीं'

मग कां म्हणुनी। श्रेया मिळवायाला
ढकलिसी मम प्रेयाला

मिळविण्यास त्या श्रेयाला
ये मार मिठी प्रेयाला
देइल हें साह्य तयाला

मत्प्रीती ये। आड न कर्तव्याच्या
ती दीपिका पथीं त्याच्या

[ २८ ]

मी कोमलसें। असलें फूल तरीही
होईन तव धुरावाही

या फुलाचिही । आहुति देउनि सखया
चेतवीन त्वत्कर्तव्या

त्वज्ज्योतीची । दारुणही दाहकता
मज गमेल आल्हादकता

हा तुझा असे । कर्तव्याग्नि म्हणून
लीलेने कवटाळीन

विरहाग्नीमाजी परि या
न च लोटूं मजला सदया
पसरिते पदर तव ठाया

हा वियोगही । तुझाच असला तरिही
हो असह्यसा हृद्दाही

[२९]

ये मार मिठी । एकदा तरी सजणा
क्षणिं फुलवी प्रेमलतांना

मम आयूंची । वर्षें करिन विलुप्त
त्या शाश्वतजीविं क्षणांत

मग मला कसा । अग्नी जाळुं शकेल
तें वज्रहि भंगु शकेल

परि देइ कसा । एकवार भुजपाशा
त्या अमृतप्रद संस्पर्शा

त्या परिरंभा मिळवोनी
मग दुरावलोंहि युगांनी
तरि हृदयीं आलिंगोनी

सायुज्यगृहीं । बसलोंसें वाटेल
दे अन्तिम सुख तो काल

[३०]

कां विमुख असा ? तूच जिवाचा राणा
मज एक मिठी दृढ देना!

ये एकसरें। कर्तव्या चेतवितां
करुं देहाची सार्थकता

ये दोघेंही। परस्परांच्या पाशीं
एकाच घेउ मृत्यूसी

दो मरणांचा। प्रेमयोग निमिषास
निर्मितसे अमरत्वास

त्या अमरत्वाला ध्याया
अन्योन्यासह भोगाया
तळमळ ना कां तव ठाया ?

अमरत्वहि तें। क्षणिकत्वाहुनि खासें
एकट्यास दुःसह भासे!

[३१]

या ओसाडीं। एकलेंच हिरमुसलें
पाखरूं दिसे बसलेलें

साथीविण या। एकटशा तद्‌गीती
मम हृद्‌गीता अनुसरती

चहुबाजूला। तव गीतें गाणारा
धावतसे हा बघ वारा

त्यांतही तुझा। विरुनी गेलेला तो
निःश्वास ओळखूं येतो

घेउनिया त्या निश्वासा
चुम्बुनी करिन अपुलासा
जरि देशिल ना भुजपाशा

तव दुःखाचा । श्वास मिळे या समयीं
तरि जपून ठेविन हृदयीं

[ ३२ ]

येतां उडुनी । पिवळीं पिंपळपानें
गातांही सळसळ गानें

तू हृदयींच्या । आशा दग्ध जहाल्या
गमतें या फेकुनि दिधल्या

मत्प्रेमाच्या ढाळुनिया अश्रूंना
फुलवावें गमतें त्यांना

परि विझलेल्या । आशा आणी ज्योती
अश्रुनें पुनः कां फुलती !

मम हृदयाच्या दाहानें
स्पर्शीन जरी प्रेमानें
फुलतील तरिच जोमानें

म्हणुनीच सख्या । मार मिठी मम हृदया
दे फुलूं तुझ्या आशा या

[३३]

मन्मनास या । वार्ता तव आणाया
धाडिलें तुझ्या बघ ठाया

परि तेथुनि ते । अजुनि पहा परतेना !
ही उत्कण्ठा छळिते ना

मज वाटुनिया । तूच पुढे आलास
किति आलिंगूं वाऱ्यास

या उडणाऱ्या । प्रमत्तशा भृंगाला
किति पुसूं तुझ्या वार्तेला

दे मिठी एकदा देहीं
याहुनी आणखी कांहि
वांछा बघ तिळही नाहीं
ही मिटी मिठी । श्रेय सर्व देईल
कामना मुळीं नुरवील

[३४]

हे वाऱ्यांनो । झोंबता असे मजला
कां प्रियकर तो पाहियला
ज्या लहरींनी स्पर्शियलें त्यालागीं
स्पर्शोत त्याच मजलागीं
तद्वदनाचे । श्वास मिसळले ज्यासी
चुम्बोत त्याच अधरांसी
परि इतरांना । शपथ असे, 'मम देहा
स्पर्शुनी करा नच दाहा'
स्तम्भित कां वेड्यावाणी
देखता अशा भिरभिरुनी
नाही कां तुम्हा वाणी
स्त्रीलाच कळे । स्त्रीच्या मनिंचा लाहो
हीं वचनें खोटीं कांहो ?

[३५]

किरणांनो या । खिडकीतुनि तुम्हि आतां
चोरट्या पावलीं शिरतां
प्रियलोचनिंचे । अश्रू संततगामी
जरि पुशिल असतिल तुम्ही
या स्थलामधे । तरिच सुखाने शिरुनी
मम अश्रुहि टाका पुसुनी

नाहीतर ते । वाहूं द्या चिरकाल
मन्मानस तें मानेल
जोंवरी प्रियाश्रू वाही
तोंवरी मदश्रूलाही
वाहणें आवडे चिरही
थाम्बेल जई । अश्रुमोचना, त्याजी
थाम्बेल माझिंही साची

[ २६ ]

' जरि सुकायचें । असेल मम तनुसुमन
अल्पकालची राहून
तरि स्वतंत्रता-देवीच्याची चरणीं
जावें तें अंतीं सुकुनी '
तुज असे सख्या । वाञ्छा ही चित्ताला
तीच असे वाञ्छा मजला
मग लोटुनिया । मागे कैसा मजला
पूजिसी तूच देवीला !
त्वद्विरहाच्या अग्नींनी
कां मत्सुम जावें जळुनी
ठेवियलें नशिबीं लिहुनी
छे ! मजलाही । अपुल्या संगे सखया
अनुमति दें सुकुनी जाया "

३७

' हवनाच्याही । समयिं मूकभावाच्या
त्या ऋचा आत्मयज्ञाच्या '
स्मरुनिया असें । वचन आत्मरमणाचें
ती भाव धरी शान्तीचे

मग चेतवुनी । चिता तिथे हस्तांनी
त्या प्रदक्षिणा घालोनी
" कर्तव्य अतां । योग्य सतीचें करिते "
बोले ती धीरा तीते
' पतिसंगे मरणावरती
कवटाळुनि हर्षें ज्योती
होतसे सतीची कीर्ती '
ही शास्त्राज्ञा । असली तरि मज आजी
स्वीकार एकटीलाची "

[ ३८ ]

" परि कां म्हणुनी । भूल मला ही पडली
मी सती चाललें नाही
तू अग्नि नसे । प्रियकर तू माझाच
कां असा ठकविसी साच
या ज्वालांचे । बाहू पसरुनि मजला
करु बघसी परिरंभाला
जा नाही मी । वश व्हायाची तुजसी
किति उशीर करुनी येसी
हासुनिया वरचेवरती
ठिणग्यांपरि सुमनें शुभ हीं
कां फेकिसि माझ्यावरती
या खेळाने । वश न मानिनी होते
तुजला न काय हें कळतें !

[ ३९ ]

हा कसा मला । धूम्रनील लतिकेचा
घालिसी पाश प्रणयाचा !

छे ! त्यालाही । नाही मी फसणार
तव विनती व्यर्थविणार

जा गडे ! असा । कां मम अनुनय करिता
मी नसे मुळीं अवगणिता

परि मन कथितां । 'जा रम निजरमणासी'
कुणि मागे ओढी मजसी

हीं गात्रें कसलीं मेलीं
ऐकतीं मनाचें न मुळीं
कां गम्मत करिती असली

कां गभीरशा । काळींही तुम्हाते
गात्रांनो गम्मत सुचते"

*　　*　　*　　*

[४१]

मग चितेवरी । देह ठेविला तीने
त्या भूमिस्थित चपलेने

तिज अग्नीने । धरिलें कवटाळोनी
आपुल्या खर ज्वालांनी

परि तिज गमलें । "प्रियकरभुजपाशांत
मी असे पहुडली शान्त"

ज्योतीशीं हो । एकभाव ज्योतीचा
तैं वास कसा द्वित्वाचा !

स्फुलिङ्ग एक तों तीचा
आक्रमी मार्ग गगनाचा
हो प्रकाश हत भानूचा

तइं बघत्यांचे । नेत्र मनासह दिपले
तत्प्रभा न साहू शकले

[ ४२ ]

आणि त्याच पळीं । रिपुने तद्रमणाची
हरियली ज्योति जीवाची

तेजस्वी ती । ज्योति निघे त्यातूना
आणि जाई गगनिं उडूनी

तिजलाही हो । तेज सूर्यकोटींचें
दिपवी ती नेत्र सुरांचे

ती रमणीच्या ज्योतीशीं
घेतसे एकरूपासी
त्या तेजा उपमा कैसी !

त्या तेजाचा । तारा ध्रुव हा झाला
कवि सत्य कथी वचनाला

एप्रिल १९४०

# गोड हुरहुर

( चंद्रकांत )

" दृष्टिक्षेपें माझ्या जरि ये हृदय तुझें नेत्रीं
तरि त्याला मी आतां सखये घेतो माघारीं १

मम सान्निध्यें तव हृदयीं जरि तरंग उद्धतसे
उठती, तरि मग दुरीं येथुनी मी बघ जात असे २

शिरतां मी तव हृदयामाजी भग्न होत जरि तें
दूर जाउनी शीघ्र सेवितों भीषण रान रितें " ३

" नको प्रियकरा ! असेंच बुडवी अपुल्या दृष्टींत
तिने जरी मम हृदय येतसें धाउनि डोळ्यांत ४

तुजला कैसें केवळ जडशा नेत्रें देखावें
हृदयाच्या राजाला वाटे हृदयें निरखावें ५

सान्निध्याने तुझिया उठती तरंग जे चित्तीं
त्यांचे मोहक गोड सूरची मजला भुलवीती ६

माझ्या हृदयीं शिरतांना तू तें जरि भंगेल
त्याचीं शकलें वेचुनि घडविन सुंदरशी माळ ७

आणि राजसा घालिन तुझिया राजस कंठाला
याहुनि वरचढ भाग्य कोणतें माझ्या हृदयाला !" ८

## जम्मत

" आई मी बघ उन्च उन्च या नभांत जाईन
चन्द्राच्या कोरेवर बसुनी झोके घेईन १

जाऊं देना तिथे मला तू खूप खूप वरती
परत येउनी लवकर साङ्गिन जम्मत मी तुज ती २

वेचुनि तारा घालिन त्यांची माला कण्ठाला
किंवा ढाळुनि देइन तुझिया अङ्गावर त्यांला ३

छाया बघ या काळ्या पडल्या हृदयीं गगनाच्या
जाउनि खेळिन त्यांच्याशीं मी खेळा हुतुतूच्या ४

'मधूस' नेउनि फेकिन त्याच्या अंगावर तारा
करीन त्यावर स्वर्गंगेच्या पाण्याचा मारा ५

जाऊं देना तिथे मला तू खूप खूप वरती
परत येउनी लवकर सांगिन जम्मत तुज मी ती ६

कापसावरी ढगाचिया या उड्याहि मारीन
उल्कांचे त्या छान फटाके खाली उडवीन ७

शिवाशिवीचा खेळ मधूशीं रमुनी खेळेन
ढगाआड या लपतां त्याला कैसा गवसेन ! ८

अंगणांत तू वाचित बसतां मी तुझियावरती
दवबिंदूंचे शीतल ऐसे ढाळिन ते मोती ९

थंडपणाने तू थरथरुनी वदशिल ' कोठून !
बिंदु टाकितो माझ्यावरती शीतलसे कोण ! ' १०

तुला कळेल न बाळाने त्या टाकियले अपुल्या
तुझी तदा मी करीन जम्मत खूप हासुनीया ११

जाऊं देना तिथे मला तू खूप खूप वरती
परत येउनी लवकर सांगिन जम्मत तुज मी ती " १२

एप्रिल १९४०

# हंस आणि बेडूक

बिसतन्तु घेउनी मुखीं आपुल्या मृदुल
कुणि हंस बसे कासारतीरिं सुविशाल १

वर्षासमयीं त्या कासारीं बसलेला
बेडूक एक त्या वदला हिरमुसलेला २

"या क्षुद्र सराच्या जळांत रोज बसावें
नित उड्या मारुनी व्याकुल शब्द करावें ३

हे दुष्ट सर्प किति बसलेले भवतालीं
किति पोरें मजला दगड मारण्या टपलीं ४

दुसऱ्याला खाउनि स्वतां जगावें ऐसे
हें जीवन इथलें नीचवृत्तिचें भासे ५

मन माझें रमतें मुळीं न या स्थानांत
उड्डाण करावें वाटे उंच नभांत ६

नवशशिकिरणें हो सोनेरी घनमाला
त्यावरतीं जाउनि पहुडावें या काला ७

धबधबा पडे जो उंच पर्वतावरुनी
जल छिन्न होउनी तुषार उडती गगनीं ८

त्या तुषारापरी दिसती रेणु ढगांचे
त्या खालि धुवावें वाटे अंग स्वतांचें ९

रांगेने ना ही हंसमालिका उडते
ही नभोदेविची गळुनि मेखला पडते १०

रात्रींत आपुल्या असंख्य राणींसहित
उडुराज पोहतो गगनरूप सरसींत ११

त्या युवतींच्या तैं चंदनांगरागांनी
तज्जल झालेलें दिसतें पांडुरवर्णी १२

हें स्वर्जीवन हो उदात्त नी सुंदरसें
झणिं तेथे जावें मच्चित्ता वाटतसें " १३

" चल तुजला नेतों तेथे " वदला हंस
" या बिसतंतूला घट्ट धरुनि तू बैस " १४

झणि नेलें त्याला हंसें उंच नभांत
तों सुंदर दृश्यें झालीं सर्व विलुप्त १५

सोनेरी वैभव लोपे सर्व ढगांचें
त्या केवल दिसले विरल संघ बाष्पाचे १६

ती हंसराजि ना नभोमेखला गमली
क्षेपांनी तीच्या दृष्टी त्याची फिरली १७

शून्याचा सागर विशाल नभ तें गमलें
त्या विश्रान्तिस्थल भावाचें ना दिसलें १८

त्या तारका नि तो तारापति त्या काळें
शतकोटि योजनें दुरावलेले दिसले १९

खेदाने त्याने घरेवरी देखियले
तों उन्नततेने त्याचे डोळे फिरले २०

मूर्च्छा येउनिया पडला धडकन खालीं
आदळण्यापूर्वीं प्राणज्योति निमाली ! २१

एप्रिल १९४०.

# आकांक्षा

( अक्रूर )

[ १ ]

कां तारांनो । पाहुनि मज गरिबाला
 या अशा मिचकितां नयना
मज तुम्हापरी उच्च मिळेना वास
 म्हणुनि कां असा उपहास
मज वाटतसे । दिव्यरूप गगनाच्या
 रङ्गणीं भराऱ्या घ्याव्या
आणि तेथुनिया । भूमीच्या उद्धरणीं
 उल्केपरि यावें तुटुनी
 आत्मा वर धावा घेई
 जड देह त्याजला अडवी
 भूमीवर बान्धुनि ठेवी
वर जायाला । व्याकुळ भाव जिवाचे
 जड तनुस काय परि त्याचें ?

[ २ ]

तुम्हि ज्योत्स्नेच्या । वातावरणीं रमतां
 स्वर्गङ्गेमाजी न्हाता
या दिव्यपथीं । सदा उभे राहूनी
 ही प्रकाशवीता अवनी
 व्यर्थ हें परी मम जगणें
 भारभूत जगता होणें
 जन्मुनिया केवळ मरणें
कोळसा उरे । विझुनि निखारा मनिंचा
 मम ठायिं न लव तेजाचा

[ ३ ]

ढग काळ हे । आवशीस घन रातीं
तेजाला रोधूं बघती
परि त्यांची ना । क्षती मुळीं तुम्हास
हासतां बघुनिया त्यांस
त्यामधूनही । अपुलें तेज उधळितां
धवलता त्यांसही देता
परि साधेना तें मजला
मम हृदयींच्या तेजाला
अन्धार कवळितो काळा
शिकवा ना हो । तुमची सरणी मजला
उजळावें केवि तमाला

[ ४ ]

दलितांलागी । केवल उपहसण्याची
मुळिं नसे तऱ्हा मोठ्यांची
‘ जइं बाळाला । चालण्यास शिकवावें
तत्कर धरुनी चालावें ’
ही ठावेना । रीत काय तुम्हाला
कां केवळ हसतां मजला
या प्रसन्नशा किरणांनी
घ्या मजलागी उचलूनी
~~न्या हो मज तुमच्या सदनीं~~
मज शिकवा ना । शिकवा तुमची सरणी
किति विनवूं तुमच्या चरणीं

जून १९४०.

# जिज्ञासा

( चन्द्रकान्त )

माझ्यासाठी कुणा कळीला, वसुधे ! फुलवीसी ?
कुणास अपुल्या अंकावरती प्रेमें खेळविसी ? १

पहिल्या वृष्टीमुळें तुझा जो निघतो मृद्‌गंध
त्यापरि करितो तीचाही कां गंध मना अंध ? २

प्रातःकाळीं सायंकाळीं तव अंकावरती
सरिता मोहक रङ्गांच्या त्या हर्षें बागडती ३

घेउनिया तू तयांच्याच कां एका लहरीला
त्या वर्णानें निर्मियलें मग माझ्या कलिकेला ? ४

मला आवडे हृदयंगम तो प्रेमाचा रंग
मम कलिकाही तयाच रंगीं रंगे कां सांग ? ५

दवबिंदूंनो ! तुम्ही प्रभातीं त्या कलिकेवरती
पडुनि तियेला भूषविता ना, जसे पाचमोती ? ६

कसा तियेचा स्पर्श असे हो सांगा ना मजला
तुम्हाहुनीही अधिक असे कां प्रकृति तिची मृदुला ? ७

म्हणुन त्यावरी तुम्हीहि जपुनी हळूच पद देतां
कीं ' ती मुग्धा दुखावेल हा अमुचा पद पडतां ? ८

तुमची माला पडतां तीच्या कण्ठीं अवलीळा
कशी दिसे ती अतुल्य सुषमा सांगा ना मजला ! ९

रविकिरणांनो ! शशिकिरणांनो ! तुम्ही प्रेमानें
आलिंगुनिया तिजला धरितां आळीपाळीनें १०

कसें तदा हो तुमच्या हृदयीं ? येइल कां कथितां ?
त्या स्थितिलागीं अनुभविण्याला मज हो आतुरता ११

हास्य तियेचें शशिकिरणांनो ! तुम्हापरी भुलवी
कीं झोपेतुनि रविकिरणांनो ! तुम्हापरी उठवी ! १२

अनिला ! करिसी तीच्यासंगे तू बघ नृत्याला
तिच्या पदीं कीं स्वयं कला ये शिक्षण घ्यायाला ! १३

अमित फुलांचा सुगंध भरिसी तू हृदयीं अपुल्या
त्यांत कोणता असे सांग रे कलिकेचा माझ्या १४

मीही ठेविन हृदयीं त्याला साठवुनी खोल
कीं मग मित्रा ! केव्हांही ना तो गंध हरवेल ! १५

मुग्धा किंवा चतुरा आहे कलिका ती माझी ?
परिणमेल ती गोड वा सख्या कडू फळामाजी ? १६

स्थलकालांचीं अतुट बंधनें मजला कवळीती
हृदयलतेच्या कलिकेला मज पाहूं ना देती १७

अवसेच्या अन्धारीं चुकल्या अन्धाच्या वाणी
गती जाहली तिच्याविषयिंच्या या घन अज्ञानीं १८

अपुल्या गतिमान् पङ्खावरती मजला बसवोनी
जिथे असे ती तेथ मजला तू जा घेवोनी १९

डोळे भरुनी पाहुनि घेइन आतुर हृदयाने
असेल माझ्या अगम्य भालीं लिहिली जी विधिने २०

कसा निर्दया ! ऐकतां न या माझ्या विनतीला
त्वरित हासुनी पळुनी जाशी दूरदूर कुटिला ! २१

पञ्चमहाभूतांनो ! तुम्हा माझी ही शपथ
तुम्ही जगाचें पालन करिता टाकुनिया स्वार्थ २२

सुष्ट असो वा दुष्ट असो वा माझी कलिका ती
प्रेमभराने तिला वाढवा ' ही माझी विनती २३

प्रेमपारिस तो करितां स्पर्शा दोषायस जें तें
विशुद्धरूपी सुवर्णतेला सत्वरची घेतें २४

जुलै १९४०

# प्रस्थान

( धवलचन्द्रिका )

हासतमी जगतीं या पूर्वि पातलों
आणि अतां रडत पहा परत चाललों ! १

कां खरेंच परत ? जिथुनि पातलों इथें
आज अतां फिरुनि असे जायचें तिथे ? २

कीं असेच हे प्रवास करित दैविंचे
आजि अनंत काळ असे मी भ्रमायचें ? ३

माझें तें उद्दिष्टहि काम्यसें असें
कीं पापालयच महान् द्वेष्यरूपसें ? ४

हासतमी जगतीं या पूर्वि पातलों
आणि अतां रडत पहा परत चाललों ! ५

रडतों नच, कीं हें जग काम्य असोनी
सोसे नच त्याचा मज विरह म्हणोनी ६

आशेला सांगातीं धरुनि पातलों
निराशेस घेउनि परि परत चाललों ! ७

येतांना विहगगीत तें प्रभातिंचें
ऐकाया मजसि मिळे रम्य रंगिंचें ८

तेजाची शवयात्रा परि निघे अतां
आणि तेच विहग गाति मरणगायना ! ९

कमलें जी उच्छ्वसिलीं उदयसमयिं त्या
कोमेजुनि तीं गेलीं अस्तसमयिं या १०

हासतमी जगतीं या पूर्वि पातलों
आणि अतां रडत पहा परत चाललों ! ११

जुलै १९४०

# दयाळा तुजवीण साङ्ग कोणाकडे पहावें !

दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ॥ ध्रु. ॥

आजि उदास वाटते, फार मी तळमळते, तुज प्रभो
धुंडाळते, सख्या गवसावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? १

समाधान शारीरिक, तैंहि नसे मानसिक, काय करावें
आणीक किति सोसावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? २

धावण्या कुठे धावलांत, कोंडिलें कुणी ह्रदयांत, काहि हाक
नये कानांत, काय समजावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ३

घळघळा अश्रू आले, आले तसेच थाळले, नाहि कोणि
सावरीले, तुम्ही तरि यावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ४

धावे धावे धावे आतां, ब्रीद सांभाळी अनंता मति बावरली
आतां तरि वेगें यावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ५

सौख्याच्या शोधासाठीं, एकाच शब्दासाठीं, प्रसंगीं
प्रेमासाठी, मी तळमळावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ६

थोर पतित तारिले, मीच कशि जड झाले, ब्रीद काय
हरपले, आजि कोठे जावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ७

नाम तुझें घेई कोणी, त्याचि हाक आणी मनीं, असे सांगतात
ज्ञानी, अनृत नसावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ८

मतिमंद आहे जरी, नाम घेई कसे तरी, मनिं भाव
आहे परि, त्वांच ढकलावें !
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ९

कष्टि जीवाने बाहतां, तुम्हि त्वरेने धावता, संत वचनीं
पाहतां, असें झालें ठावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? १०

ह्याचि विश्वासें म्हणोनी, आळवि कळवळोनी, दीना घ्या
सांभाळोनी मन नुपेक्षावें
दयाळा तूजवीण सांग कोणाकडे पहावें ? ११

योगायोग तो येईना, जपतप ही साधेना, त्यांत मनही
लागेना, नसे कांही ठावें
दयाळा तुजविण सांग कुणीकडे पहावें ? १२

## करुणा कर दीन दासीवरती

चाल:—बिन बादल बिजाली कहां चमकी

करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ॥ ध्रु ॥

चरणीं शरण तव लोटु नको मज । भवसागरिं खडकावरती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १

लोभ, मोह, आणि क्रोधहि तिसरा । हे रिपु फार मला छळिती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर २

मृदुशय्येवर झोप न येई । दुःखाश्रू नयनीं कढती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ३

शोकसागरीं बुडुनि न मेले । जीव होइ खालीवरती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ४

आत्मिक बल बघ लोपुनि गेले । मन भटके वाऱ्यावरती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ५

वृत्ति बावरी गडबड करिते । हृदयाचीं शकलें उडती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ६

पोटीं खळबळ चाले देवा । आतडि जणुं घुसळुनि निघती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ७

व्याधिग्रस्त हें शरीर किडकें । मन चिडलें जीवावरती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ८

संसारीं मन विटून गेले । देवा ने चरणाजवळी
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ९

भवसागर हा अफाट दिसतो । बघुनि कसे डोळे फिरती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १०

किति दिवसाचा नरकवास हा । किति भोग अतां उरले असती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर ११

वालि नसे कुणि तुजविण देवा । दीन अनाथ असे पुरती
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १२

करुणासागर म्हणवितोस कीं । कोठे करुणा लपली ?
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १३

दीनरक्षणीं तत्पर म्हणती । ही म्हण बघ खोटी ठरलीं
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १४

भ्रमा न मन हें चरणीं रमुं दे । एकच ही आळी पुरवी
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १५

धुंद होउनी गुंगुन जावें । भक्तिरसा तुझिया पिउनी
करुणा कर, दीन दासीवरती करुणा कर १६

